माणूस

शनिवार । ७ फेब्रुवारी १९८१ । एक रुपया

# श्री पतित-पावन मंदिराचा सुवर्णमहोत्सव

## दि. ८ ते १४ फेब्रुवारी १९८१

स्वातंत्र्यवीर सावरकर काळ्या पाण्याची शिक्षा भोगून आल्यानंतर १९२४ पासून तेरा वर्षे रत्नागिरी येथे स्थानबद्ध होते, हे सर्वांना विदितच आहे. त्या काळचा रत्नागिरी जिल्हा हा भारतातील एक अत्यंत मागासलेला जिल्हा होता. सनातनी आचार-विचारांचे माहेर, अशीही त्याची ख्याती होती. अशा ठिकाणी सावरकरांना ठेविल्यास त्यांचा सार्वजनिक संपर्क वा कृती आपोआपच संपुष्टात येतील अशी इंग्रज कार्यकर्त्यांची समजूत होती; परंतु क्रांतिकारकांच्या त्या अग्रणीने हे सर्व आडाखे खोटे ठरविले. त्यांनी तेथेही समाजसुधारणेसाठी अशी चळवळ चालू केली की, तिच्याकडे अखिल भारताचे लक्ष अल्प काळातच वेधले.

पूर्वास्पृश्यांच्या मुलांना प्राथमिक शाळेत सरमिसळ बसविणे, येथपासून आरंभ करून अस्पृश्यतानिवारण, मंदिरप्रवेश, सहभोजन, अखिल हिंदू उपाहारगृहे, सर्व हिंदू महिलांचा हळदीकुंकूसमारंभ इत्यादी अनेक उपक्रमांचा त्यात समावेश होता; परंतु या सर्वांत आकर्षक आणि दूरगामी अशी घटना म्हणजे श्रीपतितपावनाच्या भव्य मंदिराची स्थापना होय! वीर सावरकरांच्या प्रेरणेने, स्वतःचे अडीच लक्ष रुपये खर्च करून आणि अतिशय परिश्रम घेऊन, श्रीमान् भागोजीशेठ कीर यांनी काळाची आवश्यकता म्हणून हे मंदिर बांधले. या मंदिराचे उद्घाटन श्रीमत् शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी, यांच्या हस्ते २२ फेब्रुवारी १९३१ या दिवशी झाले. त्याच वर्षापासून या मंदिरात अखिल हिंदू गणेशोत्सवही सुरू झाला.

पतित-पावन हे त्या देवाचे नावच अर्थपूर्ण होते. सर्वार्थाने दलित आणि पतित अशा भारतीय समाजाच्या उद्धरणाचे आवाहन त्यात सूचित होते. हे मंदिर साहजिकच सावरकरांच्या अनेक सुधारणांचे व्यासपीठ आणि केन्द्र झाले. त्यामुळे अखिल भारतातील सुधारकांना ते यात्रास्थान व्हावे यात नवल नव्हते. अशा यात्रिकात भाई परमानंदच नव्हे तर युसुफ मेहेर अल्ली हेही सामील होते.

मध्यंतरीच्या काळात या मंदिराची दुरुस्ती करणेही आवश्यक झाले. ही दुरुस्ती साधावी आणि या महान उपक्रमांचा अर्धशताब्दी उत्सव करावा या दोन हेतूंनी सुवर्णमहोत्सव समितीची स्थापना झाली. या समितीचे अध्यक्ष खासदार श्री. बापूसाहेब परुळेकर हे आहेत. या कामी येणाऱ्या खर्चाचा अंदाज एक लक्ष रुपये आहे. समितीच्या आर्थिक आवाहनाला, गानसम्राज्ञी डॉ. लता मंगेशकर यांच्या पाच सहस्र रुपयांच्या देणगीने शुभारंभ झाला! सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक श्री. हृदयनाथ मंगेशकरही अत्यंत आत्मीयतेने या समारंभासाठी प्रामुख्याने सावरकर गीतांचा एक विशेष कार्यक्रम खर्चही न घेता सादर करणार आहेत.

या महत्त्वपूर्ण कार्यासाठी देणग्या व स्मरणिकेसाठी जाहिराती या स्वरूपात द्रव्यसहाय्य करण्याची जनतेला साग्रह विनंती आहे. द्रव्यसहाय्य– 'श्रीपतितपावनमंदिर, सुवर्ण महोत्सव समिती, रत्नागिरी' या नावाने पाठविण्यात यावे.

□

# सप्रेम नमस्कार

¤ 'माणूस'च्या २४ जानेवारीच्या अंकात डॉ. शरद अभ्यंकर यानी मुंबईला रॅशनॅलिस्ट असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवी अधिवेशनाचा वृत्तात दिला आहे. वृत्तात चांगला आहे. (त्यापूर्वीच्या अंकातील ज्योतिष हे थोताड असल्याचा लेखही उत्तम होता.) वृत्तातामध्ये 'आर्यसमाजासारखे पुरातन परंपरा कायम राखू पहाणारे लोक' असा उल्लेख असून तो वस्तुस्थितीचा विपर्यास म्हणावा लागेल. उज्ज्वल वैदिक परंपराचा अभिमान आर्यसमाज बाळगतो हे खरे असले तरी अनेक परंपरा, रूढी, अनिष्ट प्रथा यांविरुद्ध आर्यसमाजाने शंभर वर्षे आंदोलन चालविले आहे व त्याचा थोडाफार परिणाम समाजजीवनावर निश्चितच झालेला आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. मूर्तिपूजा, विभूतिपूजा, अवतारवाद, जादुटोणा, ज्योतिष, लग्न व इतर प्रसंगी पत्रिका पाहणे, शुभाशुभ शकुन, अनेक व्रतवैकल्ये याविरुद्ध आर्यसमाजाने बंड पुकारले. हुडाबंदी, जातीयतानिर्मूलन, आंतरजातीय विवाहांना सक्रिय प्रोत्साहन इत्यादी सामाजिक सुधारणांचा हिरीरीने पुरस्कार हे आर्यसमाजाचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. वैदिक धर्मात आपल्या मूळ धर्मग्रंथात या अंध परंपराना स्थान नाही हे आर्यसमाजाचे प्रतिपादन धर्मप्राण असलेल्या विशाल भारतीय समाजाच्या पचनी पडणे अधिक सुलभ आहे. क्रांतिकारक बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेपेक्षाही हा 'मध्यममार्गी सुधारणावाद' अंमलात आणणे समाजपुरुषाला अधिक सोयीचं आहे, हा व्यावहारिक उपयोगही मोठा आहे.

तत्त्वाप्रमाणेच प्रत्यक्ष कार्यfunctional approach हे एखाद्या संघटनेच्या यशापयशाचे गमक किंवा लक्षण मानले तर आर्यसमाज हे सुधारणावादी सामाजिक आंदोलन आहे यात सशय नाही. राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक सुधारणा याचा सुदर समन्वय करून भगतसिंग, रामप्रसाद बिस्मिल, चंद्रशेखर आझाद, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, महात्मा हंसराज असे क्रांतिकारक व समाजसुधारक आर्यसमाजाने देशाला दिले आहेत. महाराष्ट्रात जी बुद्धिप्रामाण्यवादी मोठी परंपरा झाली त्यात लोकहितवादीचा समावेश अभ्यंकराच्या लेखात आहे. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख आर्यसमाजीच होते व आर्यसमाजमंदिरात नेहमी प्रवचने देत असत. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंदसरस्वतीचे ते चाहते होते व दोघेही परम स्नेही होते. दोघाचा पत्रव्यवहार व भेटीगाठी होत.

३१ जानेवारी ८१ — प्रा. देवदत्त तुंगार, चिंचवड, पुणे १९.

¤ 'माणूस'च्या ताज्या अंकात (२४ जानेवारी, ८१) आपण 'कविता दशकाची' या ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या कविता–संग्रहावरील चर्चासत्राबद्दलचा वृत्तलेख दिला आहे. या वृत्तलेखाला आपण बरीच जागा दिली याबद्दल 'कविता–दशकाची'चा संयोजक आणि 'ग्रंथाली'चा एक कार्यकर्ता या नात्याने मी आपले आभार मानतो. वृत्तलेखाच्या गुणवत्तेची चर्चा करण्याचा माझा इरादा नाही; पण त्यातल्या दोन चुकाकडे मी आपले आणि आपल्या वाचकाचे लक्ष वेधू इच्छितो.

वार्तालेखांच्या शीर्षकामध्ये या चर्चासत्राचे वर्णन 'ग्रंथाली चर्चासत्र' असे करण्यात आले आहे; पण हे चर्चासत्र 'ग्रंथाली' ने आयोजित केलेले नव्हते. पुण्याच्या महाविद्यालयातील भित्तिपत्रके चालविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संघटनेने आणि फर्गसन महाविद्यालयातील 'साहित्य–सहकार' संस्थेने मिळून हे चर्चासत्र आयोजित केले होते विद्यापीठाचे निरंतर शिक्षणकेंद्र, विद्या सहकारी बँक यांच्याप्रमाणेच ग्रथालीने संयोजकाना आर्थिक सहाय्य दिले होते.

वृत्तलेखाचे लेखक सतीश (कामत?) म्हणतात की, 'सामाजिक आशय लाभलेल्या कविता या संग्रहात पाचसुद्धा नाहीत.' (पृ. २५) संग्रहाचा वाचक यावर एवढेच म्हणेल की सतीशमहाशयानी हा संग्रह वाचलेला नाही! नारायण कुलकर्णी कवठेकर, उत्तम कोळगावकर, अशोक बागवे या


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : छत्तिसावा

७ फेब्रुवारी १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

तिघाच्या जवळजवळ प्रत्येक कवितेला सामाजिक आशय लाभलेला आहे. विशेषत: नारायण कुलकर्णी कवठेकर याची कविता विंदा करंदीकर आणि नारायण सुर्वे यांच्या परंपरेतील आणि तितकीच कसदार व ठोस आहे. **झाड** (पृ. ७७), **गढी** (पृ. ७८), **प्रभात, नंदीबैल** (पृ. ८०) **उत्तर** (पृ. ८१), **रंग** (पृ. ८२–८३) आणि **'एका सामान्याचे स्वगत'** (पृ. ८३–८४) या कुलकर्णी–कवठेकराच्या कविता वृत्तलेखक सतीश यानी पुन्हा एकदा पुस्तक, दोन-तीन तासापुरते का होईना, घेऊन वाचाव्यात ही विनंती.

संग्रह 'प्रातिनिधिक' आहे की नाही याला 'आहे' आणि 'नाही' ही दोन्ही उत्तरे संभवतात. १९७० ते ८० किंवा १९८० ते ९० या दशकातील सर्व मराठी कवितेचे प्रतिनिधित्व हा संग्रह करीत नाही आणि तो त्याचा उद्देशही नव्हता. 'ज्याचा एकही संग्रह प्रसिद्ध झालेला नाही आणि जे येत्या दशकात (major) कवी ठरण्याची शक्यता आहे' अशा कवींचा हा प्रातिनिधिक संग्रह आहे असे आम्हाला (ग्रथालीला) वाटते. याबद्दलचा अतिम शब्द येत्या दशकाचाच असेल !

२४ जानेवारी **प्रभाकर नारायण परांजपे,**
पुणे

[प्रा. प्र. ना. परांजपे याचे पत्र वाचले. त्यातील पहिला मुद्दा तात्रिक व फारसा महत्त्वाचा नसल्याने त्याबावत मत व्यक्त करण्याचे कारण नाही; पण त्याच्या पत्रातील 'कविता दशकाची'मध्ये असणाऱ्या कवितामध्ये जाणवणाऱ्या सामाजिक आशयाबाबतचा दावा मात्र अतिव्याप्त वाटत असल्याने त्यासबधीचे मत येथे व्यक्त करत आहे.

अर्थात माझ्या वृत्तलेखात '*सामाजिक आशय लाभलेल्या कविता या संग्रहात पाचसुद्धा नाहीत.*' या विधानापाठोपाठच 'प्रत्येक संग्रहात तशा काही कविता शोभेदाखल असल्याच पाहिजेत असा माझा वैयक्तिक अजिबात आग्रह नाही; पण १९८० किंवा १९९० च्या दशकातली कविता अशा कविताविषयी फार फार अपूर्ण वाटेल', असेही विधान मी केलेले आहे. त्याची इथे पुन्हा एकवार नोंद करतो.

आता माझ्या मते, वादाचा मुख्य मुद्दा असा की, 'कविता दशकाची'मध्ये सामाजिक आशय असलेल्या कविता आहेत किंवा नाहीत ? असल्यास त्याचे प्रमाण किती ? तशा प्रकारच्या कविता या सग्रहात नाहीतच, असे टोकाचे विधान मीही केलेले नाही. मला यातून एवढेच सुचवावयाचे आहे की, अशा कवितांची सख्या जवळजवळ नगण्य आहे.

संग्रहाचे संयोजक प्रा. प्र. ना. परांजपे यानी हा आक्षेप खोडून काढण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करूनही संग्रहामध्ये असलेले दहा कवी व त्यांच्या शंभर कवितापैकी प्रा. पराजपे याच्याही मते फक्त तीन कवीच्या (सुमारे ३३ टक्के) सात कविता सामाजिक आशयाने सपृक्त असल्याचे त्यांच्याच विधानावरून लक्षात येईल. त्यातही पुन्हा त्यांनी नावे तीन कवीची असली तरी पत्रामध्ये उद्धृत केलेल्या सर्व कविता त्यापैकी एकाच कवीच्या आहेत. (नारायण कुळकर्णी कवठेकर) उरलेल्या दोन कवीच्या एक-दोन कविताचा तरी प्रा. परांजपे यानी उल्लेख करावयास हवा होता. माझ्यासारख्या नवागताला तो निश्चितच मार्गदर्शक ठरला असता.

यावर असाही मुद्दा उपस्थित होऊ शकतो की, खरे म्हणजे 'कविता दशका'मधील प्रत्येकच कवीच्या बहुतेक सर्वच कविता सामाजिक आशयाने सपृक्त आहेत; पण विस्तारभयास्तव प्रा. पराजपे यानी त्यातील तीनच कवीचा आणि त्याच्यातील फक्त एकाच्याच सात कवितांचा आपल्या पत्रात वानगीदाखल उल्लेख केला आहे. असे जर खरेच घडले असेल तर प्रा. परांजपे यानी तसा संकोच करावयास नको होता. एकदा एखाद्या माणसाच्या ऐपतीबद्दल शका घेतल्यावर तो जसा स्वत.ची सर्व धनदौलत पसरून शंका घेणाऱ्याचे डोळे दिपवून टाकतो त्याप्रमाणे प्रा. पराजपे यांनी करावयास हवे होते; पण तसे न झाल्यामुळे या संग्रहात प्रा. पराजपे याच्याही मते फक्त तीनच कवीच्या कविता सामाजिक आशयाने सपृक्त आहेत, असा नवा गैरसमज पसरण्याची शक्यता आहे.

आता प्रा. पराजपे यानी उद्धृत केलेल्या नारायण कुळकर्णी कवठेकर यांच्या सात कविताचे मोठ्या प्रयासाने तिसऱ्यांदा वाचन करूनही प्रा. परांजपे याना त्यामध्ये जाणवलेला आशय मला जाणवला नाही. कुठे तरी एखादी प्रतिमा, एखादा धीट उल्लेख किंवा एकाच प्रतिमेची कंटाळवाणी पिंजण केल्याने कवितेला सामाजिक आशय प्राप्त होत नाही. अर्थात कोणतीही कविता समोर ठेवली तरी तिचे विश्लेषणच अशा तऱ्हेने करावयाचे की, ज्यामधून आपल्याला हवा असलेला आशय व्यक्त होऊ शकेल, हीही कला हल्ली अनेकांना साध्य झालेली आहे. त्याच चर्चासत्रात सग्रहातील एक कवी श्री. र. कृ. जोशी ज्या तऱ्हेने स्वत ची 'दृश्य कविता' स्पष्ट करून सागत होते ती तऱ्हा किंवा ती पद्धत याचेच उत्तम उदाहरण ठरू शकेल. एवढे कशाला, या कवीच्या कवितांपूर्वी श्री. दया पवार यानी लिहिलेली प्रस्तावनाही याच प्रकारची आहे, पण संग्रहातील प्रस्तावनावर अधिक भाष्य मी करण्याची गरज नाही. प्रसिद्ध समीक्षक प्रा. स. शि. भावे याचा एक फेब्रुवारीच्या 'सकाळ'मधील लेख त्या दृष्टीने पुरेसा उद्बोधक आहे.

पण तरीही आपण असे धरून चालू की, 'कविता दशकाची' हा सग्रह म्हणजे सामाजिक आशयाने संपृक्त असलेल्या (कवींचा ?) आणि कवितांचा संग्रह आहे. मग मी असे म्हणेन की, प्रा. पराजपे यांच्यासारख्यांना सग्रहात ठायी ठायी जाणवणारा हा आशय मला मात्र पाच ठिकाणीही सापडला नाही, प्रभावित करू शकला नाही. कारण शेवटी 'सामाजिक आशय' म्हटल्यावर मला काय अभिप्रेत आहे आणि प्रा. पराजपे यांना काय अभिपेत आहे, यावर किमान सापेक्षतेच्या मर्यादा येणारच. या सातही कविताच्या सदर्भात आता मी एवढेच म्हणू इच्छितो की, या सात कवितापैकीही बहुतेक कवितामध्ये प्रा. परांजपे म्हणतात तसला सामाजिक आशय असलाच तरी तो व्यक्तिगत निराशा आणि वैकल्यग्रस्ततेच्या भावनेने किडलेला आहे. मला असा आशय अभिप्रेत नाही

संग्रहाच्या प्रातिनिधिकतेबद्दल काहीही मत व्यक्त करण्याची माझी इच्छा नाही.

शेवटी फक्त प्रा. पराजपे याचे आभार. त्यांनी हा संग्रह मला दोन-तीन तासाकरिता का होईना, पण पुन्हा हातात धरायला लावल्याबद्दल आणि सग्रहाच्या वाचकाचा माझ्याबद्दलचा गैरसमज दूर करण्याची सधी दिल्याबद्दल !

**—सतीश कामत, पुणे ]**

पुणे वार्ता

# मिरासदारांचे ‘ दशावतार ’ प्रकाशित

## एक रंगलेला समारंभ

शुक्रवार, ता. ३० जानेवारी. पुण्यातलं मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचं सभागृह. दारातच सुपर्ण प्रकाशनचे वसंतराव मिरासदार सर्वांचं प्रसन्नपणे स्वागत करत उभे. आतमध्ये डाव्या हाताला प्रसिद्ध साहित्यिक द. मा. मिरासदार याचे साहित्य माडलेलं. उजव्या हाताला सभागृहाच्या प्रवेशद्वारातच अत्तर आणि गुलाबाची फुलं देऊन मंडळीचं स्वागत. सबंध वातावरणात कमालीचा अनौपचारिकपणा आणि कौटुंबिक जिव्हाळा.

प्रा. द. मा. मिरासदार याच्या दहा विनोदी कथा–लेख–संग्रहाचं संचरूपात आज या ठिकाणी पुनः प्रकाशन होणार होतं. सुपर्ण प्रकाशनतर्फे ही दहाही पुस्तकं प्रसिद्ध होत होती. प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक प्रा. गंगाधर गाडगीळ समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते आणि महाराष्ट्र बँकेचे संचालक डॉ. वसंतराव पटवर्धन याच्या हस्ते हे प्रकाशन होणार होतं. शिवाय व्यंकटेश माडगुळकर, डॉ. विद्याधर पुडलिक, प्रा. बाळ गाडगीळ, ‘सोबत’चे संपादक ग. वा. बेहरे इत्यादींची या प्रसंगी भाषणं होणार होती. त्यामुळं कार्यक्रमाला सुरुवात होण्यापूर्वीच हॉल श्रोत्यांनी भरून गेला होता.

कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथम उपस्थितांचं स्वागत करताना श्री. वसंतराव मिरासदार म्हणाले, ‘प्रा. द. मा. मिरासदारांचं १९५७ ते १९७७ या वीस वर्षांतलं विपुल लेखन समग्रपणे आणि साकल्यानं वाचकांसमोर ठेवावं या उद्देशानं मिरासदारांची ही पुस्तकं आज सुपर्ण प्रकाशनतर्फे प्रकाशित होत आहेत.’

त्यानतर प्रा. मिरासदारांच्या या ‘ दशावतारां ’ चं प्रकाशन झाल्याचं डॉ. वसंतराव पटवर्धन यांनी जाहीर केलं. त्या वेळी, ‘मिरासदारांच्या लिखाणाचा मी फार पूर्वीपासून चाहता आहे, ’ असं सागून डॉ. पटवर्धन पुढे म्हणाले, ‘केवळ हलक्या–फुलक्या विनोदी कथा म्हणजे मिरासदाराचं खरं साहित्य नाही. त्यांच्या या साहित्याचा तोडवळा जरी विनोदाचा असला तरी सामाजिक जाणिवेतून हे साहित्य निर्माण झालं आहे आणि त्याला कारुण्याची डूब आहे; पण अनेक वेळा असं वाटतं की कार्लाइल या लेखकाला आपला आदर्श मानून मिरासदारांनी हे सर्व वाङ्मय लिहिलं असावं. कारण त्याच्या व याच्या शैलीमध्ये विलक्षण साम्य आढळतं.’

प्रा. बाळ गाडगीळ म्हणाले, ‘साहित्यातील विनोदाला मराठी माणूस थोडं अंग चोरून दाद देतो, असं अनेकदा वाटतं. त्यानं जरा जास्त मोकळ्या मनाने विनोदाला दाद दिली पाहिजे.

‘ मिरासदाराच्या साहित्याबद्दल बोलायचं झालं तर मी असं म्हणेन की या साहित्याचं जितकं खोल समीक्षण व्हायला हवं होतं तितकं आजपर्यंत झालेलंच नाही. विशेषतः मिरासदारांच्या गोष्टीवेल्हाळ शैलीचं अधिक खोलवर जाऊन विश्लेषण आणि समीक्षण केलं पाहिजे.’

प्रा. मिरासदाराच्या साहित्याबद्दल तक्रार करून ‘ सोबत ’ चे संपादक ग. वा. बेहरे आपल्या भाषणात म्हणाले, ‘ मिरासदारांनी जास्तीत जास्त लिखाण केलं पाहिजे. ते केवळ हलकं–फुलकं व विनोदीच लेखन करू शकतात असं नाही, तर क्षणक्षणीत राजकीय लेखही त्याच्या लेखणीतून कसदारपणे उतरतात, हे मी पाहिलेलं आहे. मिरासदारांनी अशा झणझणीत व विनोदी लेखांकडे पुन्हा वळावं. कारण आमच्यासारखी माणसं शभर लेख लिहून जे साधू शकत नाहीत ते एका क्षणक्षणीत व विनोदी लेखातून साधता येतं. कारण आम्ही सर्वांगावर वार करत असतो; पण मिरासदारांच्या शैलीतले लेखक नेमका वर्मावर वार करतात आणि त्यातून फार मोठा परिणाम साधला जातो. तेव्हा सामाजिक सुधारणांसाठीसुद्धा सकस, निर्भेळ व मिश्किल लिखाणाची गरज आहे.’

बेहऱ्यांनंतर प्रसिद्ध कथालेखक व मिरासदारांचे जुने स्नेही व्यंकटेश माडगुळकर बोलायला उठले. अत्यंत अनौपचारिक शैलीत स्वतःचे विचार मांडताना श्री. माडगुळकर म्हणाले, ‘ मराठी साहित्याच्या क्षेत्रात गावाकडच्या वाटा अनेक जणानी चोखाळल्या; पण मिरासदारांनी त्यामधूनही स्वतःची अशी नवीन पायवाट शोधून काढली. ती पायवाट म्हणजे जानपदजीवनात जाणवणाऱ्या निर्व्याज विनोदाची व त्यामुळं त्यांच्या कथा या केवळ विनोदी कथा नाहीत, तो एक सामाजिक दस्तऐवज आहे.’

माडगुळकरांची आणि मिरासदाराची गेली जवळजवळ तीस वर्षांची मैत्री. त्यामुळं या सबंध काळातील मिरासदारांबद्दलचे आणि मिरासदारांबरोबरचे विविध अनुभवही माडगुळकरानी गप्पांच्या मैफलीत किस्से सागावेत तसे छान रंगवून सांगितले. परस्परांना पुरवलेली कथाबीजं आणि पंढरपूरला मिरासदाराचं वास्तव्य असताना तिथे भेटलेली माणसं यांचंही उत्कृष्ट चित्र माडगुळकरानी श्रोत्यांसमोर उभं केलं.

माडगुळकरांनंतर क्रम होता डॉ. विद्याधर पुडलिकांचा. अर्थात अशा खुसखुशीत भाषणानंतर पुडलिक कसे बोलतात, याबद्दल अनेकाना कुतूहल होतं आणि माडगुळकराचीच हलकीफुलकी शैली पुढे खेळवत व मध्येच एखादा विचार करायला लावणारा मुद्दा मांडत पुडलिकांनीही श्रोत्यांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. आपल्या भाषणात ते म्हणाले ‘मिरासदार हा अतिशय निर्मळ मनाचा विशुद्ध माणूस. आळस, कंटाळा याचीही चैन त्यांनी उपभोगली आणि त्यामधूनच उत्कृष्ट साहित्यही निर्माण केलं. त्यांच्या लेखनातील विनोदाला चढ–उतार नसतात. तो अखेरपर्यंत पाझरत जात असतो. कै. चिं. वि. जोशी याच्यानंतर विनोदी मराठी कथा अधिक बदिस्त व रेखीव करण्याचं श्रेय मिरासदारांकडेच जातं.

‘मिरासदाराच्या साहित्यात भेटणारी माणसंही मोठी गंमतीदार असतात. या माणसांच्या स्वभावात खोडयाळपणाचेसुद्धा

(Mischief) अनेक प्रकार जाणवतात. त्यातले काही निरागस असतात, काही निष्पाप.

'मिरासदारानी उपहासात्मक किंवा झणझणीत विनोदी लिखाण करावं, अशा सूचना केल्या जातात; पण तसं लेखन त्याच्याकडून होईल असं मला वाटत नाही. कारण जीवनावर अतिशय प्रेम करणारा हा माणूस आहे.'

मिरासदारांबद्दल, त्यांच्या लेखनाबद्दल विविध प्रकारची मतं व्यक्त करणारी अशी ही चार-पाच भाषणं झाल्यावर आता स्वतः मिरासदरांनीच काही तरी बोलावं, अशी सर्वांचीच अपेक्षा होती. प्रा. गंगाधर गाडगिळानीही त्यांना आग्रह केला. मिरासदार बोलायला उठले.

'गोष्ट नावाचा प्रकार माझ्या रक्तातच भिनलेला आहे,' अशी सुरुवात करून माडगुळकरांप्रमाणेच श्रोत्यांशी गप्पा मारत मिरासदार बोलू लागले. ते म्हणाले, 'गोष्ट लिहिण्याचं आणि गोष्ट सागण्याचं वेड मला आहे. त्यामुळं गोष्ट सांगताना जे माझ्या मनात असतं तेच मी लिहीत असतो.

'याचबरोबर मनुष्यस्वभावाविषयी मला नेहमीच एक प्रकारचं कुतूहल वाटत आलेलं आहे माझं असं मत आहे की, ज्याला जीवनातली संगती चागल्या प्रकारे लावता येते तो कवी होतो आणि ज्याला जीवनातल्या विसंगतीवर नेमकं बोट ठेवता येतं तो विनोदी लेखक बनतो. मी जीवनातल्या या विसंगतीच जास्त शोधत असतो.

'अर्थात त्यामुळे माझ्या स्वतःच्या कल्पनाविलासापेक्षाही कुठे तरी पाहिलेलं, ऐकलेलंच साहित्य निर्माण करतानाही वापरता येतं.' असं सांगून मिरासदारानी एक मस्त किस्सा सुनावला.

'एकदा मी एस. टी.ने प्रवास करत होतो. माझ्या बाकावर दोन गावाकडची मंडळी बसली होती. त्यातला एकजण दुसऱ्याला म्हणत होता, 'तुझं नाव आता सरकारलाच सांगायला पायजे!' दुसरा म्हणाला, 'का रे बाबा, काय झालं?' 'नाही म्हणजे तू आता असं काही झक्कास बोललास की सरकारला, तुझ्या नावानं एक पोस्टाचं तिकिटच काढायला सांगितलं पायजे!' दुसरा चटकन म्हणाला, 'नको रे बाबा. ते पोष्टाचं तिकीट! सगळी लोक आपली मागून थुका लावतात आणि वरून बुक्क्या मारतात!'

सगळं सभागृह हास्यकल्लोळात बुडून गेलं!

शेवटी समारंभाचे अध्यक्ष प्रा. गंगाधर बोलायला उभे राहिले.

'मिरासदारांच्या साहित्याचं मला जाणवणारं पहिलं वैशिष्टय म्हणजे त्यांनी कोल्हटकर, गडकरी, अत्रे या परंपरेत जखडलेल्या विनोदाच्या बाहेर पडून स्वतंत्र विनोदी साहित्य निर्माण केलं. त्यामुळं विडंबन, उपहास, शब्दाश्रयी कल्पकता या गोष्टीना त्यांच्या विनोदात फारसा थारा नसतो. कोटी करण्याचा विनोदी साहित्य निर्माण करणाऱ्याना वारंवार पडणारा मोह सतत टाळून मिरासदारांनी आपलं लेखन केलं. त्यामुळं त्यांच्या विनोदामध्येही एक सहजता आलेली आहे.

'विनोदी लिहायचं म्हणजे कामुकता किंवा लैंगिकता यावर आधारितच विनोद निर्माण करावे लागतात, असा एक समज आहे. त्याचे फायदे असले तरी अशा प्रकारच्या विनोदाला अनेक मर्यादाही असतात. मिरासदारांनी विनोदाचा हा प्रकार चांगल्या तऱ्हेनं बाजूला सारला आहे.

'ग्रामीण जीवनावर आधारित विनोदी साहित्य निर्माण करायचं तर लेखनाची भाषाही ग्रामीणच असली पाहिजे, या कल्पनेलाही मिरासदारांनी फाटा दिला आणि शुद्ध शहरी भाषा वापरून ग्रामीण जीवनातली चित्रं रंगवणारं उत्तम विनोदी साहित्य निर्माण केलं. तसंच अशा प्रकारच्या साहित्यात आढळणारा विनोदाचा बटबटीतपणाही मिरासदारांच्या लिखाणात जाणवत नाही.

'मिरासदारांच्या व्यक्तिमत्त्वात एक सुखद सौम्यपणा आहे आणि तो त्यांच्या साहित्यातही उतरला आहे. सर्वच माणसं शेवटी निर्व्याज असतात, यावर त्यांचा दृढ विश्वास असावा म्हणूनच त्यांच्या लेखनामध्ये मनुष्यामधील या अंतिम निर्व्याजतेचं दर्शन घडतं.'

¤

सुमारे अडीच तास चाललेला हा समारंभ त्याचं बाह्य रूप जरी औपचारिक प्रकाशनाचं होतं तरी त्याच्या आतून एक गाढ स्नेहाचा, कौटुंबिक जिव्हाळ्याचा स्रोत अखंडपणे वाहात होता म्हणूनच इतके वक्ते बोलूनही या यादीत श्री. शंकर पाटील असते तर आणखी मजा आली असती, असंच काहीजण सभागृहातून बाहेर पडताना बोलत होते.

मिरासदारांविषयी, त्यांच्या लेखनशैलीविषयी अनेकांनी अनेक प्रकारची मतं माडली आणि त्यातून मिरासदारांचं 'साहित्यिक मिरासदार' आणि 'माणूस मिरासदार' अशी दोन्ही रूपं श्रावणातल्या ऊन-पावसासारखी खुलत गेली. त्यामुळंच भारदस्त नावं असणारे वक्ते बोलावून प्रकाशनसमारंभाचा दणका उडवून द्यायची प्रथा हल्ली बोकाळत चालली असली तरी हा समारंभ उपस्थितांच्या दीर्घ काळपर्यंत स्मरणात राहील तो त्यातल्या वक्त्यांच्या यादीमुळं नाही, तर त्यातून मिळालेल्या आत्मिक आनंदामुळं!

—प्रतिनिधी.

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**
**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी ( सचित्र )
किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# निपाणीतील स्त्रीकामगारांचा बदलता 'मूड'

आनंद आगाशे । प्रवीण वाळिंबे

निपाणीचा परिसर म्हणजे खरोखरच एक 'विचित्र विश्व' आहे. पराकोटीचं दारिद्र्य आणि कीड लागेल इतकी श्रीमंती. ही सावत्र भावंडं इथं वर्षानुवर्षं गळ्यात गळा घालून नादत आहेत. इथं दारं नसलेल्या खोपटाच्या भाऊगर्दीत तुरळक तीन-चार मजली अलीशान उन्मत्त इमलेही आढळतात ह्या गावात वर्षाला पाच-दहा कोटींची उलाढाल करीत आयुष्याचा (स्वतःच्या आणि शक्य होताच इतरांच्याही!) यथेच्छ उपभोग घेणाऱ्या मोजक्या महाभागाबरोबर दिवसाकाठी जेमतेम ५ रुपयावर गुजराण करत आयुष्य कंठणारे असख्य, असहाय जीवही पाहायला मिळतात. पिण्यासाठी स्वच्छ, तंबाखूविरहित पाणी मिळणे येथील काही सहस्र स्त्रियाना मुष्किल असेलही; पण दिवसरात्र धनवृद्धीच्या चितेनं शिणलेल्या लक्ष्मीपुत्रांच्या सेवेसाठी डिंपल–डिप्लोमॅटच्या बाटल्यांनी सजलेली दुकानं मात्र सदा सज्ज असतात! थोडक्यात म्हणजे, 'विविधतेतील एकात्मतेनं' परिपूर्ण भारतीय संस्कृतीत येथील एकूण प्रकरण फिट्ट बसतं खरं!

कोल्हापूरपासून २५ मैलावर कर्नाटकच्या हद्दीत असलेल्या निपाणीला तंबाखूव्यवसायाची किमान १०० वर्षांची परंपरा आहे. १८८३ मध्ये येथे तंबाखूची पहिली मोठी वखार सुरू झाली. त्याआधीही कित्येक वर्षं येथे घरगुती प्रमाणावर हा व्यवसाय चालू होताच. सध्या दरवर्षी साधारण ४०० कोटी रुपयाच्या तंबाखूची उलाढाल ह्या गावात होत असते. निकोटीनच्या जास्त प्रमाणासाठी प्रसिद्ध असलेला ह्या परिसरातील तंबाखू, विडी आणि जर्दा ह्यासाठी वापरला जातो. आजूबाजूच्या भागातील सर्व शेते तंबाखूच्या मोठ्या हिरव्या पानांनी भरून गेलेली दिसतात. तंबाखूखेरीज अन्य कोणताही व्यवसाय इकडे अस्तित्वात नाही. साधारण पन्नासएक मालकाच्या ८० वखारीमध्ये तंबाखूवरील प्रक्रियेचे काम अव्याहत चालू असते. ह्या सर्व व्यापाऱ्यांमधील सर्वात प्रमुख मक्तेदार समजले जातात 'टोबॅको किंग' देवचंद शहा! ह्याचा पूर्वी सरकारने 'पद्मभूषण' देऊन गौरवही केलेला आहे. शहा आणि आणखी दोन-चार व्यापाऱ्यांच्या हाती येथील आर्थिक, राजकीय सूत्रं आहेत.

निपाणीचं वैशिष्ट्य असं आहे की, येथे प्रथम वखारी उभ्या राहिल्या आणि मग त्याच्या आजूबाजूला गाव वसले. त्यामुळे आज ह्या सर्व वखारी अगदी भरवस्तीत आल्या आहेत. सर्व वखारीची रचना साधारणपणे एकसारखीच असते. सुमारे ४० × ५० फुटांचा एक हॉल. त्याला अनेक दारं व खिडक्या; पण त्यातील फक्त एकच दार उघडे असते. गावाला तंबाखूच्या धुळीचा त्रास होऊ नये म्हणून बाकीची दारे-खिडक्या बंद ठेवल्याचे सागण्यात येते. छताची काही कौले काढून प्रकाशाची तिरिप आत येईल अशी व्यवस्था केलेली. याखेरीज ४-५ बल्बही टांगलेले असतात. मात्र त्यांनी कायम प्रकाश द्यायलाच पाहिजे असे त्याच्यावर बंधन नाही. कोणी पाहुणे किंवा इन्स्पेक्टर मडळी यदाकदाचित आलीच, तर मात्र हे दिवे आपले काम नीट बजावतात. इतक्या अंधुक प्रकाशाचा एक फायदा असावा. आत आलेल्या माणसाच्या नाकातोंडात तंबाखूची धूळ शिरली, तरी ती प्रत्यक्ष हवेत मात्र नीटशी दिसू शकत नाही! एक्झॉस्ट पख्याचा वगैरे तर प्रश्नच नाही. प्रत्येक वखारीत काम करत असलेल्या सुमारे १००–१२५ स्त्रिया नाकाला पदर गुडाळून राबत असतात. त्यामुळे फक्त वस्त्रगाळ तंबाखूची धूळच फुप्फुसात जाते. शेतातून आलेल्या तंबाखूला पाणी लावून 'चाकी' करणे, कुटणे व आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या आकाराच्या जाळ्यामधून तंबाखू गाळणे अशी कामे वखारीत चालू असतात. ह्याखेरीज काही वखारीमध्ये काडी दळण्याचे मशीन असते. तेथे तर ६ फुटांवरची व्यक्ती दिसू शकत नाही, इतकी तंबाखूची धूळ हवेत भरलेली असते. बाहेरगावच्या माणसाला तेथे सलगपणे १ मिनिटसुद्धा थाबणे अशक्य होते. ठसका लागून, खोकून जीव बेजार होतो, डोळ्यातून पाणी येते; पण आठ-दहा तास अविरतपणे त्या मशीनपाशी काम करणाऱ्या ह्या कामगार स्त्रियाना तंबाखूच्याच श्वासोच्छ्वासाची बहुधा सवय झालेली असावी. शुद्ध हवेत श्वासोच्छ्वास करणे त्याना सोसेल की नाही याचीच शका येते!

दुसऱ्या महायुद्धातील Concentration Camps ची ही बहुतेक नवी आवृत्ती असावी!

सुमारे १० ते १२ हजार स्त्रिया येथील वखारीमध्ये राबत असतात. गेल्या वर्षापासून 'तंबाखू स्त्री-कामगार संघटना' स्थापन झाल्यापासून त्याची स्थिती इतपत बरी आहे. त्याआधी कित्येक वर्षे तर त्यांच्या शोषणाला सीमाच नव्हती. निपाणीच्या सभोवताली ५-६ मैलाच्या परिसरात असणाऱ्या सौंदलगा, येरनाळ, शिरगुट्टी, शिप्पूर, शेंदूर, तवगी, अक्कोळ इ. गावातून ह्या स्त्रिया कामाला येतात. युनियन स्थापन होण्यापूर्वी कामाचे निश्चित तास नव्हते. सकाळी ८ वाजता सुरू झालेले काम रात्री १०-१२ वाजेपर्यंतसुद्धा चालत असे ह्या काळात जेवायला तासाभराची सुट्टी मिळे तेवढीच. अन्यथा तान्ह्या मुलाला पाजण्यासाठीसुद्धा वखारीतून बाहेर जायची मुभा नाही. इतक्या लहानपणापासून तंबाखूमय वातावरणात वाढल्याने ही मुले लवकरच तंबाखूला immune बनतील अशी मालकाची कल्पना असणार! रोजंदारीचे काम असल्याने सकाळी ८ च्या आत वखारीत हजर होणे ह्या बायकाना भागच पडत असे. त्यामुळे सकाळी ६-३०–७ ला घरातून चालत-पळत निघायचे, पळता-पळताच भाकरीचे तुकडे गिळायचे आणि काही करून ८ च्या आत वखारीत पोहोचायचे हे ठरून गेले होते. कुत्रं सुद्धा पळता-पळता थाबून तुकडे गिळतं, तेही या बायकांना शक्य नव्हते. कारण ८ ची वेळ टळून गेली की, त्या दिवशीची रोजी बुडाली! काम असेल त्याप्रमाणे रात्री १०-१२ वाजेपर्यंत वखारीत राबायचे आणि केलेल्या १२-१४ तासांच्या कामाची ५-७ रुपये मजुरी घेऊन घराकडे परतायचे असा एकूण दिनक्रम असे. घरी गेल्यावर घरची कामे चुकतात थोडीच? ह्या बायकांचे कौटुंबिक आयुष्य काय असेल त्याची कल्पनाच करवत नाही. एका कामगार स्त्रीचेच हे वाक्य बरेच काही सागून जाते– 'पोरं झाली; पण शिंगार काय झाला नाही!'

रोजचे १२–१४ तास वखारीच्या कोंडवाड्यात असणाऱ्या बायका सतत मालकांच्या किंवा त्यांच्या दिवाणजीच्या नजरेसमोर असत. त्यामुळे 'बऱ्या दिसणाऱ्या' कोणत्याही स्त्रीवर कबजा करणे फारशी कठीण बाब नव्हती. अशी किती तरी उदाहरणे इथे घडली आहेत. दारिद्र्याने पिचलेल्या त्या स्त्रीला 'नाही' म्हणणे शक्यच नसे! झालेला अत्याचार घरात सांगूनही काय उपयोग? कारण नवरासुद्धा कोठे तरी अल्पभूधारक–शतमजूर–विडीकामगार म्हणून वावरत असणार. त्याची भाकरीसुद्धा पूर्णपणे मालकमंडळीच्या कृपेवर अवलंबून!

मलपृष्ठ १ वर

मुक्ताफळे

# ‘ गा बाळांनो श्रीरामायण ! ’

डॉ. विश्वेश्वर अगडबंबवार हे नाव तुम्ही कधी ऐकलंय का ? नाहीच ऐकलेलं असणार. आम्हीदेखील गेल्या आठवड्या-पर्यंत यांचं नाव ऐकलेलं नव्हतं. गेल्या आठ-वड्यात आम्ही विदर्भाच्या या विचारवंताला प्रत्यक्ष भेटलो.

आपण पश्चिम महाराष्ट्रात ज्या विचार-वंतांची नावे पुनःपुनः ऐकतो त्यातले हे नाव नाही. डॉ. अगडबंबवार हे कला आणि शास्त्र या दोन्ही क्षेत्रात मान्यता पावलेले परंतु प्रसिद्धिपराङ्मुख असे विचारवंत आहेत, हे त्यांच्याशी चार शब्द बोलताच आमच्या ध्यानात आले.

आम्ही त्यांच्या भेटीला गेलो तेव्हा ते पुण्याला आपल्या जावयाकडे उतरलेले होते. एका जाडजूड ग्रंथाचे ते पडल्यापडल्या परि-शीलन करीत होते. आम्ही सुरुवातीलाच त्यांना म्हणालो–

‘आपल्यासारख्या थोर विचारवंताचे नावही इकडे कुणाला ठाऊक नाही, हे कसे?’

डॉ. अगडबंबवार म्हणाले–

‘तुमच्या इकडे, सरकारच्या मंत्र्यावर टीका करणारी पत्रके अधूनमधून जे प्रसव-तात, त्यांनाच विचारवंत समजण्याची चाल दिसते ! आम्ही त्यातले नाही. आम्ही नेहरू घराण्याचे ठाम पाठीराखे आहोत इतरांना असे वाटते की, ज्या अर्थी आम्ही पत्रके काढीत नाही, त्या अर्थी इंदिरा पाठीराख्यात कुणी विचारवंतच नाही. आज देशापुढे मह-त्त्वाचा प्रश्न काय आहे ?’

‘दारिद्र्याचा !’ आम्ही नेहमी ऐकलेलं ठोकून दिले.

‘चूक–’ डॉ. अगडबंबवार जोराजोराने मान हलवीत म्हणाले, ‘साफ चूक !’

‘लोकसंख्येचा !’

‘मुळीच नाही. म्हणजे तो प्रश्न असेल; पण सर्वात महत्त्वाचा प्रश्न काय आहे ?’

आम्ही हे कोडे सोडवण्याचा नाद सोडला अशी खात्री पटताच, डॉ. विश्वेश्वर अगडबंब-वार म्हणाले–

‘नेहरू घराण्याची सत्ता या देशात अखंड कशी राहील हा ज्वलंत प्रश्न आहे. युवानेते संजय गांधी याचे दुःखद निधन झाले आणि प्रश्न ज्वलंत झाला. राजीव गांधी राजकार-णात कदाचित येतीलही– पण त्याने प्रश्न सुटणार कसा ?’

‘का ? सुटेल की ! त्यांना मुलगा आहेच. राजीवनंतर तो पंतप्रधान होऊ शकतो !’ आम्हाला वाटले आम्ही खूपच तर्कशुद्ध बोललो होतो; परंतु डॉ. विश्वेश्वर अगडबंब-वार यांनी डोळे मिटले. खूप विचारात गढल्यासारखा त्याचा चेहरा झाला. मग क्षणभराने डोळे किलकिले करीत ते म्हणाले–

‘राजीवचा नाद सर्वांनी सोडलेला बरा. संजय गांधी यांच्या मुलाची अथवा राजीव गांधी यांच्या मुलाची निवड आपण भावी पंतप्रधान म्हणून आताच केली, तर प्रश्न ठीक सुटेल आणि किमान दोनशे वर्षे भारता-पुढील बिकट समस्या संपेल.’

‘दोनशे वर्षे ?’ आम्ही आश्चर्य प्रदर्शित करताच, डॉ. अगडबंबवार हातातील पुस्त-कात घातलेली खूण पाहून ग्रंथाचे पान उल-गडीत म्हणाले–

‘नवे नवे शोध लागत आहेत, क्रियोबॉयॉ-लॉजी हे शास्त्र प्रगत होत आहे– ह्या ग्रंथात याची माहिती आहे !’

‘हे कसले शास्त्र आहे ?’

डॉ. अगडबंबवार सावरून बसत अवसानाने म्हणाले–

‘आपल्या रक्तपेशी गोठवून ठेवण्याचे शास्त्र ! आपल्या रक्तात ज्या पांढऱ्या पेशी आहेत त्या रोगाचा मुकाबला करतात. त्यांची शक्ती कमी झाली की माणूस म्हातारा होतो. या पांढऱ्या पेशी गोठवण्याचे तंत्र आता हस्त-गत झाले आहे. म्हणजे माणूस वयात आला की तो ऐन जोमात असताना त्याच्या शरीरा-तील रक्तातील पांढऱ्या पेशी आणि लाल पेशी काढून घ्यायच्या, गोठवायच्या आणि बाटल्यात या पेशी बंदिस्त करून ठेवायच्या. वयाच्या ३५-४० वर्षांपर्यंत अनेक पांढऱ्या-तांबड्या बाटल्यांची बँक तयार करायची आणि माणूस जेव्हा पन्नाशी ओलांडील, तेव्हा या पेशी हप्त्याहप्त्याने लागतील तशा पुन्हा त्याच्या रक्तात सोडायच्या. मग पन्नास वर्षांचा माणूस कात टाकलेल्या सापासारखा पुन:पुन्हा तारुण्य अनुभवू शकेल. किमान दोनशे वर्षे माणूस जगू शकेल !’

‘अरे बाप रे !’

‘अमेरिकेत ओक रिज विश्वविद्यालयात हा प्रयोग यशस्वी झाला आहे. मी तेथील शास्त्रज्ञाशी पत्रव्यवहार करतो आहे. राजी-वचा मुलगा की संजीवचा मुलगा एवढीच निवड इंदिराजींनी करावी, असे मी पंतप्रधा-नांना लिहिले आहे !’

‘म्हणजे मग म्हातारपणचा कुठलाच रोग माणसाला होणार नाही म्हणता ?’

‘मी म्हणत नाही. शास्त्रज्ञ म्हणतात. डायबेटीस, किडनीचा रोग, संधिवात, कॅन्सर, हृदयविकार– या सर्व म्हातारपणाच्या रोगां-पासून मुक्ती होणार आहे, भारताच्या दृष्टीने मला या संशोधनाचे महत्त्व अनन्यसाधारण वाटते. किमान दोनशेवर्षे अशा रीतीने भारताच्या पंतप्रधानपदाचा प्रश्न एकदा सुटला अशी खात्री झाली की, देशाची प्रगती व्हायला मग वेळ लागायचा नाही !’

‘पण छगला म्हणतात पुढचे पंतप्रधान वाजपेयी...’

‘हाः हाः हाः – अहो, वाजपेयींना पंत-प्रधानपद मिळण्याची सुतराम शक्यता नाही ! कारण देशासाठी करण्याचे प्राथमिक कर्तव्य त्यांनी केलेले नाही. लोकांना औरस वारस असलेला पंतप्रधान लागतो. त्यांनी लग्न केले असते तर कदाचित–’

‘नाही पण अशी राजघराणी निर्माण होणे–’

‘अहो या देशावर प्रभु रामरायाची सत्ता चालते. राजा दशरथाच्या चार राण्या, रामाला राज्याभिषेक-गीतरामायण ऐकायला

लाखा-लाखावर लोक जमतात ! तुमचे ग. दि. माडगूळकर एकदा विदर्भात आले असताना मला म्हणाले -' इंदिरा काँग्रेसची अल्प सेवा मी केलेली आहे. गीतरामायण !' भारतीय लोकांना राजा आवडतो, मूल होत नसेल तर त्याने चार राण्या केलेल्यासुद्धा आवडतात. राजा दशरथ मुलगा व्हावा म्हणून यज्ञ करतो. चार लग्नं करतो. काय गावात हुषार पोरं नव्हती की काय ? 'दशरथा घे हे पायसदान' ऐकलंय' की नाही ? याला काही अर्थ आहे की नाही ? रामाच्या वेळी लोकशाही नव्हती की काय ? भरताचा पक्ष होता, रामाचा पक्ष होता, इतपत लोकशाही आम्हाला मंजूर आहे. लोकशाहीत मतभेद संभवतातच. काही म्हणणार संजयच्या मुलाला पंतप्रधान करू, काही म्हणणार राजीवच्या करा- हे आम्हाला चालेल. हा देश रामरायाचा आहे, शंकराचार्यांचा आहे, गोमाता लोकांना दर्शनासाठी रस्त्यावर सोडणाऱ्यांचा आहे. तुमचे तथाकथित विचारवंत याच्याविरुद्ध सारखा आरडाओरडा करतात. इथल्या हिंदूना राजा आवडतो. मुसलमानांना तर आवडतोच. औरंगजेब, बाबर, जहागीर, अकबर इत्यादी थोर थोर राजांच्या आठवणी त्यांना होतात. या देशातली संसद त्यांना मशिदीसारखी पूज्य वाटते ! शेख अब्दुल्लांनी परवा मशिदीतच आपला वारस नेमला. काढलं का पत्रक तुमच्या विचारवंतानी ? इंदिराजी शंकराचार्यांना भेटल्या- केला निषेध ! गो. नी. दांडेकर पण भेटले. त्याचा का नाही निषेध ? कारण विचारवंतांनाही आमची राणी महत्त्वाची वाटते.'

'इथल्या विचारवंताना तुमचा काही संदेश ?'

'रघुरायाच्या नगरी राहून
गा बाळांनो श्रीरामायण'...

-- ग्यानबा

# कोंडी कशी फोडणार ?

## विरोधी पक्षांपुढील आव्हान

### वा. दा. रानडे

बहुगुणानी बोलावलेली लोकशाही समाजवादाची परिषद मुबईत, काही दिवसांपूर्वी होऊन लोकशाही समाजवादी आघाडी हा नवा पक्ष स्थापन करण्यात आला; पण विरोधी पक्षात आणखी एका पक्षाची भर पडण्यापलीकडे त्यातून काही विशेष निष्पन्न होईल असे दिसत नाही. सर्व लोकशाही समाजवादी गटांना एकत्र आणण्याचा आपला उद्देश असल्याचे बहुगुणांनी सागितले; पण परिषदेला बहुगुणा गटाच्या लोकांशिवाय बाकी कोणत्याही गटाचे किंवा पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित तर नव्हतेच; पण त्यांच्यापैकी कोणीही या नव्या पक्षाच्या स्थापनेचे स्वागत केले नाही. कारण हा तत्त्वनिष्ठांचा पक्ष नाही याची त्यांना कल्पना आहे. लोकशाही समाजवाद हे केवळ लोकाचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्याने स्वीकारलेले ब्रीद आहे. लोकशाही समाजवादाची बहुगुणांना खरोखर चाड असती तर ते इंदिरा कांग्रेसमध्ये गेलेच नसते. असे असले तरी समान प्रश्नांवर हा पक्ष इतर विरोधी पक्षाशी सहकार्यास तयार असेल तर त्याचे सहकार्य घ्यावयास हरकत नाही.

विरोधी पक्षानी एकत्र आले पाहिजे, निदान सहकार्य वाढविले पाहिजे ही जाणीव त्यांच्या नेत्यांना आता होऊ लागली आहे. 'दुहेरी सदस्यत्वाच्या प्रश्नावरून जे जनतामधील पक्ष वेगळे झाले, निदान त्यानी तरी एकत्र बसून विचारविनिमयाला सुरुवात करावी,' अशी सूचना श्री. नानासाहेब गोरे यानी साधनाच्या प्रजासत्ताकदिन विशेषांकातील 'ही कोडी फुटली पाहिजे' या आपल्या लेखात केली आहे. ते म्हणतात, 'जनता पक्षाचा प्रयोग अयशस्वी झाला असे नुसते घोकत राहून जसे काहीच साधणार नाही, त्याचप्रमाणे विद्यमान विरोधी पक्षांपैकी एकाही पक्षाजवळ भारताचे कोसळते भविष्य सावरून धरण्याची शक्ती या घटकेला तरी नाही या सत्याकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही.'

कोडी कशी फोडायची ? पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे धोरण, विचारप्रणाली, कार्यक्रम याबाबतीत विरोधी पक्षामध्ये कोणतेही मतभेद असोत, ते सहकार्याच्या आड येऊ न देता समान प्रश्नावर विरोधी पक्षानी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. भा. ज. प. चेसुद्धा अशा लढ्यात सहकार्य घेतले पाहिजे. आम्ही सहकार्य करणार नाही, आम्ही आमच्या बळावर स्वतंत्रपणे झगडणार असा त्या पक्षाचाच आग्रह असेल तर गोष्ट निराळी. अखिल भारतीय पातळीवर दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, काही डावे गट, अर्स कॉंग्रेस आणि लोकदल यांनी संयुक्त कृती करण्याचा निर्णय काही महिन्यांपूर्वी घेतला. महाराष्ट्रातही डावी व लोकशाही आघाडी स्थापन होऊन तिच्या नेतृत्वाखाली शेतकरी-दिंडीला चागला प्रतिसाद मिळाला. ही आघाडी आणखी व्यापक का होत नाही ? सर्व विरोधी पक्षाना तिच्यात सहभागी का केले जात नाही ? जनता पक्षातील फाटाफुटीनंतर जे कटु वातावरण निर्माण झाले होते ते अजून दूर झालेले नाही, या पक्षाच्या नेत्यांनी एकत्र

येऊन व्यापक दृष्टिकोन स्वीकारून' ती कटुता दूर केली पाहिजे.

विरोधी पक्ष एकत्र येण्यात कोणत्या अड-चणी आहेत ? गोरे यांच्या मते काही पक्ष अव्यवहार्य जहाल कार्यक्रमाचा आग्रह धर-तात. ते लिहितात, 'डावे कार्यक्रम कम्यु-निस्टांच्या हातात असलेल्या राज्यात देखील किती मर्यादेपर्यंत रेटता येतात ते सुद्धा गेल्या वर्षात बरेच अनुभवास आलेले असताना अव्यवहार्य अशा जहाल कार्यक्रमांचे .निमित्त करून ऐक्य टाळण्याने कोणाचे हित साधणार आहे ?' अव्यवहार्य जहाल कार्यक्रमाचा आग्रह धरू नये हे गोरे याचे म्हणणे योग्य आहे. आपले कार्यक्रम अव्यवहार्य आहेत याची या पक्षांना जाणीव नसते असे नाही; पण असा कार्यक्रम पुढे ठेवल्याशिवाय आपण जहाल ठरणार नाही अशी त्यांची समजूत दिसते.

सारखे सघर्षच करायचे का ? रचनात्मक कार्य काही नको का ? हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा गोरे यांनी उपस्थित केला आहे. ते लिहितात, 'संघर्षाचा धोशा लावण्याबाबतही विरोधी पक्षामध्ये नीट विचार व्हावयास हवा. उत्पादन, वितरण, शिक्षण, शेती, सिंचन, समाजप्रबोधन इत्यादी क्षेत्रात अनेक कार्यकर्त्यांनी जिद्दीने उतर-ण्याची गरज नाही काय ? शेतीमालाच्या किंमती वाढवून देण्याची मागणी विरोधी पक्ष करतात ती रास्तच आहे; पण मग शेतीचे विविध उत्पादन ग्राहकांच्या घरात जाईपर्यंत त्यांचे भाव वाढविणारी जी दला-लाची साखळी ती तोडणारी यंत्रणा जर आपण उभी केली नाही तर मग ग्राहकांना परवडेल अशा भावात आपण वस्तू देणार तरी कशा ?' त्यासाठी ग्राहक चळवळीचे बळ वाढवून मधले दलाल नष्ट करणारी यंत्रणा उभारायला हवी. आपले सारे राज-कारण निवडणूककेंद्रित व सत्ताकेंद्रित झाल्याने रचनात्मक कार्याकडे दुर्लक्ष झाले हे खरेच आहे. जनतासपर्क साधण्यासाठी असे कार्य आवश्यक आहे. गांधीजींनी विधायक कार्यक्रमावर यासाठीच भर दिला होता; पण त्याचा तोंडदेखला पुरस्कार करण्या-पलीपडे काँग्रेस कार्यकर्त्यांनी काही केले नाही. याबाबतीत केवळ काँग्रेस कार्यकर्तेच दोषी आहेत असे नव्हे. विरोधी पक्षांनी–विशेषत: डाव्या पक्षांनी–काय केले ? संप, लढे, मोर्चे, निदर्शने यासारख्या संघर्षात्मक कार्यक्रमावरच त्यांचा भर होता. संघर्षाचा धोशा कमी करून रचनात्मक कार्याकडे आता अधिक वळायला हवे असे गोरे यांना वाटते.

'अन्नपदार्थात जशी मीठमिरची तसा राजकारणात संघर्ष; पण सघर्ष हा राज-कारणाचा नित्य आहार होऊ शकत नाही.' असे गोरे यांनी म्हटले आहे. संघर्ष सतत चालू ठेवणे शक्य नसते हे खरे. गोरे यांचीच उपमा पुढे चालवायची तर रोजच्या आहा-रात मीठमिरची माफक प्रमाणात का होईना हवीच; पण केवळ मीठ-मिरची हा पूर्ण आहार होऊ शकत नाही. त्याला इतर आहाराची जोड हवीच. तसेच सघर्षाला रचनात्मक कार्याची व विधिमंडळातील कार्याची जोड हवी. ही तिन्ही कार्यक्षेत्रे म्हणजे एकमेकाशी संबध नसलेले हवाबंद कप्पे नव्हेत. लोकशाही समाजवाद या विचारप्रणालीचे धाग्याने ते जोडायला हवेत. सर्वच माणसांना ही तिन्ही कार्यक्षेत्रे सार-ख्याच यशस्वीपणाने जमतील असे नाही. काहीचा पिंड संघर्षाकडे, काहीचा रचनात्मक कार्याकडे तर काहीचा विधिमंडळातील कार्याकडे असतो; पण लोकशाही समाज-वादाच्या समान सूत्राने ते बांधले जायला हवेत.

लोकशाही समाजवादाचा प्रवाह काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेपासून आपल्या राष्ट्रीय चळवळीत आहे; पण हा प्रभाव प्रभावी का होऊ शकला नाही, आपले कोठे चुकले, आपल्या कार्याला, कार्यपद्धतीला, धोरण व कार्यक्रमाला कोणती नवी दिशा आतापर्यंतच्या अनुभवाच्या संदर्भात घ्याव-यास हवी याचा अंतर्मुख होऊन विचार लोकशाही समाजवादाबद्दल आस्था अस-णाऱ्या सर्वांनी करायला हवा. झटपट सत्ता मिळवण्याच्या मागे न लागता, पूर्वीच्या चुका टाळून, रचनात्मक कार्याने तसेच अन्यायविरोधी संघर्षाने जनतेचा विश्वास संपादून पुढची वाटचाल करायला हवी. □


## प्रसिद्ध झाले

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

# एक होता कार्व्हर

लेखिका :
**सौ. वीणा गवाणकर**

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

**मूल्य : रुपये पंधरा**

अवती भवती

# शरद पवार–अंतुले जुगलबंदी !

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान होऊन बऱ्यापैकी काळ लोटला असला तरी नाना क्लृप्त्या योजून मुख्यमंत्र्यांना सत्तेची खुर्ची साभाळावी लागत आहे. कधी भवानी तलवार, कधी प्रसिद्धीची पूर्वयोजना आखून आयोजित केलेल्या अवचित भेटीगाठी, तर कधी मन्त्रिमंडळामधील फेरबदलाची बातमी सतत फिरत ठेवून, बऱ्यापैकी कसरत करत अंतुलेजी आपले आसन हळूहळू घट्ट करू पहात आहेत. इंदिराजींच्या आशीर्वादामुळे पक्षांतर्गत दबाव कमी झालेला आहे. शेतकरी आदोलनाने केवळ महाराष्ट्र नव्हे तर सारा देश ढवळून काढणाऱ्या शरद जोशीबरोबर बऱ्यापैकी जमवून घेऊन अंतुलेजींनी खऱ्या अर्थाने बाजी मारली आहे. त्यांच्या सत्तेला बूड नसले तरी आज तरी धोका निश्चित नाही. अशा या अंतुलेसाहेबाना खिंडीत गाठण्याची संधी माजी मुख्यमंत्री शरद पवार यांना 'ऑनलुकर'ने उपलब्ध करून दिली. शरदरावानी प्रश्न विचारावेत आणि अंतुलेसाहेबानी जबाब द्यावा, अशा या योजनेला दोघानी मान्यता दिली. पवारांच्या प्रश्नावळीमध्ये पहिला प्रश्न होता वादग्रस्त ठरलेल्या दिंडीबाबतचा.

आमच्या दिंडीला पाठिंबा नव्हता असे तुम्ही म्हणता, केवळ पाच हजार लोकांना अटक केली असा दावा करता; पण असे जर होते तर प्रतिबंधक हुकुमांची आणि पोलीस दलाच्या संचालनाची गरज काय होती ?' या प्रश्नावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणतात–' नागपूरजवळ दिंडी येण्यापूर्वीच प्रमुख नेत्यांना अटक केली होती. नागपूर दिंडीत फार तर १५ ते २० हजार लोक असावेत.' दिंडीमध्ये सामील झालेल्या मंडळीबद्दल मुख्यमंत्री मोठी मजेशीर प्रतिक्रिया व्यक्त करतात–

' दिंडीतले हे वारकरी म्हणजे एक अजब खिचडी होती. त्यात नक्षलवादी, डावे कम्युनिस्ट, अरस कॉंग्रेस, समाजवादी अशा सगळ्याचा भरणा होता. समजा, त्यातल्या हजारभर लोकानी जरी कायदा धाब्यावर बसवायचे ठरवले असते तर काय झाले असते ? मला ते होऊन द्यायचे नव्हते.' त्रयस्थ अभ्यासक म्हणून एक प्रतिक्रिया मला नोंदवता येईल. दिंडी जेवढी मोठी असल्याचा पवार दावा करतात तेवढी ती मोठी नव्हती आणि अंतुले हॅऽऽ, कसली दिंडी असला आव आणून जी उपेक्षेची, उपहासाची भाषा करतात तेवढी ती छोटी नव्हती. अर्थात दोघेही बेरकी असल्याने असे दावे-प्रतिदावे केले जाणारच.

शरद पवाराचा पुढील प्रश्न प्रादेशिक राजकारण कसे खत–पाणी घालून फुलवले जाते याची प्रचीती आणून देणारा आहे. विदर्भाच्या भलाईच्या अनेक गप्पा मुख्यमंत्र्यांनी केल्या. म्हणून हे माजी मुख्यमंत्री त्याना विचारतात, 'आता विदर्भावर आश्वासनांची खैरात तुम्ही करता; पण महोदय, महाराष्ट्र मन्त्रिमंडळात असताना मराठवाडा-विदर्भ विभागाला आपण किती वेळा भेटी दिल्या ?' 'माझ्या खात्याच्या दृष्टीने या विभागासाठी जे करणे आवश्यक होते तेवढे मी केले.' असे मंत्र्याला साजेसे गुळमुळीत उत्तर देऊन अंतुलेजी म्हणतात, 'मी नागपूर विभागातील आमदारांच्या बैठका घेतल्या. विदर्भामधील रस्तावाहतुकीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला; पण मला माझ्या मर्यादा होत्या. मी केवळ एका खात्याचा मंत्री होतो. मुख्यमंत्री नव्हतो.'

सवाल–जबाबांच्या या जुगलबंदीत वादग्रस्त भवानी तलवार न येती तरच आश्चर्य. पवार म्हणतात, 'लंडनपर्यंत धडक मारून या भवानी तलवारीचा केवढा बागुलबुवा तुम्ही उभा केलात आणि प्रत्यक्षात हे सारेच प्रकार आता फुसके निघाल्याने, आता तुम्हीच ती भवानी तलवार–अनेक तलवारीपैकी एक असण्याची शक्यता बोलून दाखवता. हा सगळा लोकांच्या भावनेशी खेळ आहे.'

अंतुलेजींनी भवानी तलवारीचा अक्षरशः तमाशा केल्याने या बाबतच्या वक्तव्यावर ते काय प्रतिक्रिया व्यक्त करणार ? 'महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटले ते मी केले,' असले काही तरी गुळमुळीत उत्तर देऊन, अशाच स्वरूपाच्या हिताच्या अन्य काय गोष्टी केल्या आहेत याचा तपशील पुरवून ते म्हणतात, 'माझ्या चांगल्या कामाचीही टिंगलटवाळी करणाऱ्या या मंडळीनाच दिंडीसारख्या क्लृप्त्या कराव्या लागतात.'

राजकारणावरून साहित्यात झेपावून पवार आपला पुढील सवाल विचारतात. ते म्हणतात, 'साहित्यविषयक पारितोषिके देणाऱ्या समितीच्या शिफारशी का ठोकरण्यात आल्या ?' या प्रश्नावर अंतुले आक्रमक चाल करतात. चिडून ते उत्तर देतात की, 'या शिफारशी शासनावर काही बंधनकारक नाहीत. समितीने शिफारस केली, काही बाबतीत आम्ही ती नाकारली. याचाच अर्थ आम्ही त्यावर विचार केला आणि मला तर असे ठामपणे वाटते की, समितीचा निर्णय शिफारसवजा असल्याने शासनाला आवश्यकता वाटल्यास नकाराधिकार वापरलाच पाहिजे. तो जर वापरला जाणार नसेल तर शिफारस बंधनकारक ठरण्याचा चुकीचा प्रघात पडेल.' या प्रकरणी शासनाने आपली कमालीची कोती मनोवृत्ती दाखवली असून त्यावर चारही बाजूनी टीका झाल्याने आणखी काही वेगळी टीका–टिप्पणी करण्याची आवश्यकता भासत नाही.

संजय गांधीचा प्रश्न आल्यावर मुख्यमंत्र्यांना कै. संजय गांधीची तोंड फाटेपर्यंत स्तुती करण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. सार्वजनिक पैशाचा वापर करून वापरल्या जाणाऱ्या जनहिताच्या योजनेला संजयचे नाव का ? असा प्रश्न आल्याबरोबर मुख्यमत्री म्हणतात, 'अहो, लाखो तरुणाच्या मनात त्याने घर केले होते. राजकीय कारणांमुळे त्याचा द्वेष करणारी मंडळी सोडली तर संजयला असंख्य मंडळीचे प्रेम मिळाले होते. देशाच्या सुदैवाने जर संजयला असा अपघाती मृत्यू आला नसता तर त्याने देशाला उत्कृष्ट, कर्तृत्वशाली आणि निश्चयी नेतृत्व दिले असते. अल्पायुष्यामध्ये संजयने जे केले (काय केले हरी जाणे ! ! ) ते फार थोडयाना जमले, असे इतिहास सांगतो. (म्हणूनच मला वाटते स्टिफनसाहेबाना अलेक्झांडरची आठवण झाली असावी.) अशा थोर राष्ट्रीय नेत्याच्या नावे एखादी जनहिताची योजना सुरू करण्यात आली तर बिघडले कोठे ?' अंतुलेजी

योजना वगैरे सुरू करा, संजयचे नावही द्या; पण उगाच काहींच्या काही थापा मारू नका!

## अंतर्गत लोकशाही

पवारांनी लोकशाहीची पताका खांद्यावर घेतली असल्याने दिल्लीहून हुकूम आला आणि प्रदेश-अध्यक्षाची नेमणूक झाली असा प्रकार त्यांना आता आवडणार नाही. म्हणून ते मुख्यमंत्र्यांना विचारतात, 'तुमचा पक्ष सतत पक्षातर्गत लोकशाहीबद्दल बोलत असतो; पण बघावे तर राज्यांमधील पक्षप्रमुखाच्या नेमणुका थेट दिल्लीहून करण्यात येतात.' आता असल्या प्रश्नावर अंतुले प्रतिहल्ला करण्याखेरीज काय करणार? ते म्हणतात, 'आज अरस कांग्रेसमध्ये असलेल्या मंडळींनीच इंदिराजींना बाजूला ठेवण्यासाठी ही अंतर्गत लोकशाहीची, किंवा सामुदायिक नेतृत्वाची भाषा सुरू केली.' इतपत ठीक आहे; पण त्यानंतर मात्र मुख्यमंत्री मूळ प्रश्नाला बगल देऊन चक्क थापेबाजी सुरू करतात—'माझा पक्ष गरज भासेल तेव्हा जनतेला सामोरा गेलेला आहे आणि जनतेच्या घसघशीत पाठिंब्याचा सतत प्रत्यय आलेला आहे,' असंही ते सांगतात.

## विषारी मद्यसेवनामुळे चाळीस लोकांचा मृत्यू

मद्यपानामधून विषबाधा झाल्यामुळे अनेक गोरगरीब मृत्यू पावत असतात. अनेक राज्यांतून या संबंधामधील बातम्या सातत्याने येत असतात. अगदी ताजी घटना आहे हरियानामधील नखना येथील. मद्यपानापासून विषबाधा झाल्याने तेथे चाळीस लोक मेले. बारा ते पंधरा अंध अथवा अपंग झाले. वर्तमानपत्रामध्ये एक दिवस पहिल्या पानावर बातमी येऊन गेली; प्रकरण मागे पडले. परंतु अधिक खोलात जाऊन तपास केला तर असे दिसून येते की, या प्रकरणात अनेक मातब्बर मंडळींचे हात आहेत. नखना येथील सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेट संजय कोठारी यांना मद्यसेवनातून विषबाधा झालेल्या व्यक्तीचे मृत्यूपूर्व जबाब घेण्यासाठी पाचारण करण्यात आले. या जबानीमुळे मान्यताप्राप्त दुकानातून मद्य विकले गेले होते, हे समजले. ज्या दिवशी अपघात झाला त्या दिवशी सुमारे पाचशे लोकांनी त्या दुकानातून मद्य घेऊन त्याचे सेवन केले होते, आणि या सर्व मंडळींना हॉस्पिटलकडे धाव घ्यावी लागली होती. ज्यांनी अल्प मद्यपान केले होते ते थोड्या-फार उपचाराने बचावले; परंतु हॉस्पिटलमध्ये दाखल करून घेतलेल्यांची संख्या तीनशेहून जास्त होती!

प्रकरण बरेच गंभीर असल्याने लगोलग हालचाल सुरू झाली. इंदिरा कांग्रेसचे आमदार सुखदेव सिंग यांच्या पुतण्याचा, जेथून मद्यविक्री झाली त्या दुकानाशी संबंध असल्याने, त्याला अटक करण्यात आली. दुकानामध्ये काम करणाऱ्या अन्य मंडळींना पकडण्यात आले. बलदेव सहानी आणि राजेंद्र कोहली या दोन एक्साईज इन्स्पेक्टर्सना आपल्या कर्तव्यात कसूर केल्याबद्दल कामावरून कमी करण्यात आले. नखनाजवळच्या खेड्यातून दवंडी पिटून सदोष दारूची विक्री होत असल्याने लोकांनी अजिबात मद्यपान करू नये असे सुचवण्यात आले. ज्या दुकानातून हे मद्य विकले जात होते त्या दुकानाचा मालक या गावठी दारूधंद्यामधील एक बडे प्रस्थ आहे. वीस वर्षे या व्यवसायात मुरलेल्या या माणसाने मोठी मालमत्ता केली असून दारूचे तीन गुत्ते आणि एक चित्रपटगृह तो मोठ्या रुबाबात चालवतो. पोलिसांचा ससेमिरा मागे लागल्यावर, आपण ही दारू कोठून आणली, याचा तपशील त्याने पुरवला. त्याच्या आधारे आणखी पंधरा-वीस जणांना अटक करण्यात आली. जितकी जास्त माणसे या प्रकरणात गुतली जात आहेत तितके प्रकरण गुतागुतीचे झाले असून या भयानक प्रकारात अडकलेल्या मंडळींची सुटका व्हावी म्हणून राजकीय स्वरूपाचे दडपण येण्यास प्रारंभ झाला आहे. काही मंडळींची जामिनावर सुटकाही झाली आहे. अर्थात या प्रकरणाला दुसरी चांगली बाजूही आहे. विरोधी पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी या प्रकरणी लक्ष घातले असून जनसामान्यांच्या जिवाशी खेळणाऱ्या या मंडळींना शासन झालेच पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला आहे. गुन्हा निखळ फौजदारी स्वरूपाचा असला की सगळे कसे सोपे असते. मात्र अशाच गुन्ह्याला राजकीय पार्श्वभूमी प्राप्त झाली की प्रकरणाची गुतागुत वाढते. प्रकरण दाबले जात आहे असे लक्षात आल्यावर अनेक विरोधी नेत्यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना एक निवेदन सादर केले. तोंडभर आश्वासन देऊन मुख्यमंत्र्यांनी थोडी-फार हालचाल केल्याने, निदान काही प्रमाणात तरी या गुन्ह्यामागे दडलेले खरे गुन्हेगार पुढे येऊ शकतील आणि न्यायासनामार्फत त्यांना योग्य शासन मिळेल.

हरियानापुरते हे प्रकरण कदाचित थंडावेलसुद्धा; पण गावठी दारूमधून विषबाधा होऊन असंख्य गोरगरिबांचे संसार प्रतिवर्षी उध्वस्त होत असताना याबाबत विशेष काही होऊ शकत नाही याची खंत वाटते.

मद्यपानामधून विषबाधा होऊ नये तर स्वस्त मद्य उपलब्ध करून दिले पाहिजे, हा जसा एक उपाय झाला त्याचप्रमाणे या जीवघेण्या खेळात भाग घेणाऱ्यांना कठोर शासनही झालेच पाहिजे! मागे महाराष्ट्रात खोपडी पिऊन अनेक गरीब मंडळी मृत्यूच्या कुशीत विसावली. दोनच वर्षांपूर्वी बिहारमधील धनबाद येथे मद्यातून विष गेल्याने दोनशे मंडळी दगावली. गुजरातमध्येही ही असली घाणेरडी दारू पिऊन चांगली १२० माणसे मरण पावली. जे मरण पावतात ते *बहुधा आपल्या कुटुंबामधील जबाबदार आणि मिळवते पुरुष असतात.* आधीच उत्पन्न बेताचे. त्यात जर घरातून कर्ता पुरुष असा अचानक उचलला गेला तर परिस्थिती काय भयंकर होत असेल याची कल्पनाच करवत नाही. आणि असे असले तरी हे असले घाणेरडे गुत्ते चालवून असंख्य मंडळींच्या जीवनाशी खेळ खेळणारे मात्र एक तर निसटून तरी जातात किंवा वर्ष-सहा महिन्यांची शिक्षा भोगून तुरुंगाबाहेर येतात. दारूच्या संदर्भात देशभर एक कायदा नाही की एक धोरण नाही अथवा भिन्न धोरण अवलंबणाऱ्या राज्यांमध्ये याबाबतच्या व्यवस्थापनात सुसूत्रता नाही. स्वाभाविकपणे समाजकंटक या असल्या गोष्टींचा पुरेपूर फायदा घेतात आणि लोकांच्या जिवाशी खेळ खेळणारा आपला हा काळा धंदा तसाच चालू ठेवतात. ज्यांची घरे उध्वस्त होतात त्यांच्या विधवांना आणि चिल्ल्यापिल्ल्यांना प्रश्न पडतो, यांना शासन कोण करणार? या अनुत्तरित प्रश्नाला जोपर्यंत निश्चित उत्तर मिळत नाही तोपर्यंत हे भयानक प्रकार असेच होत रहाणार!

## दोन मुख्यमंत्र्यांच्या दोन तऱ्हा

एक बंगालचा आणि केरळचा अपवाद सोडला तर देशात जवळ-जवळ एकछत्री अंमल सुरू आहे. केंद्रात तर इंदिराजींचे शासन आहेच, पण राज्याराज्यातही त्यांच्या पूर्ण पसंतीने सत्ता ग्रहण केलेले सुभेदार राज्यशकट चालवत आहेत. प्रचंड बहुमत आणि अफाट सत्ता असूनही आपले बूड टिकवण्यासाठी आणि सुस्थिर करण्यासाठी राज्याराज्याच्या मुख्यमंत्र्यांना नाना प्रकारचे चमत्कार करावे लागतात. मध्य प्रदेशचे अर्जुन सिंग, कर्नाटकचे गुंडुराव किंवा आपल्या महाराष्ट्राचे अब्दुल रेहमान बरे वाटावेत असे,राजस्थान आणि आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्याकडे पाहून वाटते. आंध्रप्रदेशच्या मुख्य-मंत्र्यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार वाढता वाढता एवढा झाला की, आपल्या मंत्रिमंडळामध्ये किती मंत्री आहेत याचे त्यांना भान राहिले नाही आणि वाटून वाटून खाती इतकी संपली की, शेवटी सहभागी झालेल्या दोन मंत्र्याना बिनखात्याचे मंत्री म्हणून काम करावे लागले! अंजय्या आपल्या मंत्रिमंडळाची वारंवार तारीफ करत असले तरी चौफेर होणाऱ्या टीकेचे पडसाद अखेरीस दिल्लीपर्यंत घुमले आणि तमाम मंत्र्याचे राजीनामे घेऊन पुनर्रचना करण्याची वेळ या महाशयांवर आली. अस्विन कंपनीत सहा आणे रोजावर एके काळी काम केल्याचा दावा करणारे हे मुख्यमंत्री मंत्री घेणे आणि मंत्री काढणे यापेक्षा दुसरे काम करू शकत नाहीत, असा आरोप जनता-पक्षाचे तरुण नेते जयपाल रेड्डी यांनी केला आहे. अंजय्याची काम-गिरी पाहता त्यांच्या या आरोपात पुरेसे तथ्य आढळते. एक मंत्री म्हणजे जनतेवर दरमहा ६० हजार रुपयांचा बोजा, असे विधान करून जयपाल रेड्डी यानी मंत्र्यावर होणाऱ्या खर्चाचा सारा तपशील पेश केला आहे. अंजय्यांच्या मंत्रिमंडळावर देशभर टीका होत होती तरी मुख्यमंत्र्याची ही स्वारी आपल्या शासनावर बेहद्द खूष होती. इतकेच नव्हे, तर आपल्या अवाढव्य मंत्रिमंडळाचे त्यांनी एकदा निर्लज्जपणे समर्थनही केले. ते एका पत्रकार परिषदेत बोलत असताना कोणी तरी विरोधी पक्षाचा उल्लेख करून जयपाल रेड्डी याचे नाव घेतले व ६३ मंत्री असलेल्या या मंत्रिमंडळावर कठोर टीका होत असल्याचे दाखवून दिले. अंजय्या त्यावर उपहासाने हसून म्हणतात, 'विरोधी पक्ष आहेच कोठे? विरोधी पक्ष, सभागृहापुरते म्हणत असला तर माझ्या मंत्रिमंडळाच्या निम्म्याने ज्यांची संख्या आहे. अशा या विरोधकांचे बोलणे मी कशाला मनावर घेऊ?' आता या निर्लज्ज मुख्यमंत्र्यालाही आपले अवाढव्य मंत्रिमंडळ आवरावे लागले हा भाग अलाहिदा. अंजय्यांच्याबरोबर दुसऱ्या टोकावर उभे आहेत राजस्थानचे मुख्यमंत्री जगन्नाथ पहाडिया. इंदिरा काँग्रेसचे तमाम १३४ आमदार दिल्लीला नेऊन त्यांच्या माथी हा नेता मारण्यात आला. पहाडियानी आपला पहिला सहकारी निवडण्यास पूर्ण दहा दिवस घेतले. कमी लोक मंत्रिमंडळात असले तरी उत्तम काम चालते सार्वजनिक पैशाची बचत होते आणि मंत्रिमंडळविस्ताराचे वेळी आपला निश्चित विचार होईल असे इच्छुक आमदारांना वाटत असल्याने पक्षांतर्गत तणाव फारसे निर्माण होत नाहीत. तेव्हा एकंदर परिस्थितीत हळूहळू विस्तारित होणारे मंत्रिमंडळ सर्वोत्तम, असा सुविचार मनी ठेवून पहाडियाजी काम करतात असे वाटते.

### सध्या केवळ १८ खाती

पहाडिया हा खरोखरच पहाडी कर्तृत्वाचा मनुष्य असला पाहिजे. जनता राजवटीत मध्यप्रदेशच्या सकलेचा यांनी एकाच वेळी अनेक खाती संभाळण्याचा जो एक उच्चांक प्रस्थापित केला होता तोही या राजस्थानी पहाडियानी मागे टाकला आहे. सध्या ते एकूण म्हणे १८ खाती संभाळतात. त्यामध्ये अर्थ, गृह आणि उद्योग यासारखी महत्त्वाची खाती असून अन्य लहान–मोठी खाती अर्थात आहेतच. आता एवढी खाती सांभाळायची म्हणजे पहाडिया राजस्थानात अगदी टिच्चून काम करत असतील असा जर कोणाचा अंदाज असेल तर तो मात्र साफ चूक आहे. काही विशेष न करता काम आपोआपच हलते असा अजब साक्षात्कार महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक याना झाला होता. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याची सूत्रे सांभाळणारे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा लौकिक अस-ल्याने त्यांच्याच पक्षाच्या उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्र्यानी त्यांना म्हणे काही महत्त्वाच्या प्रश्नाबाबत सल्ला विचारला. शांतपणे पाइप शिलगावून वसंतराव म्हणाले, 'अहो, काहीही करू नका. प्रश्न एक तर आपोआप सुटतो अथवा निवतो.' पहाडियाजी बहुधा हाच गुरु-मंत्र घेऊन काम करत असल्याने अनेक वेळा दिल्लीत राहून ते जय-पूर सांभाळतात!

मंत्रिमंडळाचा विस्तार करत करत अंजय्या वाहून गेले! राष्ट्र-पतींनी अशा विषयावर बोलणे सयुक्तिक नाही; पण आंध्र हे त्याचे 'होम स्टेट' असल्याने त्यांना राहवले नसावे. आंध्रच्या अवाढव्य मंत्रिमंडळाबाबत त्यांनी नाराजी नोंदवली.

एका टोकाला हे अंजय्या आहेत तर दुसऱ्या टोकाला–मंत्रिमंड-ळाचा योग्य वेळेत आणि योग्य पद्धतीने विस्तार करण्यात ज्यांना संपूर्ण अपयश आले असे पहाडिया आहेत. मंत्रिमंडळाची सुडौल रचना ही वास्तविक पाहता अगदीच प्राथमिक बाब; पण त्याबाबतीत अपयश येऊनही हे दोन्ही मुख्यमंत्री आपापल्या जागी चांगले सुस्थिर आहेत आणि धावपळ करून का होईना, शासनयंत्रणा नावाची जी चीज असते तिच्यामार्फत या राज्याच्या कारभाराचा गाडा रेटला जातो आहे.

—शरद कृष्णन


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

# उत्तर सीमा : दोन अनुभव

कॅप्टन संजय भिडे, पुणे

ट्रँन्झिस्टर माझा एकमेव सखा. रात्री जेवण झाल्यावर सहज चालू केला मात्र, मराठी भावगीताचे शब्द आले. वास्तविक आम्ही महाराष्ट्रापासून शेकडो मैल दूर होतो. क्वचितच मराठी कार्यक्रम ऐकता येई. भावगीताचे शब्द होते–'उभा इथे मी असा प्रतिदिनी–बघू कोणता शत्रू करतो कुठुनी धीट उठाव–गर्जा जयजयकार–' महाकवीचे हे बोल किती यथार्थ ! त्यातच त्याची थोरवी. टेबलवरचे पदार्थ व डिशेस वगैरेची आवराआवर करून बॅटमन (नोकर) 'नमस्ते सर' म्हणून निघून गेला. खोली पर्वतशिखरावर खोदली होती. मोठ्या तुळया टाकून वर माती टाकली होती. एका कोपऱ्यात वर येऊन बाहेर पडायला जागा होती. एक छोटे टेबलवजा लाकडी खोके. नेवारची कॉट. बसायला एक स्टूल. एका पोलवर कंदील टांगलेला. स्वत:चे एक शस्त्र व युनिफॉर्म वगैरे व्यक्तिगत सामान, हाच सारा संसार होता. जवळच टेलिफोन होता. खंदकवजा ह्या खोलीबाहेर एक दरवान असे. भारताच्या उत्तर सरहद्दीवर आमचे हे युनिट पहारा देत होते. १००–१५० यार्डांवर तारेच्या कुंपणापलीकडे शत्रुसैनिक असाच ठिय्या देऊन बसले होते. वास्तविक अतिशय निबिड असा प्रदेश. १०००० पेक्षा जास्त उंचीवर. पर्वतराजीशिवाय दुसरे काहीच नाही. माणसांचा आवाज नाही. ना मोटर ना इतर वाहनांचे आवाज. इतर जगाचा संपर्कच नाही. युनिटमधली ३० माणसे हेच तिथले जग. शत्रुपक्षाचे लोक पण असेच पलीकडे लपून-छपून राहिलेले. युनिटचे काही लोक ठरलेल्या हद्दीवर पहारा देत. इतर आपापल्या भुयारी बिळात राहात. रात्री तर वर चांदण्या व भीषण शांतता. वारा चालू असेल तर वृक्षाचा काय आवाज येईल तेवढाच. एखादी पक्ष्याची फडफड. टेलिफोनवरून ५ मैलावर असलेल्या मध्यवर्ती कार्यालयातील मित्राशी बातचीत रेशन सर्व तिकडूनच येत असे. मनुष्याला डोंगर पालथे घालीत चालत यावे लागे. सामान वगैरे खेचरावर घालून आमच्यापर्यंत पोहोचवले जाई. त्यामुळे जे पदार्थ पोचतील त्यावर जगावे लागे. दररोज रात्री दूरध्वनीने दिवसभरचा रिपोर्ट कमांडिंग ऑफिसरला देत होतो. त्यामध्ये शत्रूच्या हालचालीचे निरीक्षण व इतर काही युनिटचे विषय यावर चर्चा होई. भावगीत ऐकतच (आवाज इतका लहान की, फक्त मलाच ऐकू येईल) बाहेर पडलो. सगळीकडं कसं शांत होतं. आमचे लोक पहारा देताहेत वगैरे बघून पुन्हा खोलीत येऊन कॉटवर अंग टाकले. रात्रभर पहारा चालू असे. तीच ती बेडर वृत्ती. बघू कोणता शत्रू करतो कुठुनि धीट प्रहार–चलो आव देखते है ।

पहाटेची वेळ असावी. लाउडस्पीकरवरून बोलल्यासारखा आवाज आला. एकदम जाग आली. उठून कानोसा घेतला. सर्व शांत होते. भासच असेल म्हणून पुन्हा झोपलो. ५॥ वाजले होते पहाटेचे. अर्ध्या तासाच्या आतच पुन्हा तसाच आवाज. आता मात्र राहवेना. उठलो. टेलिफोन उचलला. ज्युनिअर हवालदाराने जबाब दिला, 'यस् सर.' मी विचारले, 'क्या बात है। ये आवाज किधरसे आ रही है।' हवालदारने जबाब दिला–'सर, ये पाकिस्तानी चिल्ला रहे है। मैं अभी आपके पास आउंगा।' काय बोबलतायेत साले. झटकन हात गेला पिस्तुलावर. विचार केला, बघू तर काय मामला आहे. वॉशबेसिनवर तोंडावर पाणी वगैरे घेतले. तेवढ्यात बॅटमन बेड टी घेऊन आला. चहा पीत होतो तेवढ्यात हवालदार येऊन सलाम करून उभा राहिला. गोंधळलेला चेहरा होता. कसे सांगावे ह्या संभ्रमात असावा तो. मी विचारले, 'क्या हो गया ?' 'सर, तार के पीछे से पाकिस्तानी चिल्ला रहे हैं कि यहा पानी लाने कोई नही आयेगा ! कोई आगे आ गया तो मशीनगन चलायी जायेगी !' माझा क्रोध अनावर झाला. हे कोण हुकमी बोलणारे ? 'हम भी कुछ कम नही। मार डालेंगे सालोको।' मी बोलून गेलो. 'जी हाँ सर, मैं जवानोंको पोझिशन लेने बोलता हूँ।' सरदारजी म्हणाला. मी क्रोध आवरला व परिस्थितीचा विचार करू लागलो.

त्या अवघड पर्वतराशीवर पिण्याचे पाणी क्वचित जागी होते. युद्धानंतर तह होऊन हद्दी कायम केल्या गेल्या तेव्हा ठरले होते की, आमच्या गढीच्या आसमंतात पाणी नसल्यामुळे तारेच्या कुंपणाची हद्द ओलांडून १०० गज शत्रुपक्षाच्या हद्दीत असलेल्या झऱ्यावरून आमच्या लोकांनी सकाळी ७ ते ९ पाणी घ्यावे. पाकिस्तान्यानी विरोध करू नये. काही दिवस हे चालू होते. आजच त्यानी ही बंदी आणली होती. निर्णय घेण्याचे काम माझे होते. माझ्या एका आज्ञेने माझ्या जवानांच्या संगिनी धडाडू लागल्या असत्या. घड्याळाकडे पाहिले. ६॥ वाजून गेले होते. दूरध्वनी करून मुख्यालयाकडून हुकूम घ्यावा का ? वेळ कमी आहे. त्यांच्याकडून कुमक मागवली तरी काही तास जातील. आम्ही संगिनी रोखल्या तर शत्रुपक्षाने आधीच जादा कुमक आणून ठेवून मग ही बंदी आणली की काय, ही शंका. काहीच न करावे तर युनिटच्या लोकाना प्यायला पाणी नाही. मी सुभेदारला सांगितले–'सब आदमिओंके अपने अपने जगे में रहने को बोल दो। जबतक मैं न कहूँ कोई बाउंडरी क्रॉस नही करेगा।'

बाहेर आलो. लाउडस्पीकरवर ओरडा चालूच होता. पाणी घ्यायला हद्द ओलांडली तर गोळ्या घालू ! सतत घोषणा चालली होती. सद्य:परिस्थितीत निर्णय घेणे जरूरच होते. सात वाजून गेले होते. माझ्या जवानाना प्यायला पाणी मिळणार नव्हते. मी निर्णय केला ' 'सुभेदारसाब, आप यही खडे रहिये। मैं खुद बाउंडरी की उस ओर जाऊँगा फिर आपको बुलाउँगा।' तो अवाक झाला. 'नही सर हम बंदूक लेकर जवानों के साथ जायेगा। देखे–उल्लू के पठ्ठे कैसे चिल्लाते हैं।' मी म्हटले 'नहो. तुम यही खडे रहो. जब हम बुलायेगा फिर आवो !' क्षणात मी कमरेचे पिस्तुल आणि हातातली कारबाइन त्याच्याजवळ दिली व चालू लागलो तारेच्या

कुंपणापर्यंत गेलो. शत्रुचे शंख करणे चालूच गोळ्या झाडू. खबरदार ! क्षणभर थांबून तारेचे कुंपण मी ओलांडले. शत्रू ओरडत होता ' साब खतरा है ठेहरो । ' मी आणखी ८–१० पावलं पुढे जाऊन त्यांच्या हद्दीत उभा राहिलो. त्याना ओरडून सांगितले– ' ह्या वेळेत पाणी घेणे आमचा हक्क आहे. ! ' मनावर दडपण होते. गोळ्या झाडण्याचा अविचार त्यांनी केला तर ?

' नही चलेगा. हम लोगोंको हुकूम है. कोई भी बाउंडरी क्रॉस करेगा तो गोली चलाव। तो वापस जाव, नही तो मर जाओगे। ' तितक्याच निडरपणाने पुढे जातच मी ओरडलो, ' आम्हाला हुकुम आहे पाणी घ्या आणि आम्ही ते घेणार ! ' आणि पुढे पुढे जातच राहिलो. ते ओरडतच होते. अजून गोळ्या सुटत नव्हत्या. पाकिस्तानी आपापसात काही कुजबुजत होते. मला ऐकू येईल इतकेच अंतर आता आमच्यामध्ये होते. मी शांतपणे पण ठामपणे त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत पाण्यापर्यंत गेलो. खाली वाकून ओंजळभर पाणी तोंडावर मारले व पाणी प्यालो. उठून उभा राहिलो तेव्हा पाकिस्तानी तेथे दिसत नव्हते. तेथूनच आमच्या सुभेदारास आवाज दिला. तो पळतच हद्द ओलांडून माझ्याजवळ आला. मी सर्व जवानांना पाणी नेण्याकरता बोलावले व त्या सर्वांचे पाणी नेणे होईपर्यंत जवळच निरीक्षण करीत एका शिलाखंडावर बसून राहिलो. माझा आत्मविश्वास आणखीनच वाढला होता. निडरपण साथ देऊन उठले होते. आमची वेळ झाली आणि आम्ही पुन्हा आमच्या हद्दीमध्ये आलो. जवानांनी माझा केलेला जयजयकार माझ्या कमांडिंग ऑफिसरने दिलेल्या शाबासकीच्या किती तरी पटीने अभिमानास्पद होता. हे होते आमचे जीवन. उभा इथे मी असा प्रतिदिनी... ¤

## लेह....

लेहला जाण्यासंबंधी बोलणे निघाले, तेव्हा मी म्हटले, ' काश्मीर खोऱ्यात मी पुष्कळ गोष्टी पाहिल्या आहेत. टूरिस्ट म्हणून मी दोन वेळा काश्मीर बघितलंय. ' गप्पाष्टकात तेथेच असलेले भूदलातले आमचे अधिकारीमित्र मला म्हणाले ' अरे, तू पाहिलेलं काश्मीर खोरं आणि लेह, ह्यामध्ये सर्व प्रकारचे आणि फारच फरक आहेत. लेह आणि तोडाशी आलेला डिसेंबर. Don't take things lightly. भरपूर माहिती घेऊनच पुढचं पाऊल टाक ! ' तो विषय तेवढाच राहिला. पुढे मला कामानिमित्त २५ डिसेंबरला लेहला उपस्थित रहाण्यासंबंधी बुलावा आला आणि माझी धावपळ सुरू झाली. सर्व रस्तेवाहतूक बंद होती आणि मला चंदीगडहून विमानानेच लेहला उतरावयाचे होते. त्यासाठी लागणारा लष्करी विमानातून जाण्याचा परवाना, कपड्यालत्त्याची सोय वगैरे गोष्टींची जुळवाजुळव केली व एके दिवशी मोठ्या पहाटे एका मोटारीने चंदीगड विमानतळावर निघालो. गारठा चांगलाच होता. जवळ असलेले सर्व प्रकारचे गरम कपडे घेतले होते, आणि घातलेही होते.

काही मिनिटांतच विमानाने आकाशात उड्डाण केले आणि भरपूर उंची घेऊन विमान भरधाव चालले. खाली पहावे तर मोठमोठे पर्वत आणि खोल दऱ्या पुढे एकापलीकडे एक आणि आणखी आणखी भयानक पर्वतच पर्वत. मनात भीती येऊन गेली. काय हे पृथ्वीचे रौद्र स्वरूप ! मानवी जीवन कस्पटासमान वाटले, त्या अंतरिक्षात, अशा कठीण प्रदेशातसुद्धा एखाद्या नदीकाठी एखादे गाव दिसे. बाप रे कोठल्या कोठे हे लोक रहातात ! ह्यांचा जगाशी काही संबंध आहे का ? आणि येथे का राहतात ? आमच्या पुण्यामुंबईकडे का रहात नाहीत ? वगैरे विचार डोकावत होते. पहातापहाता खालचे दृश्य दिसेनासे झाले. आता आम्ही ढगावरून चाललो होतो. आणखी भीतिप्रद विचार. आपण नीटपणे पोचणार ना ? कसे असेल लेह ? बघता बघता विमानाची जमिनीपासूनची उंची कमी होत होत विमान धावपट्टीवर उतरले. दारे उघडली मात्र, जो गारवा आत शिरला कसेबसे खाली उतरलो. दुपारी ११ वाजता जणू शून्य अंश उष्णतामान होते. दातखिळी बसायची वेळ आली आणि पायांवर बूटमोजे आहेत का नाही असे वाटले. बर्फासारखे गार पडले पाय ! बोटे बधिर झाली. विमानापासून जवळच म्हणजे २००–३०० यार्ड आम्ही सर्वच प्रवासी कुडकुडत एका छोट्या बराकीत आलो. तेथे आमचे स्वागत म्हणा त्याला, तो प्रकार झाला. एका माणसाने माझी नाव-गाव वगैरे विचारपूस करून प्रथम मला कपडे दिले. एक जाड कानटोपी, एक मोठा ओव्हरकोट आणि स्पेशल बूटमोजे. थोडाफार जामानिमा बदलून मी त्याला माझ्या रहायच्या ठिकाणी ताबडतोब ने, असे म्हणालो, पण थाबणे भाग होते. अंगातील हुडहुडीच्या भरात मी माझ्या सामानासंबंधी विसरूनच गेलो होतो. सामान बाहेर यायला १–२ तास लागले. कस्टम वगैरे भानगड नव्हती. कारण विमान व तळ दोन्ही लष्कराचे होते. खोलीवर आलो. खोली जुनी, पडझड झालेल्या एका बराकीत होती. तेथल्या एका कर्मचाऱ्याने एक केरोसिनची शेगडी पेटवली व एक कप गरम चहा दिला. १५–२० मिनिटे शेगडीपाशी बसलो. मग जरा जिवात जीव आला. खोलीच्या दरवाज्यातून बाहेरचे जग न्याहाळले. सामान आपलेच आपल्या खोलीत आले का ते आता पाहिले. मला ह्या जागत काही दिवस काढावे लागतील असे समजले. एकदम ह्या १२००० फूट उंचीवर प्रत्येकाला ' स रा व का ल ' aclimatization Period काढावाच लागतो म्हणे. म्हणजे येथेच काही दिवस मुक्काम तर !

दुसऱ्या दिवशी सकाळी जरा ताजेतवाने वाटले. खोलीबाहेर आलो. सूर्य नुकताच दिसू लागला होता. सगळीकडे बर्फाचा थर पडला होता, त्यावर सूर्यप्रकाश पडून डोळे दिपत होते. सर्व देखावा उत्कृष्ट, हरखून टाकणारा, जगण्याचं सार्थक झालं असं वाटण्याजोगा अवर्णनीय होता. विमानतळ व परिसर एका बशीच्या आकाराचा-मध्यभागी विमानतळ तर त्याला घेराव घातला होता पर्वतराशींनी. माझं राहायचे ठिकाण थोडे उंचावर. विमानतळावरील हालचाल स्पष्ट दिसावी असे होते. धावपट्टीवर पुष्कळ लोक आणि काही ट्रक्स काम करत होते. चौकशी करता समजले की, बर्फ दूर करण्याचे काम चालू होते. ट्रकच्या पाठीमागे लांब साखळदंड बांधून, त्यांच्या सहाय्याने बर्फ कापण्याचे काम चालू होते. जोपर्यंत हा बर्फ धावपट्टीवरून काढला जात नाही तोपर्यंत विमान खाली उतरू शकणार नाही. म्हणूनच अंबाला-चंदिगडशी संपर्क नाही. सर्व व्यवहार बंद अशी स्थिती. जर पुन्हा बर्फवृष्टी झाला तर दिवसभर विमान येण्याची आशा नव्हती हे हरखून

टाकणारे दृश्य बघत असतांनाच ब्रेकफास्ट तैयार है साब, म्हणून एकजण सांगून गेला. जेवणघरात गेलो. मध्यभागी रॉकेलची शेगडी. तिच्या सभोवार बसण्याच्या जागा. ब्रेड-बटर-ऑमलेट पुढे आलं. लोणी चुल्यावर ठेवून पातळ केले होते. नाही तर थंडीत ते दगडासारखे घट्ट होऊन वापरताच येत नव्हते. सर्वांनी G vitamins व Muth-Vitamins च्या गोळ्या खाव्या अशी योजना होती. सुपारीच्या जागी त्या गोळ्या टेबलावर होत्या. उंचीमुळे कमी प्रमाणातला ऑक्सिजन व त्यामुळे श्वासोश्वासाला त्रास होणे व बाहेरच्या थंड वातावणामुळे अंगातली उष्णता कमी व रक्ताभिसरणाला त्रास, अशा तऱ्हेचे प्रकृतीवर दुष्परिणाम ह्या हवामानात होतात. सवईनं व काळजी घेण्यानं ह्या वातावरणात मनुष्य राहू शकतो. आता आपले बहाद्दूर जवान नुसते राहात नाहीत, तर ह्या वातावरणात लढाया जिंकतात !

सरावकालामध्ये मी १।२ दिवस झोपून बसून काढले, पण मग हळूहळू बाहेर फिरू लागले व मग थोडे पळू लागलो. तरीही मला फारशी धाप लागेनाशी झाली. विमानतळावर उतरण्याकरता विमानांना दोन डोंगरामध्ये असलेली एका बाजूची दरी हे एकच दार होते. अचूक मार्ग घेतला तरच शक्य, नाही तर सगळं फस अशी अवस्था आपल्या वैमानिकाच्या कौशल्यामुळे बरेच दिवसात Accident झाला नव्हता. मी फेरफटका करून ती दरी पाहून आलो. दररोज बर्फातून फेरफटका करावा, वाचन करावे. वर्तमानपत्रे दररोज येत, असे नव्हते. विमान आले तर डाक, नाही तर वाट पहाणे फक्त. रात्री गरम खोलीत ( Sleeping Bag) स्वतःला खुपसून घ्यायचे व वर २।३ जाड पांघरूणं घ्यायची. मग झोप लागायची. तरीही पायाची बोटे गार लागायची असे हे हवामान.

मला कामाच्या ठिकाणी जावयाचे होते. एके दिवशी सकाळी १०-१२ ट्रक्सची मालिका मार्ग आक्रमू लागली. एका ट्रकमध्ये पुढल्या बाजूला ड्रायव्हरच्या बाजूला मी बसलो होतो. ४-५ तास प्रवास करीत लेह मागे सोडले. सर्व रस्ता डोंगरी भागातला. खरं म्हणजे डोंगरी हा शब्द नव्हेच-केवढाले पर्वत आणि दऱ्या! आपल्याइकडच्या माणसांना कल्पनाच येणार नाही. कोठलाच सह्याद्रीचा घाट त्या भागातल्या घाटाच्या जवळपाससुद्धा नाही. इतक्या कठीण वाटा म्हणजे मोटारचालकांची शर्थच होय. आम्ही अशाच एका पर्वताच्या रांगेत होतो आणि एक मोटार बंद पडली. सगळे ट्रक्स थांबले. तास-दीड तास झाला. सूर्य दिसेनासा झाला आणि गार वारे वाहू लागले. मी बसल्या जागीच गारठलो. हळूहळू शरीराचा एक एक भाग निर्जीव झाला असे वाटू लागले. मी ओरडू लागलो. अश्रू वाहायला लागले. लोक जमले. मागल्या ट्रकमध्ये बसलेले काही लष्करी अधिकारी आले आणि त्यांनी मला जमिनीवर खेचले. मग दोघे दोन बाजूना झाले आणि त्यांनी मला धरून मार्च करायला लावले- पळवले. मी धापा टाकू लागलो; पण जरा बरे वाटले. मरत नाही असे कळले. मग त्या मित्रांनी किस्से सांगायला सुरुवात केली. हिमालयाच्या काही रांगा विशिष्ट आहेत. त्या जास्तच थंड असतात व आपण अशाच एका रांगेतून जात आहोत. स्वस्थ न बसता सारखी चाळवाचाळव करा. नाही तर निर्जीवपणा वाटतो, वगैरे. अंधार झाल्यामुळे आम्हाला तेथेच एका बराकीत रात्र काढावी लागली. कशी रात्र गेली याची कल्पनासुद्धा न केलेली बरी. त्या भागातले जीवनच असे खडतर.

काम संपल्यावर परत लेहला आल्यावर ह्यायसे वाटले कधी एकदा चंदीगडला जायला मिळते असे झाले होते. दुसऱ्या दिवशी समजले-गेले दोन दिवस एकही विमान उतरले नाही. कारण खूप बर्फवृष्टी चालू होती. दिवसभर हवामानाची खबर घेण्याशिवाय दुसरा विचारच नव्हता. एके दिवशी विमान येणार अशी बातमी आली. चंदिगडहून निघणे, वाटेतल्या पर्वतशिखरावर असलेल्या टेहेळणी-पथकानी हिरवा कंदील देणे व लेह-विमानतळ उतरायला ठीक, असा हुकूम मिळणे इत्यादी अडचणी होत्या. गडबडीने सामान आवरून तळावर गेलो. २।३ तास गेले. विमानाचा पत्ता नाही. खबरच नाही ! दुपारी अशी बातमी आली की लेहच्या हॉस्पिटलमध्ये एक हवाईदलाचा अधिकारी अतिशय आजारी आहे. जीवन-मरणाचा प्रश्न आहे. त्याला चंदिगडला नेणे भागच आहे. हवा अतिशय खराब असूनसुद्धा विमान उतरवू, अशा हिरिरीने चंदीगडहून विमान सुटत होते. मी विचार केला, चला ह्यामुळे तरी आपली येथून सुटका होईल. तळावरच वाट पाहात होतो. तेवढ्यात ह्या आजारी माणसाला घेऊन हॉस्पिटलची Ambulance आली. अर्थातच त्याचा विमानाशी संपर्क झाला असणारच.

सुमारे अर्धा तास लोटला. विमानाचा आवाज ऐकू आला. विमानतळावरचे बर्फ काढण्याचे काम सकाळपासूनच अव्याहत चालू होते. आवाज येत होता; पण विमान दिसत नव्हते. काळजीच होती. मी विचार केला, माझे सोडा, पण त्या आजारी माणसाचे काय ? विमान नाही आले तर देशाशी संपर्क नाही. काही करता येणार नाही. स्तब्ध शांतता. विमानाचा आवाज येतच होता. त्याचा अर्थात तळाशी संपर्क होता. पुन्हा आवाज-पुन्हा बंद. कोठे आहे हे विमान ? पुन्हा सबंध प्रदेशाभोवती फेरी मारली असावी. आवाज दूर दूर झाला. विमानाला धावपट्टी दिसू शकली नाही आणि फेऱ्या मारून मारून परत फिरण्याशिवाय इलाजच नव्हता. झालं ! आजचं सर्व नाटक संपलं, आता पुन्हा उद्या! ॲम्ब्युलन्स परत गेली. त्या आजारी माणसाचे जे नातेवाईक चंदिगडला वाट पाहात असतील त्यांची काय मनस्थिती झाली असेल ? Helpless बिचारे ! काही करू शकत नव्हते. देवावर हवाला. तसेच लेहचे अधिकारी रात्रभर त्या पेशन्टची देखभाल करण्याशिवाय काहीही करू शकले नाहीत. त्या आजारी माणसाचे काय होईल या विचारातच खोलीत जाऊन Sleeping bag मध्ये शरीर घुसवून झोपी गेलो. सकाळी उठून बाहेर पाहिलं. सूर्यप्रकाश दिसला. रात्री फारसे बर्फ पण पडलेले नव्हते. पर्वणीचाच दिवस ! आज विमाने येणार. भरभर आवराआवरी केली आणि विमानतळ गाठला. जत्रेतल्या उत्साहाने आणि आनंदाने विमानतळ गजबजत होता. रजेवर निघालेले सेनाधिकारी-जवान त्याचप्रमाणे हॉस्पिटलचे रोगी आणि किती तरी माझ्यासारखे सैनिक आणि मग लागोपाठ एक दोन तीन चार-पाठोपाठ विमाने उतरली. आम्ही सर्व खुशीत आलो. सुखरूप चंदिगडला पोहोचलो. असा होता हा लेह-लडाखचा प्रवास. एक अनोखे सृष्टिसौन्दर्य पण तितकेच खडतर जीवन !

☐

# फ्रेडरिक एंजलसबद्दल....

## –फ्रेडरिक लेसनर

रूपांतर : रघुपती भट्ट

माझे डोळे कायमचे मिटण्यापूर्वी मला फ्रेडरिक एंजलसबरोबरच्या दीर्घ सहवासाच्या आणि मैत्रीच्या आठवणी सांगायच्या आहेत. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्याबद्दल खूपसं लिहिलं गेलय, सांगितलं गेलंय; पण तरी सुद्धा मला वाटतंय की, १८४७ पासून त्याचा जो दीर्घ सहवास मला लाभला त्यातले अनुभव सांगितले गेले पाहिजेत !

मला हे कबूल केलं पाहिजे की, माझी ही हकीकत तेवढी पूर्ण असणार नाही. एंजल्सबरोबरच्या काळाला आता अर्ध शतक लोटलं आणि मला सर्व काही आठवून लिहायला हवं. माझं वाढलेलं वय हा एक अडथळाच झालाय. लिहिताना माझे हातही कापतात. म्हणून माझं लिखाण जर तेवढं चागलं झालं नाही तर आपण मला क्षमा कराल.

¤

फ्रेडरिक एंजल्स आणि कार्ल मार्क्स याच्याबरोबरची माझी पहिली भेट खूप वर्षांपूर्वी म्हणजे १८४७ च्या शेवटच्या दिवसाच्या त्या भंतरलेल्या काळात लंडनमध्ये झाली. कामगारवर्गाच्या लढ्यात अग्रगण्य असणाऱ्या कम्युनिस्ट वर्कर्स सोसायटीमध्ये आजची आंतरराष्ट्रीय कामगारलढ्याची चळवळ ज्या सभेमध्ये झाली त्या ऐतिहासिक सभेच्या वेळीच ही भेट झाली. मार्क्स, एंजल्स, वुल्फ आणि बेल्जियन नेता टेडेस्को हे त्या चळवळीची तत्त्वे आणि डावपेच मान्य करण्यासाठी लंडनला आले होते. आज सगळ्या जगाला माहिती आहे की, त्या वेळी कम्युनिस्ट जाहीरनाम्यांचे काम त्याच्यावर सोपवण्यात आले होते.

मार्क्स आणि एंजल्स याच्याबद्दल 'ड्युश, ब्रुसेलर झेटुंग' (१८४७–१८४८) च्या माध्यमातून मी ऐकले होते. एंजल्सचे पुस्तक 'इंग्लंडमधल्या कामगारवर्गाची स्थिती–' १८४५ ला ज्याची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली होती–ते सोसायटीमध्ये विक्रीला ठेवले होते. मी विकत घेतलेले ते पहिले पुस्तक. त्यातूनच मला कामगार चळवळीबद्दल समजले.

मार्क्स, एंजल्स आणि इतर याच्या उपस्थितीचा प्रभाव केवळ सोसायटीवरच नव्हे तर कम्युनिस्ट लीगवरही पडला. या सभेकडून अनेक अपेक्षा केल्या गेल्या आणि त्या अपेक्षा खूपच उंचावल्या गेल्या. कम्युनिस्ट जाहीरनाम्याची प्रसिद्धी हा माझ्या मताला पुरावा आहे.

दिसायला एंजल्स मार्क्सपेक्षा खूपच वेगळा होता. तो उंच आणि सडपातळ होता. त्याच्या हालचाली जलद आणि चैतन्यमयी होत्या. त्याचं बोलणं नेमकं आणि मोजकं होतं. त्याचा स्वभाव अत्यंत खेळकर आणि त्याची चातुर्यशक्ती मुद्द्याला धरून असे. त्याच्या सहवासात येणाऱ्या माणसाचे झटकन मत होई की, आपण एका अत्यंत बुद्धिमान माणसाशी बोलतो आहोत.

अनोळखी माणसांबरोबर बोलताना एंजल्स हातचं राखून बोले. नतर नंतर हे फारच वाढलं. त्याच्याबद्दल योग्य मत बनवायचं झालं तर त्याची पूर्ण माहिती असायला हवी. कारण एंजल्सही एखाद्याबद्दल पूर्ण माहिती असल्याशिवाय त्याला विश्वासात घेत नसे.

त्याच्यापुढे ढोंग करणे अवघड जाई. तुम्ही त्याला थापा मारताय की खरं सांगताय हे त्याला झटकन समजे. काही वेळा तो चुकला असेल; पण त्याला माणसाची चागली पारख होती.

१८४३ पासूनचा एंजल्सचा जुना इंग्लिश मित्र जॉर्ज ज्युलियन हार्ने ('नॉर्दर्न स्टार'चा संपादक) याचे शब्द दिले नाहीत तर त्याचे व्यक्तिचित्र अपुरे राहील. एंजल्सच्या मृत्यूनतर हार्नेनं लिहिलं— '१८४३ मध्ये एंजल्स ब्रॅडफोर्डहून लीड्सला नॉर्दन स्टारमध्ये माझी चौकशी करत आला. एक तरुण देखणा मनुष्य. लहान मुलांमध्ये असणारा रसरशीतपणा त्याच्यातून ओसंडत होता. जर्मनीमध्ये जन्म आणि शिक्षण झाले असले तरी त्याचे इंग्रजी आश्चर्य करण्याजोगे बिनचूक होते. त्याने मला सांगितले की, तो नॉर्दन स्टारचा नियमित वाचक असून चार्टिस्ट चळवळीमध्ये त्याला खूप रस होता. अशा प्रकारे ५० वर्षांपूर्वी आमच्या मैत्रीला सुरुवात झाली.'

पुढे हार्ने म्हणतो की, 'आपल्या कामाच्या गर्दीतून एंजल्स नेहमीच मित्रासाठी वेळ काढत असे आणि त्यांना सल्ला, मदत देत असे. त्याचे प्रचंड ज्ञान आणि प्रभाव यामुळे तो घमेंडखोर बनला नाही. उलट वयाच्या ७५ व्या वर्षीसुद्धा, २२ व्या वर्षी जसा होता तसाच नम्र आणि इतरांना श्रेय देणारा राहिला होता. त्याची आतिथ्यशीलता वाखाणण्याजोगी होती. त्याला विनोद खूप आवडत. तो अगदी मनापासून हसत असे. त्यामुळे त्याच्या पाहुण्याना नेहमी घरच्यासारखे वाटे.'

¤

१८४८ च्या जूनमध्ये लंडनहून मी जेव्हा कोलोनला आलो तेव्हा मार्क्स आणि एंजल्स यांचा जास्त सहवास मला लाभला. 'न्यू ऱ्हाइनिश झुटुंग 'च्या संपादकीय विभागात मला घेण्यात आले. मी शिंपी असल्याने एंजल्स मला हरबारी शिंपी म्हणत असे. मी त्याचे जुने कपडे दुरुस्त करण्यापलीकडे काही केले नाही. मार्क्स आणि एंजल्स कपड्यांना महत्त्व देत नसत. त्यांची आर्थिक परिस्थितीही चागली नव्हती.

मी त्या वेळी लहान होतो. धावपळ मी कधीच केली नाही. 'सभा-समारंभातून आमची भेट होई. आम्ही कॉम्रेड म्हणून एकमेकाना बोलवत असू. आमच्या या थोड्या सहवासातून मी या दोघा महान माणसांबद्दल खूप शिकलो आणि त्यांच्याबद्दल खूप अपेक्षाही केल्या.

तत्कालीन समाजरचनेबद्दल त्याना किती अचूक माहिती आहे हे कम्युनिस्ट जाहीरनाम्यावरून उघड झाले होते. त्यातल्या सोप्या भाषेमुळे कामगारांनासुद्धा वर्गकलहाचे आकलन झाले; पण त्यांच्याजवळ केवळ ज्ञानच नव्हे तर प्रचंड इच्छाशक्तीही आहे, हे आमच्या प्रकाशनाच्या माध्यमातून कळले

प्रतिक्रांतिवाद्याना (प्रशियातील ब्लॅक न् व्हाइटवाले' आपण कोणाशी टक्कर देतो आहोत हे कळून चुकले होते. त्यानी 'न्यू ऱ्हाइनिश 'ला दडपण्याचा प्रयत्न केला.

त्यातून जमले नाही म्हणून त्यानी अगदी खालच्या पातळीवरचे प्रयत्न केले. फेब्रुवारी ७ आणि ८ ला त्यांनी दोन खटले 'व्हाइन' विरुद्ध दाखल केले. मी दोन्हीना हजर होतो. ब्लॅक न् व्हाइटशी किती प्रखर झुज दिली गेली हे पाहून मला तर आनंद झालाच; पण या दोघांच्या शत्रूनासुद्धा त्याचे कौतुक करण्याचा मोह झाला !

दबावाने 'न्यू व्हाइनिश' वृत्तपत्र बंद पाडल्यावर व मार्क्सवर अनधिकृतपणे बंदी आल्यावर संपादकीय विभाग सर्व दिशात विखुरला. मार्क्स पॅरिसला गेला आणि एंजल्स फ्रान्सला गेला. तेथे साम्राज्यवादी घटनेची चळवळ चालली होती.

बेडनमध्ये क्रांतीचा पराभव झाल्यामुळे एंजल्ससह अनेकांना स्वित्झर्लंडला पळावे लागले. एंजल्स काही काळ तेथे राहिला आणि मग लडनला गेला. तेथे त्याला मार्क्स आणि जर्मनीहून आलेले बरेच जण भेटले.

एंजल्स, मार्क्स आणि त्याचे कुटुब यांच्यावर फार वाईट दिवस काढण्याची पाळी आली. कारण दोघाकडेही निर्वाहाचे साधन नव्हते. एलिनॉरने (मार्क्स) आपल्या एका लेखात या कठीण काळाचे वर्णन केले आहे.

याच वेळी मार्क्स, एंजल्स, लीबनेख्ट विल्यम वूल्फ आणि इतरांनी कम्युनिस्ट एज्युकेशनल सोसायटीमध्ये सक्रिय भाग घेतला. या सोसायटीमध्ये अनेक प्रकारचे राजकीय स्थलांतरित एकत्र आले होते. राजकीय मतावर एवढी मतभिन्नता तेथे होती आणि स्थलातरित जीवनावर एवढी चर्चा होई की त्यात फाटाफूट होणे साहजिकच होते.

माझ्या मते एजल्स १८५० मध्ये लंडन सोडून गेला ते त्याच्या वडिलाची भागीदारी असलेल्या मँचेस्टरमधल्या कापडगिरणीत काम करण्यासाठी म्हणून. १८७० मध्ये मार्क्सबरोबर अभ्यास आणि कार्य करण्यासाठी म्हणूनच त्याने मँचेस्टर सोडले.

मँचेस्टरमध्ये विल्यम वूल्फ, सॅम्युएल मूर आणि कार्ल शॉर्लेमेरबरोबर एंजल्स जास्त संपर्क साधून होता. मार्क्सला भेटण्यासाठी तो लंडनला येई किंवा मार्क्स मँचेस्टरला जाई. भेटीगाठी क्वचित आणि थोडया अवधीच्या होत. त्यांच्यातला पत्रव्यवहार मात्र अव्याहतपणे आणि अगदी जिव्हाळयाचा असे.

१८५९ मध्ये मी एंजल्सला एक पत्र लिहिलं. त्याच्या छायाचित्राची मागणी मी त्यात केली होती. त्याप्रमाणे मला त्याचे छायाचित्र आणि सुदर पत्रही मिळाले. ते पत्र इथे द्यायला मला खूप आवडले असते, पण खूप शोध घेऊनसुद्धा मला ते सापडलेच नाही !

१८७० च्या हिवाळयापूर्वी एंजल्स बायकोसह लंडनला गेला आणि मार्क्सच्या घराजवळच प्रिमरोज हिलजवळच्या घरात स्थानिक झाला. मरेपर्यंत तो तेथेच राहिला.

फ्रान्स आणि प्रशियातल्या युद्धाला तोड फुटले आणि त्या युद्धाने एंजल्सचे मन वेधले आणि त्याचा बराच काळही घेतला. 'पॉल मेल गॅझेट'मधल्या त्याच्या युद्धलेखामुळे त्याचे सैनिकी ज्ञानही सिद्ध झाले आणि 'जनरल' हे टोपण नावही त्याला चिकटले. फ्रेंच सैन्याचा पराभव त्याने बऱ्याच वेळा आधी सागितला होता. ज्या वेळी जर्मन सैन्याने उत्तरेकडच्या फ्रेंच सैन्यावर मारा केंद्रित केला होता त्या वेळी एंजल्सने 'पॉल मेल गॅझेट'मध्ये भाकित केले की, मॅकमोहन जर बेल्जियममधून बाहेर पडला नाही तर सेडनमधील जर्मनीचे लोखंडी कडे त्याचा प्रतिकार लवकरच मोडून काढेल ! दोन आठवडयानी नेमके तेच घडले.

१८७१ मध्ये 'पॅरिस कम्युन'च्या पराभवानंतर आंतरराष्ट्रीय कामगार सघटनेच्या समितीची अवस्था अतिशय विकट आणि ताणलेली बनली. आतरराष्ट्रीय संघटनेचे बरेच लोक लंडनला येऊ लागल्याने मार्क्स आणि एंजल्स याची परिस्थिती तर फारच बिकट बनली.

हंगेरीच्या लिओ फॅंकेलला विसरता येणार नाही. तो प्रशियामधून निसटून आला होता. नि संदिग्ध ध्येयनिष्ठा असणाऱ्यापैकी तो एक होता. काही काळानंतर, तो परत पॅरिसला गेला आणि त्याने परत प्रसार चालू केला. काही वर्षांपूर्वी तो वारला. त्याच्या मृत्यूमुळे मी एक चागला मित्र आणि पार्टीने एक चागला सभासद गमावला. त्याच्या स्मृतीला अभिवादन असो !

कम्युनमधून आलेले निर्वासित वेगवेगळया राजकीय प्रवाहांचे व परस्परविरोधी असल्याने कम्युनच्या अपयशाचे खापर त्यांनी एकमेकाच्या माथ्यांवर फोडले. भग्न झालेल्या आशा आणि नंतरचे कठीण दिवस यामुळेच फाटाफूट लवकर झाली. भांडवलशाही वृत्तपत्राचे प्रखर हल्ले, कम्युनबद्दलचे अज्ञान आणि राजसत्तावाद्यांचे ते आमिष या सगळया गोष्टी आंतरराष्ट्रीय चळवळ पुसून काढण्यासाठी जणू एकत्र आल्या.

हेगच्या अधिवेशनात घेतलेल्या निर्णयाप्रमाणे जनरल कौन्सिल न्यूयॉर्कला गेले. त्यामुळे मार्क्स आणि एंजल्सना अर्थशास्त्राचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. मार्क्सला 'कॅपिटल'कडे लक्ष पुरवायचे होते. ते त्याला करता आले. इंटरनॅशनलचे सेक्रेटरीपद एंजल्सकडे आले. त्याशिवाय वस्तुस्थितीवरचे काही लेख, कम्युनिस्ट जाहीरनाम्याचे भाषांतर किंवा एखादे भाषांतर तपासणे यामध्येही त्याचा बराच वेळ जाई. त्यातूनही आमच्या या जुन्या मित्राने शास्त्रीय ग्रथ लिहिण्यासाठी वेळ काढला. यावरून त्याची कामाची ताकद आणि कामाबद्दलचं प्रेम दिसून येतं.

१८७८ मध्ये एंजल्सवर मोठा घाव पडला! त्याची आयरिश बायको, जिने आपले तनमन सीन फोन चळवळीत वेचले होते, ती निधन पावली. त्याना मुले नव्हती. पत्नीवियोग हा एंजल्सवर मोठाच घाला होता !

मार्क्स कुटुंबियावरही वाईट दिवस आले. मार्क्सचे आजारीपण, त्यातच त्याची बायको आणि मुलगी आजारातच मरण पावली.

१८८३ मार्चमध्ये अनपेक्षित नसली तरी दुःखदायक अशी मार्क्सच्या मृत्यूची बातमी आली !

एंजल्सचे पत्र असे आले—

लंडन, मार्च १५, १८८३

प्रिय लेसनर,

काल तीन वाजता आपल्या जुन्या मित्राने, मार्क्सने शांतपणे आणि अगदी हळुवारपणे आपले डोळे कायमचे मिटले ! आंतरिक रक्तस्राव हे त्याच्या मृत्यूचे तत्कालीन कारण म्हणता येईल.

शनिवारी बारा वाजता अंत्यसंस्कार आहेत. तू यावेस अशी टुसीची विनंती आहे.

गडबडीबद्दल माफ कर

तुझा,

फ्रेडरिक एंजल्स.

मार्क्सच्या मृत्यूनंतर लेचे डिम्युथ ही

एंजल्सच्या घरात आली. मार्क्सच्या लग्नाच्या वेळी मि. मार्क्सबरोबर ती त्यांच्या घरात आली होती आणि मार्क्सच्या मृत्यूपर्यंत मार्क्स कुटुंबाच्या सुखदुःखात ती सहभागी झाली होती. फ्रेडरिक एंजल्सच्या घराची व्यवस्था तिने ६–७ वर्षे बघितली. ४ नोव्हें. १८९० ला तिचं निधन झालं. एंजल्सला हा धक्का सोसण्यासारखा नव्हता. सुदैवाने मि. फ्रेबर्गर हिने व्हिएन्ना सोडून लंडनला येऊन एंजल्सच्या घराची व्यवस्था बघण्याचा निर्णय घेतला.

एंजल्सने ट्रेड युनियनच्या आठ तास कामाच्या चळवळीत भाग घेतला तेव्हा तो स्वतः सोळा तास काम करत असायचा, हे सर्वांनाच माहीत आहे. ' मे 'च्या सोहळ्यात तो वय विसरून भाग घ्यायचा आणि गाड्यातसुद्धा बसायचा. मेमधल्या त्या पार्ट्या कोण विसरू शकेल ?

त्याची काम करण्याची ताकद आणि कार्यप्रेम मरेपर्यंत टिकले. परदेशी भाषांचे त्याचे ज्ञान सुविख्यातच आहे. त्याला दहा भाषा पूर्ण येत होत्या. इब्सेन आणि किलँड मुळातून वाचता यावेत म्हणून ७० व्या वर्षी त्याने नॉर्वेजियन शिकायला सुरुवात केली होती.

मार्क्सप्रमाणे एंजल्स कधी भाषणे देत नसे. फार क्वचितच. १८९३ मध्ये त्याचे जे जाहीर भाषण झाले ते शेवटचेच. झूरिच, व्हिएन्ना, बर्लिन इथे त्याने अधिवेशनाच्या वेळी भाषणे केली. झूरिचमध्ये त्याचे जे स्वागत झाले, जे कौतुक झाले त्याने एंजल्स भारावून गेला होता, असे त्याने वारंवार माझ्याजवळ बोलून दाखवले. ऑस्ट्रिया, जर्मनी आणि स्वित्झर्लंडमधल्या त्याच्या भेटी हा आमच्या तत्त्वाचा विजय होता आणि अशा वेळी नवा जर्मनी पाहायला मार्क्स जिवंत नाही याची त्याला खंत वाटे.

मरेपर्यंत एंजल्स शांत, निर्धारी, साधा आणि कोणतेही काम निष्ठेने करणारा राहिला. त्याला काहीही विचारले तरी थोडक्यात पण अधिकारवाणीने उत्तर मिळे. लोकांना आवडो अथवा न आवडो, स्पष्ट उत्तरे देण्यात, मतं मांडण्यात तो अग्रेसर होता.

पक्षात एखादी गोष्ट त्याला पसंत पडली नाही तर तो ती ताबडतोब बोलून दाखवी. तडजोड त्याला मान्य नसे, बाजू बदलणे हेही त्याला मान्य नसे.

त्याच्याकडे बरेच लोक यायचे. पक्षसभासदही असत .' सोल्झियाल्हमोक्रात ' झूरिचहून जेव्हा लंडनला आले तेव्हा या भेटी वाढल्या. एंजल्सचे घर सर्वांना खुले होते.

मार्क्सच्या मृत्यूनंतर मी अनेक वेळा एंजल्सला भेटायला जाई. मार्क्सचा जेवढा माझ्यावर विश्वास होता, तेवढाच एंजल्सचाही होता. जेव्हा त्याच्या घरी वर्दळ वाढली तेव्हा मी जायचा कमी झालो. त्याने ताबडतोब मी का येत नाही याची चौकशी केली.

¤

१८९५ च्या उन्हाळ्यात एंजल्स तब्येत सुधारावी म्हणून ईस्टबोर्नला शेवटचाच गेला. जुलै संपताना तो परत आला तेव्हा त्याच्यात कसलीही सुधारणा झाली नव्हती. टसीला त्याची फार काळजी वाटत होती. तिने मला लिहिले. मी एंजल्सला भेटून त्रास द्यायचा नाही असे ठरवले होते. माझ्या भेटीमुळे तो उत्तेजित होण्याची भीती होती कारण त्याचा तो स्वभावच होता.

५ ऑगस्टला बर्नस्टीनकडून मला समजले की, एंजल्सला जर मरण्यापूर्वी बघायचे असेल तर वेळ दवडून उपयोग नाही. कारण त्याची तब्येत फारच खालावली होती. त्याचा मृत्यू इतका नजीक आला असेल याची मला कल्पना नव्हती म्हणून मी दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ ला जायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी पहिल्या टपालात मिसेस फ्रेबर्गरचे टपाल होते. आमचा प्रिय मित्र ५ ऑगस्टच्या रात्रीच ११ ते १२ च्या दरम्यान हे जग सोडून गेला होता.

ती अनपेक्षित आणि दुःखदायक वार्ता ऐकून मला काय वाटले हे शब्दात मांडता येणार नाही. ताबडतोब मी त्याच्या घरी गेलो. मृत अवस्थेत एंजल्स आपल्या बिछान्यावर पडलेला मला दिसला. अगदी १५ मार्च १८८३ ला कार्ल मार्क्सला जसे आम्ही पाहिले तसेच !

मिसेस फेबर्गरवर त्याचा इतका खोल परिणाम झाला होता की, एंजल्सच्या शेवटच्या क्षणाची हकीकत तिच्याकडून मोठ्या कष्टाने मिळाली.

आपल्या अस्थी समुद्रात विसर्जित करण्यात याव्यात अशी त्याची शेवटची इच्छा होती. २७ ऑगस्टला एलिनॉर मार्क्स, मी, बर्नस्टाइन, डॉ. ॲवलिंग यानी ती पूर्ण केली. आम्ही एंजल्सच्या उन्हाळ्यातल्या आवडत्या ईस्टबोर्नला गेलो. त्याच्या अस्थी घेऊन भाड्याच्या बोटीतून दोन मैल आत समुद्रात गेलो. त्या प्रवासाने मनात ज्या भावनांचा कल्लोळ उठला त्याचे वर्णन अशक्य आहे

¤

मार्क्स–एंजल्स जाऊन वर्षे लोटली; पण त्यांचे कार्य अमर आहे. जगातल्या लक्षावधी कामगारांना आमचे नेते दाखवीत असलेले डावपेच, तत्त्व समजतात, ते त्यांच्या मागून जात आहेत. त्यांचा दर्जाही सुधारतो आहे

मला खूप समाधान आहे. या आठवणी संपवताना लक्षावधी कामगारबंधूंच्याबरोबर मी म्हणतो–

' नजीकचा भविष्यकाळ हा समाजवादी चळवळीचा आहे. ' □

[ ' A workers' Reminisceneces of Engels '
—Friedsich Lessner '
या लेखाचे मराठी रूपांतर ]


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळा-कॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... –प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र
तिसरी आवृत्ती । किंमत . बारा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

फिनिक्स निवड

## The Fifth Horseman

( Novel ) By Larry Collins & Dominique Lapierre.
Simon & Schuster-New York
P 478, Rs. 118-55)

श्री. पोंडा यांनी 'माणूस'मध्ये श्रीमती मेरी करास यांच्या पंतप्रधान इंदिरा गांधी याच्या पुस्तकाचा जेव्हा परिचय करून दिला तेव्हा वाटलं नव्हतं की, त्या संदर्भात इतकी पत्रे येतील. श्रीमती, विद्या देशपांडे, १००, फार्म लॅंड, रामदास पेठ, नागपूर, ४४००१० यांनी श्रीमती गांधीवरील आणखीन बरीच पुस्तके सुचवली आहेत. त्या पुढे लिहितात की 'फिनिक्स निवड' हे सदर ग्रंथप्रेमीना नेहमीच उपयुक्त वाटत आले आहे.

श्री. रमेश वामन परांजपे, ३ सभाकुंज, मालाल, मुबई ६४ यांनीसुद्धा पत्र लिहून श्रीमती इला सेनचे पंतप्रधानांवरचे The First Biography या पुस्तकाचे नाव आत हवे होते असे सुचवले होते ते पुढे असेही लिहितात की, यात श्री फिरोज गाधीचे एकूण व्यक्तिदर्शन त्याना चागले वाटले. सदर पुस्तक भरपूर माहितीयुक्त आहे, तसेच भाषाही प्रवाही आहे असे त्यांना वाटते. या पुस्तकाबद्दल तर श्री. पोडाना माहितीच नव्हती! Caught napping, Mr. Phoenix !

आणखीन एका पत्राचा उल्लेख करावासा वाटतो तो श्री. दादूमियाचा. इतके गोड टोपण नाव कुणीही उचलेले नसेल! दादूमिया म्हणजे पोडांना वाटले goatee beard असलेले व गोडायुक्त लाल टोपी पहनलेली व्यक्ती असेल; पण हे मिया तर सुटाबुटातील डॉक्टर! ते बडोद्याचे १९८१-८२ सालचे रोटरी क्लबचे अध्यक्ष !

दादूमिया हे सुद्धा लिहितात की, फिनिक्स' हे सदर ग्रंथप्रेमी लोकांना उपयुक्त वाटते. त्यांनी पोडांना बडोद्याच्या रोटरी क्लबला भाषण देण्याचे आमंत्रण दिले आहे! धगधगत्या वाळवंटरूपी ग्रंथालयाच्या 'धंद्यात' असली पत्रे गार झुळूक देऊन जातात.

या वेळी आणखीन आठ-दहा पत्रे आली आहेत. सर्वांचा उल्लेख करता येत नाही. हे एवढे लिहिल्यावर श्री. पोडा यांना असे लिहावेसे वाटते की, अगदी अलीकडे त्यानी काही जाणकाराचा धसका घेतला आहे. चुकांवर चुका काढून कधी त्यांच्यावर तुटून पडतील याचा नेम नाही. त्यानी आधीच ठरवून टाकले आहे की, असे काही झाले तर वादात शिरायचे नाही. काही गोष्टीचा ते उगाचच धसका घेत असतात. उदाहरणार्थ शाल-श्रीफळ, अती पिकलेली फळे, वादावादी, भांडण, त्यांच्या मृत्यूनंतरची फिनिक्स वगैरे. आता पोडाना का कोणी शाल वगैरे देणार आहे? बघा आता माणसाला कसकसले इरॅशनल भय असते !
◻

थोडयाच दिवसात अतिरेक्यांच्या हातात अणुबॉंब यायला लागतील. अणुबॉंब कसा करावा याच्या फाइली काही ठिकाणी उपलब्ध आहेत. ज्या ठिकाणी सध्या एनरिच्ड युरेनियम नेले जाते त्यातून थोडेसे लंपास करणे सराईत गुन्हेगारांना अवघड नाही. (थोडेसे काय, १९६३ सालच्या सुमारास युरेनियम व इतर सामान असलेली एक आगबोटच गायब झाली होती. ज्यू लोकानी ती पळवली, असा बोलवाला त्या वेळेला झाला होता. याच एनरिच्ड युरेनियमपासून ज्यूनी योम कीप्पुरच्या युद्धाच्या वेळेला त्याची नेहमीची कार्यक्षमता दाखवून काही तासातच थोडे अणुबॉंब तयार ठेवले होते. )

साधारण दीड-दोन लाख रुपयात अणुबॉंब होऊ शकतो. एका विद्यार्थ्याने त्याचे विवेचनही केले होते.

अॅपॉकॅलिप्स हे हिब्रूमधील पौराणिक साहित्य. भविष्य वगैरे सागणारे (त्याचा अर्थ रिव्हिलेशन असा होतो.) या प्रकारचे साहित्य प्रतीकात्मक लिहिले गेले होते. Four Horsemen of the Apocalypse वगैरे. यावरूनच भागीदार लेखकानी 'द फिफ्थ हॉर्समन' हे नाव दिले आहे. The title the reflects growing belief that nuclear weapons are indeed the fifth horseman of the Apocalypse.

विकासासाठी विज्ञान की विज्ञानासाठी विज्ञान असा प्रश्न सध्याच्या घडामोडी पहाता सामान्य माणसाला, पडला तर नवल नाही. विशेषत: आण्विक ऊर्जा किंवा अॅटॉमिक एनर्जीचा शोध ज्या विज्ञानामुळे लागला त्या विज्ञानाची संभावना कशी करावी हा त्याला प्रश्न पडतो.

प्रस्तुत कादंबरीत अशी ऊर्जा निर्माण करण्याचे रहस्य एखाद्या धर्मांध सत्ताधान्याच्या हाती पडले तर काय होण्याची शक्यता आहे, ह्याचे भीषण कल्पनाचित्र रेखाटले आहे.

१९०५ साली आइनस्टाइनने एका समीकरणाद्वारे दाखवून दिले की, जर 'M' ग्रॅम्स एवढे द्रव्य (physical substance or matter) किंवा पदार्थ जर पूर्णपणे नष्ट करण्यात आला तर तसे करताना जी ऊर्जा निर्माण होईल, तिची कल्पना $E=Mc^2$ या समीकरणाद्वारे येईल. उदाहरणार्थ एक ग्रॅम पदार्त आपणास नष्ट करण्यासाठी किंवा एक ग्रॅम पदार्थ आपण पूर्णपणे नष्ट करू शकलो तर जी ऊर्जा प्राप्त होईल ती साधारणपणे १००० अश्वशक्ती (किंवा ७४६ किलोवॅट ) या किंमतीची असून अखंडपणे ती चार वर्षे चालेल! ही ऊर्जा फक्त एक ग्रॅम पासून मिळणारी ऊर्जा होय! जर जड असलेल्या मूलघटकाचे (element) त्याहून हलक्या मूलतत्त्वात विभाजन झाले तर आण्विक ऊर्जा उपलब्ध होते. अॅटमबॉंबमध्ये हेच तत्त्व वापरले आहे. हायड्रोजन बॉंबमध्ये दोन अणू (जड हायड्रोजन किंवा ड्युटरियम) इतक्या जोराने आणि वेगाने एकमेकावर आदळतात की, ते एकजीव होतात व त्यामुळे ऊर्जा उपलब्ध होते; परंतु अॅटमबॉंबपेक्षा हायड्रोजन बॉंब तयार करणे अवघड असते. हायड्रोजन बॉंबची रचना साधारणपणे पुढीलप्रमाणे असते : द्रवरूप ट्रीटीयममध्ये असलेल्या आण्विक इंधनाच्या दोन्हीकडे एक आण्विक 'खटका' असतो. हे दोन्ही आण्विक खटके एकाच वेळी जागृत केल्यावर आतील आण्विक इंधन दबले जाते व अशक्यप्राय वाटण्याइतके त्याचे तपमान वाढते व हायड्रोजन बॉंबच्या स्फोटासाठी आवश्यक असलेल्या उच्च तपमानाच्या उपलब्धतेमुळे स्फोटाची प्रक्रिया सुरू होते.

प्रस्तुत पुस्तकात असे दाखविले आहे की फ्रेंच शास्त्रज्ञाना गवसलेले हे

रहस्य, लिबियाचे अध्यक्ष कर्नल गदाफी आपल्या हस्तकाद्वारा मिळवतात व आपल्या देशातील विद्युतशक्तीसाठी चालविल्या जाणाऱ्या आण्विक केंद्रातून इंधन मिळवून त्याचे बॉम्ब तयार करतात. ह्यातील एक बॉंब ते न्यूयॉर्क शहरात आपल्या हस्तकांद्वारे ठेवतात. अमेरिकेच्या अध्यक्षाना एक पत्र पाठवून जर अमेरिकेने इस्राइलला १९६७ च्या युद्धात बळकावलेली भूमी सोडण्यास तसेच जेरुसलेमच्या पूर्व भागाचा व पवित्र मशिदीचा ताबा सोडण्यास प्रवृत्त केले नाही तर न्यूयॉर्क शहरात या हायड्रोजन बॉंबचा स्फोट करण्यात येईल असे या पत्रात लिहिलेले असते.

अमेरिकेसारखे विज्ञानात व तंत्रज्ञानात पुढे असलेले राष्ट्रही जवळजवळ हतबल होण्याची पाळी यामुळे येते. एवढ्या मोठ्या शहरात एका पिंपात लपवलेला हायड्रोजन बॉंब शोधणार कसा? अखेर बऱ्याच खटपटीनंतर तो बॉंब सापडतो व ताबडतोब निरुपयोगी केला जातो.

अमेरिका व लिबियाचे अध्यक्ष याखेरीज लैला दाजानी व तिचे दोन भाऊ कमाल व ब्हालीर आणि न्यूयॉर्क पोलीसखात्यातील अँजेलो रोकचिआ ही या कथेतील मुख्य पात्रे आहेत. तसेच इस्राइलचे पंतप्रधान बेगीन हेही एक महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. जेव्हा अमेरिकेद्वारा बेगीन याना वरील धमकीची माहिती देण्यात येते तेव्हा ते लिबियाला उध्वस्त करायला निघतात; पण अमेरिकेच्या दबावामुळे माघार घेतात. खरं म्हणजे अमेरिकेच्या अध्यक्षांचाही लिबिया पृथ्वीच्या पाठीवरून नामशेष करायचा विचार असतो; पण जेव्हा त्यांना कळते की, लिबियाची लोकसंख्या फक्त वीस लाख व न्यूयॉर्कची लोकसंख्या ४० ते ५० लाख आहे तेव्हा ते तो विचार सोडून देतात!

एकंदरीत पुस्तक वाचनीय आहे. अमेरिकेसारख्या राष्ट्राची निष्क्रियता दाखवण्यात लेखकद्वय यशस्वी झाले आहेत. यातील माणसांच्या स्वभावाचे अनेक कंगोरेही त्यांनी उलगडून दाखवले आहेत. उदाहरणार्थ, अध्यक्षाच्या एका मदतनिसाला ही बातमी कळल्यानंतर गुप्ततेची जबाबदारी असतानाही तो ते आपल्या बायकोला सांगतो व ती अपत्यप्रेमामुळे न्यूयॉर्कमधील आपल्या मुलीला ताबडतोब घरी बोलावून घेते! पुस्तकातील एक संस्मरणीय प्रसंग म्हणजे दूरचित्रवाणीद्वारा अमेरिकेच्या व लिबियाच्या अध्यक्षातील वार्तालाप. या प्रसंगाची तुलना एखाद्या रहस्यकथेशीच करता येईल.

सदरहू पुस्तकात खटकलेला एक मुद्दा पुढीलप्रमाणे—भारताने स्फोट केलेल्या आण्विक साधनाचा उल्लेख 'अॅटमबॉंब' असा एका पत्राद्वारे केला आहे. (पृष्ठ ३८) नंतरही गदाफीचा बॉंब मिळविण्याच्या प्रयत्नाचा इतिहास सांगताना या आण्विक साधनाचा उल्लेख Atomic 'device' असा केला आहे. (पृष्ठ ८८) त्यामुळे लेखकद्वयाचा कुचेष्टेचा स्वर स्पष्ट होतो. वास्तविक भारताने केलेल्या स्फोटाबाबत अमेरिकेने व कॅनडाने शंका व्यक्त केली होती; पण भारताने घडवून आणलेला स्फोट पूर्णपणे वैज्ञानिक कारणासाठी होता, हे कळून चुकल्यावर वरील राष्ट्रांनी आपली थांबविलेली मदत पुन्हा चालू केली. अमेरिकेने तर तारापूर केंद्राला लागणाऱ्या इंधनाचाही पुरवठा सुरू केला आहे.

असो. पण सध्या पाकिस्तानने ज्या हिकमतीने त्यांच्या आण्विक केंद्रासाठी लागणारी सामुग्री मिळविली त्यावरून पुस्तकातील एक वाक्य आठवते, 'There is nothing that is required that is so exotic as to be unobtainable.'

या पुस्तकाची टेक–ऑफ स्टेज सुमारे ४० पानानंतर आहे. तोवर चिकाटी ठेवा. त्यानंतर कथानकाच्या हुकशी तुम्ही अडकलाच म्हणून समजा!

—रविंद्र बिवलकर,
—जे. एन. पोंडा.


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | |
|---|---|
| १. कविता दशकाची (येत्या दशकामध्ये प्रभावी होऊ शकतील अशा दहा कवींच्या चर्चात्मक प्रस्तावनेसह निवडक कविता) : संपादक–मंगेश पाडगांवकर. विजया राजाध्यक्ष. शिरीष पै रमेश तेंडुलकर. दया पवार | रु. २०–०० |
| २. सेंट्रल बस स्टेशन (कादंबरी) : वसंत नरहर फेणे | ,, १६–०० |
| ३. एक सर्वमंगल क्षिप्रा (आत्मकथन) : ह्. वि. मोटे | ,, ५०–०० |
| ४. कायापालट (Metamorphosis चा अनुवाद) फ्रान्झ काफ्का – अनुवाद सुशीला गोखले | ,, ७–०० |
| ५. जावई, मेव्हणे आणि मंडळी (मर्यादित) (विनोदी कथा) : बाळ गाडगीळ | ,, १८–०० |

**ENGLISH**

| | |
|---|---|
| 1. **The White Album** ( A personal memories written in exquisite English) : John Didion | ,, 23–75 |
| 2. **The Social Contract** (Brobing order and disorder) Robert Ardrey | |

☐ महाग पुस्तके विकत घेण्यासाठी सर्व प्रकारच्या वर्गणीवर २५% सुट! अपूर्व संधीचा लाभ घ्या!!

☐ ५ वर्षे, ७ वर्षे व लाईफ मेंबरशिप घेऊन शेकडो रुपये सूट मिळवा।

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

# सर्कसचं जग

## प्रकाशातलं आणि अंधारातलं !

सतीश कामत

पुण्यातल्या सारसबागेजवळच्या मैदानात खड्डे खणायला सुरुवात होते थोड्याच दिवसात रंगी-बेरंगी पत्र्यांचं कंपाउंड उभं राहातं. तंबू–राहुट्या ठोकल्या जातात. वाघ, सिंह, हत्ती, घोडे, उंट, शेळ्या असा जंगी शिकारखाना डेरेदाखल होतो आणि एका अद्‌भुत जगाची सुरुवात होते. पहिल्या दिवशी संध्याकाळी सात वाजता खास शो. नंतर रोज तीन खेळ. रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी दुपारी एक जादा खेळ. कोणत्याही सर्कसचं जीवनचक्र अशा तऱ्हेनं चालू असतं.

सध्या पुण्यात 'अमर सर्कस' दाखल झाली आहे. साहजिकच असंख्य आबाल-वृद्धांची रीघ सारसबागेजवळच्या या सर्कशीच्या तंबूकडे लागली आहे. तंबूवर आकर्षक विद्युतरोषणाई केलेली. मैदानालगतच्या फूटपाथवर असलेल्या बुटक्या झाडावरही रंगीत दिव्यांच्या सुदर माळा लहडलेल्या.

जाळ्यातून उडी मारणारा वाघ, कसरत करणारी युवती, हाताच्या बोटांवर व्हॉलीबॉलचा चेंडू फिरवणारा तरुण, लहानसं पिंप ढकलणारी पामोरियन कुत्री, स्टुलावर बसलेले हत्ती यांची आकर्षक चित्रं तंबूच्या प्रवेशद्वारावर दिमाखात लटकत प्रेक्षकांना तंबूकडे खेचत असतात. तिकिटांसाठी मोठ्या माणसांची रांग लागलेली असते आणि त्यांची बोटं घट्ट धरून लहान पोरं आपल्या टाचा उंचावत प्रवेशद्वारालगतच असलेले हत्ती, घोडे आणि स्वत:च्या पंखांमध्ये लांब चोची खुपसणारे पेलिकन पक्षी पहात असतात. लाउड स्पीकरवर कुठल्या तरी इंग्लिश गाण्याची धून सुरू असते.

तिसरी घंटा होते. सर्कसच्या वाद्यवृंदाचा सेक्साफोन आणि ड्रमसेट घुमायला लागतो. जांभळ्या रंगाचा मखमली पडदा बाजूला सरकतो. पांढराशुभ्र तंग पोषाख घातलेले नऊ तरुण झगमगत्या कपड्यातील चार तरुणी व दोन जोकर रिंगणात प्रविष्ट होतात. प्रेक्षकाना अभिवादन करतात आणि आधीच उभारून ठेवलेल्या झुल्यावर खारीसारखे सरसर चढायला लागतात.

तंबू अर्धाअधिक भरलेला. सगळ्यांच्या माना झुल्याकडे टांगलेल्या. टाळ्यांचा इशारा होतो, तंबूतले दिवे जास्तच प्रखर होतात, झोक्यांचा वेग वाढतो, प्रेक्षकांचे ठोकेही जलद होतात. झुल्यावर चढलेल्या जोकरांची चट्टेरी–पट्टेरी पँट झोक्यावरचा तरुण खेचून खाली फेकतो. तंबूमध्ये हास्याची लकेर उमटून जाते.

दहाएक मिनिटांनी झुल्यावरचा खेळ संपतो. नव्या खेळाला सुरुवात होते. एकामागून एक कसरतपटू रिंगणात येत असतात, रबरासारखं लवचिक शरीर वाटेल तसं वाकवत सुदर कसरती करतात, प्रेक्षकांची वाहवा मिळवून जातात. दोन मोठ्या प्रयोगांमधलासुद्धा वेळ फुकट जाऊ नये म्हणून लहान खेळ चालूच असतात. मोठ्या प्रयोगाच्या साहित्याची जमवाजमव झाल्यावर हे छोटे खेळाडू बाजूला होतात. शिवाय अधूनमधून विदुषकी चाळे असतातच.

मध्येच अजस्र हिप्पोपोटॅमसला घेऊन एक सुदर तरुणी येते. त्या बेढब प्राण्याला रिंगणभर फिरवते आणि पुन्हा घेऊन जाते. नंतर हत्ती येतात, घोडे येतात, अस्वलही छत्री सावरत येऊन जातं. लहान पोरं निहायत खूष झालेली असतात.

पाच पांढरी शुभ्र पामोरियन कुत्री येतात. एकमेकांच्या पाठीवर पुढले दोन पाय ठेवून लहानसं पिंप रिंगणात इकडून तिकडे ढकलत नेतात. मैदानात शून्य ते नऊ आकडे लिहिलेले पत्रे ठेवले जातात. प्रेक्षकामधील एकजण ओरडतो–' सात.' रिंगणातल्या फळ्यावर तो आकाडा लिहिला जातो. एक छोटं कुत्रं तो आकडा पहात आणि दुडुदुडू रिंगणातला सात आकडा लिहिलेला पत्रा तोंडात घेऊन येतं.

हिरव्यागार पाच-सहा पोपटांना पितळी दांडीवर नाचवत एक तरुणी रिंगणात येते. लहानशा 'सीसॉ' वर तीन राघू कसरत करतात. मग एक छोटंसं मेरी–गो–राउंड *आणलं जातं. त्यामध्ये चार–पाचजण बसतात* आणि एक राघू ते अतिशय सफाईने गोल गोल फिरवत राहतो

तरुणींचा एक गट सायकलवर कसरती करून दाखवत असतानाच रिंगणाच्या कडेने मोठमोठ्या लोखंडी जाळ्या आणल्या जात असतात. पाचच मिनिटात सबंध रिंगण जाळ्यांनी वेढलं जातं आणि एक भक्कम लोखंडी पिंजरा उभा राहतो. वाद्यवृंदाखाली असणारा मखमली पडदा बाजूला सारून दोन अवजड पिंजरे दहा–बाराजण मिळून ढकलत ढकलत रिंगणापर्यंत आणून उभे करतात. पिंजऱ्यांच्या जाळ्या वर खेचल्या जातात आणि आतल्या जनावराना ढोसून बाहेर काढलं जातं. प्रथम तीन वाघ बाहेर पडतात आणि त्यांच्या पाठोपाठ एक सिंह, सिंहीण आणि त्याचा दोन–अडीच वर्षांचा बच्चा. सर्वांना समोरासमोर बसवलं जातं. आतमध्ये रिंगमास्टर आणि त्याचा एक सहाय्यक. एका वाघाला दोऱ्या बांधून पिंजऱ्याबाहेरून एका माणसाने धरून ठेवलेलं तो जरा जास्त उनाड असावा. सर्वजण मागल्या दोन पायांवर उभं राहाणं, स्टुलांवर दोन पाय ठेवून उभं राहाणं इत्यादी कसरती करून दाखवतात. मग तो दोऱ्यानी खेचून धरलेला वाघ वगळता इतर सर्वांना पिंजऱ्यामध्ये परत पाठवलं जातं. आता एका छोट्या लोखंडी कड्याला चार ठिकाणी जाळ लावला जातो आणि पेटलेल्या कड्यातून हा ढाण्या वाघ बिनदिक्कतपणे उड्या मारतो. टाळ्यांचा कडकडाट होतो आणि याबरोबरच सर्कसचा खेळ संपतो !

गॅलरीतल्या फळ्यांवर बसलेली मोठी माणसं आपल्या पोरा–बाळांना सावरत खाली उतरण्याची कसरत करायला लागतात. लहान पोरं माकडासारखी उड्या मारत

उतरतात, पण तेवढ्यात कुणाचा तरी पाय फळ्यांच्या बेचक्यात जातोच.

तंबूबाहेर पुढल्या खेळासाठी आत येणाऱ्यांची रांग लागलेली असते. अनेकजण तिकिटांच्या खिडक्यांवर धावपळ करत असतात. आधीचा खेळ पाहून बाहेर पडलेले प्रेक्षक सायकली, रिक्षा इतर वाहनांना चुकवत रस्त्यापर्यंत येऊन पोचतात, तोपर्यंत पुढल्या खेळाची पहिली घंटा होऊन गेलेली असते. हे रहाटगाडगं असं कायमच चालू रहात असतं. पाहणाऱ्याचे चेहरे बदलते असतात, पण खेळ करणारे तेच असतात!

¤

सर्कस पाहून बाहेर पडलो आणि सर्कसच्या व्यवस्थापकाची भेट घेतली. रंगाने गोरे, उंची विशेष नाही, पण अतिशय प्रसन्न व्यक्तिमत्त्व–कुठेही पदावरच शोभावं असं. आधी त्यांच्याशी हिंदी-इंग्लिशच्या कुबड्या लावून बोलण्याचा प्रयत्न केला. सर्कसच्या या अवाढव्य संसाराबद्दल माहिती हवी असल्याचं सांगितलं आणि त्याचं नाव विचारलं– 'माझं नाव गोगटे' मॅनेजरसाहेब शांतपणे म्हणाले. मी एकदम खलासच झालो! गोगटे आडनावाचा मनुष्य सर्कसचा मॅनेजर! गोगटे हे आडनाव असणारी माझ्या माहितीतली पाच-दहा माणसं झरझर माझ्या नजरेपुढून सरकली आणि त्यांच्या पार्श्वभूमीवर या माणसाचं वेगळेपण अधिकच प्रकर्षानं जाणवलं.

¤

दुसऱ्या दिवशी सकाळी भेटण्याचं ठरलं होतं त्यानुसार गेलो. गोगटेसाहेब फोनवर कुणाशी तरी बोलत होते. त्यानी फोन खाली ठेवला आणि आमच्या गप्पांना सुरुवात झाली.

'गेली जवळजवळ एकोणतीस वर्षं मी या सर्कसच्या जगात आहे' असं सुरुवातीलाच सांगून श्री. गोगटे म्हणाले, 'सुमारे वीस वर्षांपूर्वी श्री. के. पी. हेमराज यांनी बिहारमध्ये या 'अमर सर्कस'ची स्थापना केली. ते स्वतः केरळीय असूनही सर्कसची सुरुवात मात्र बिहारमध्ये करण्याचं कारण असं की कोणतीही सर्कस बिहारमध्ये सर्वात चांगल्या तऱ्हेने फोफावते. त्या राज्यात विविध प्रकारचे मेळे, जत्रा वर्षभर सतत सुरू असतात. त्यामुळे तिथे सर्कसचाही धंदा चांगल्या तऱ्हेने वाढू शकतो आणि सर्कसचा पसारा वाढवण्यासाठी लागणारं पैशाचं पाठबळ त्यातून उभारता येतं.

'आज या सर्कसमध्ये शंभर-सव्वाशे कलाकारांसह सुमारे साडेतीनशे–चारशे माणसं काम करतात. शिवाय दहा हत्ती, वीस घोडे, सहा सिंह, चार वाघ, चार उंट, चार अस्वलं, दहा-बारा कुत्री असा मोठा शिकारखानाही आहे.

'या प्राण्याच्या बाबतीत हल्ली जाणवणारी महत्त्वाची अडचण म्हणजे सर्कशीसाठी वाघ मिळवणं ही फार कठीण गोष्ट होऊन बसली आहे. आज एकेका वाघासाठी एक लाख रुपये मोजावे लागतात आणि तरीही ते मिळण दुरापास्तच असतं त्या मानानं चांगल्या हत्तीची पिल्लंसुद्धा बिहारसारख्या ठिकाणी पंधरा-वीस हजार रुपयांपर्यंत सहज आणि हवी तितकी उपलब्ध होऊ शकतात. म्हणजे आज हत्तीपेक्षा वाघ हेच जास्त मौल्यवान जनावर झालेलं आहे. अर्थात हत्ती हा प्राणी जात्याच बुद्धिमान असल्याने त्यांना सर्कशीसाठी ट्रेनिंग देणं फार सोपं जातं. कित्येकदा मोठ्या हत्तीचं अनुकरण करून लहान हत्ती एखादा प्रयोग पिक अप करतात. घोडा हे जनावर मात्र शिकवायला सर्वात कठीण असतं. वाघ-सिंह हे प्राणीही सर्कशीच्या वातावरणाशी जुळवून घेऊ शकतात; पण शेवटी हिंस्त्र श्वापद आहेत, हे ध्यानात घेऊनच त्यांच्याशी वागावं लागतं!

'या वाघ-सिंहांची गंमत म्हणजे रिंगमास्टरच्या हातातली काठी किंवा आसूड यावर त्यांच्या हालचाली होत नसतात. या प्राण्यांची नजर सतत रिंगमास्टरच्या डोळ्यावर असते. त्याच्या डोळ्यांमध्ये जर चलबिचल झाल्यासारखी किंवा तो घाबरला आहे असं या प्राण्यांना वाटलं तर ते एका क्षणात त्याच्यावर हल्ला चढवतात. त्यामुळे काठी किंवा आसुडापेक्षाही नजरेच्या इशारतीवरच रिंगमास्टर वाघ-सिंहाकडून कामं करून घेत असतो.'

वन्य प्राण्यांचा ताफा हे सर्कसचं मुख्य आकर्षण असलं तरी हल्ली या प्राण्यांच्या खेळामधलं वैविध्य कमी होत चाललं आहे हे मान्य करून श्री. गोगटे म्हणाले, 'याचं मुख्य कारण म्हणजे सर्कसच्या प्रेक्षकांचे इंटरेस्ट आता बदलले आहेत. प्राण्याचे खेळ फक्त लहान मुलांना आवडतात; पण मोठ्या माणसांना त्यामध्ये फारसा रस नसतो. त्यापेक्षा तंग किंवा तोकड्या कपड्यामधील तरुणींच्या कसरती त्यांना जास्त आकर्षित करतात शिवाय बदलत्या जमान्यानुसार सर्कसचा बाह्य देखावा, जाहिरातबाजी, विद्युतरोषणाई यावर सर्कसचालकाना बराच खर्च करावा लागतो. त्यामुळे जनावरं पाळून त्यांना शिकविण्यासाठी होणाऱ्या खर्चाला हल्ली फाटा द्यावा लागतो.

'परदेशातील सर्कशीमध्ये चालणारे प्राण्यांचे खेळ आणि आपल्या भारतीय सर्कशीमधले खेळ यात फारसा फरक नसतो; पण परदेशात बहुतेक सर्व प्राणी हे पशुशिक्षकाच्या स्वतःच्या मालकीचे असतात व ते तो सर्कशीसाठी देत असतो. याच्या उलट आपल्याकडे मात्र प्राणी सर्कसवाल्यांच्या मालकीचे असतात आणि त्यांना शिकवून तयार करणारा माणूस हा सर्कशीतल्या इतर कलाकाराप्रमाणेच एक पगारी नोकर असतो. याचा परिणाम असा होतो की, स्वतःच्या प्राण्यांना तयार करताना शिक्षकाला वाटणारी आत्मीयता आपल्या सर्कशीमधल्या पशुशिक्षकामध्ये साहजिकच नसते आणि त्याचा परिणाम प्राण्यांना शिकवण्यावर व त्यांच्या प्रत्यक्ष performance वरही होतो.'

सर्कसच्या दिनक्रमाबद्दल सांगताना श्री. गोगटे म्हणाले, 'रोज सकाळी सहा ते नऊ या वेळात सर्कसमधल्या कसरतपटूंची तालीम चालते. यामध्ये नित्याचे प्रयोग घोटवून जास्तीत जास्त सफाईदार करणं व नवनवीन प्रयोग तयार करणं या दोन्ही गोष्टींचा समावेश असतो. प्राण्यांच्या तालमी मात्र रात्रीचा खेळ संपल्यानंतर चालतात. कारण रोज रात्री प्राण्याचा खेळ शेवटी असतो. त्यामुळे रिंगणात लोखंडी जाळ्या उभारलेल्याच असतात. सर्व प्रेक्षक निघून गेल्यावर तिथेच या प्राण्यांचा पुन्हा सराव सुरू होतो आणि मग त्याना जे पिंजऱ्यात बंदिस्त केलं जातं ते दुसऱ्या दिवशी दुपारच्या खेळापर्यंत.'

'सर्कशीतल्या कसरतपटूंच्या विविध खेळांपैकी झुल्यावरचा खेळ (Flying Trapiz) हे भारतीय सर्कशीचं खास वैशिष्ट्य आहे. झुल्यावरचे असे अप्रतिम

प्रयोग तुम्हाला परदेशी सर्कशींमध्ये फारसे आढळणार नाहीत. अर्थात या खेळामध्ये माणसाच्या जिवालाही फार धोका असतो आणि अपघातही बरेच होतात. कारण रिंगणात मोठी जाळी लावलेली असते. हे जरी खरं असलं तरी वरून उडी मारताना कसरतपटूला जाळीवर सरळ आडवंच पडावं लागतं. अन्यथा पाठीच्या मणक्यांना जबरदस्त मार बसून मनुष्य दगावण्याचीही दाट शक्यता असते. केरळमध्ये तेलीचेरी या ठिकाणी सर्कसमधल्या विविध खेळांचं प्रशिक्षण देणारी एक खास संस्था आहे आणि प्रथम तिथे पुरेसं शिक्षण घेऊनच तरुण कलाकार सर्कसच्या जगात प्रवेश करतात. भारतात सर्कसच्या व्यवसायावर केरळीय माणसानं आज सर्वांत जास्त ताबा मिळवला आहे, याचं हेही एक कारण असू शकेल. अर्थात प्रोफेसर छत्रे, देवल, वालावलकर यांच्यासारख्या महाराष्ट्रीय माणसांनी इथे सर्कसचं युग सुरू केलं हे खरं असलं तरी त्यानंतर मराठी माणसानं या व्यवसायातून आपलं अंग काढून घेतलं, हे मराठी माणसाच्या या क्षेत्रातील पीछेहाट होण्याचं सर्वांत महत्त्वाचं कारण आहे, असं मला वाटतं

सर्कसचं अर्थशास्त्र स्पष्ट करताना श्री. गोगटे म्हणाले, 'आमचा कलाकार, प्राणी व अन्य सर्व बाबींवर मिळून दररोज सुमारे बारा हजार रुपये खर्च होतो. सर्कसच्या प्रयोगातून फायदा होण्यापेक्षाही हा खर्च भरून निघावा यासाठीच रोज प्रत्येक प्रयोगाला सर्कसचा तंबू किमान तीस टक्क्यापर्यंत भरावा लागतो. त्यामुळं सर्कस चालवणं हा फार मोठा जुगार होऊन बसला आहे. शिवाय वाईट हवामान किंवा तत्सम घटकाचाही फटका या व्यवसायात बसतो.

'कोणती सर्कस कोणत्या मार्गावरील गावं घेत घेत पुढे जाणार याची आखणी कित्येकदा सहा सहा महिने आधी होत असते. तरी मुंबई, दिल्ली, लखनौ, कलकत्ता यासारख्या मोठ्या शहरामध्ये एकाच वेळी दोन किंवा तीनसुद्धा सर्कशी चालू असण्याचे प्रकार घडतातच. याचाही सर्कसच्या धंद्यावर अनिष्ट परिणाम होतो.

'सर्कसचा मुक्काम एका गावाहून दुसऱ्या गावाला हलवणं म्हणजे मोठीच यातायात असते. ते गाव जर लोहमार्गावर नसेल तर सर्व वाहतूक ट्रकमधून करावी लागते अगदी आमचे हत्ती–घोडे आणि वाघ–सिंहाचे पिंजरेही या ट्रक्समधूनच नेले जातात. कारण प्रवासात त्याची आबाळ होऊ देणं हितावह नसतं. रेल्वेमार्गावरचं गाव असेल तर सर्व वाहतूक रेल्वेनेच केली जाते. ते जास्त सोईचं आणि सुखावह असतं; पण त्यासाठीही खर्च बराच येतो. गेल्या वर्षी आम्ही खास रेल्वे करून दिल्लीहून मद्रासला गेलो, या प्रवासाच्या भाड्यापोटी आम्हाला दीड लाख रुपये मोजावे लागले तर बेळगाव–मुंबई या प्रवासासाठी पंचाहत्तर हजार रुपये !'

सर्कसच्या भवितव्याविषयी अनेक प्रकारच्या शंका व्यक्त होत असतात. त्याबद्दल विचारलं असता श्री.गोगटे म्हणाले,'हा सगळा अर्थव्यवहार पाहिला की हे सर्कसवाले व्यवसाय बंद कसा करत नाहीत,असा प्रश्न कोणालाही पडेल. सर्कस–चालकांना या सगळ्यातून श्रम आणि धोक्याच्या मानाने फारसा पैसा मिळत नाही, हे खरं, पण आज तीन–चारशे माणसं आणि पर्यायानं त्याच्या गावी त्याच्यावर अवलंबून असलेले त्यांचे कुटुंबीय या सर्कशीमुळंच उदरनिर्वाह करू शकतात, याच समाधान सर्कस–चालकाला असतं. किंबहुना हा थोडासा व्यापक विचार मनात ठेवूनच तो सर्कसचा गाडा अगदीच अशक्य होईपर्यंत रेटत असतो. अर्थात या सर्व बाबींबरोबरच माझा असा ठाम विश्वास आहे की, जोपर्यंत भारतात लहान मुलं आहेत तोपर्यंत इथे सर्कस हा प्रकार नामशेष होण्याची अजिबात भीती नाही !'

श्री. गोगटे यांनी देवल, वालावलकर, रॉयल, जेमिनी, गोल्डन अशा विविध सर्कशीमध्ये गेली अठ्ठावीस-एकोणतीस वर्षं घालवली आहेत. 'तुमच्यासारखा मराठी माणूस या क्षेत्रात शिरला करी कसा?' हा प्रश्न विचारल्याशिवाय मला राहवलं नाही; पण श्री. गोगटे यांनी शांतपणे सांगितलं, 'मी मूळचा सांगलीचा. मला लहानपणापासूनच आपण भरपूर हिंडावं, निरनिराळी गावं पाहावीत, विविध प्रकारचे अनुभव घ्यावेत असं सारखं वाटायचं. शेवटी माझ्या असं लक्षात आलं की, सर्कस हे असं एक क्षेत्र आहे की, जिथं माझं हे स्वप्न पुरं होऊ शकेल. लवकरच मी सर्कसच्या जगात प्रवेश केला आणि अजूनही या जगाचा मला कंटाळा तर आलेला नाहीच, उलट अखेरपर्यंत इथंच राहण्याची माझी इच्छा आहे.'
¤

सर्कसमध्ये काम करणाऱ्या कसरतपटूचीही या जगाबद्दल काही ना काही मतं असतातच. काही तक्रारीही असतात. 'अमर सर्कस'मध्ये काम करणाऱ्या मास्टर रवींद्रन या कलाकाराची मध्यंतरी एक मुलाखत प्रसिद्ध झाली होती. त्यात त्याने आपल्या सहकाऱ्यांचं दुःख चांगल्या तऱ्हेनं व्यक्त केलं होतं तो म्हणाला,

'या क्षेत्रात धोका अतिशय असतो; पण शासनाची या कलेला मिळणारी सक्रिय सहानुभूतीही तितकीच कमी आहे. त्यामुळं या तंबूच्या बाहेरच सरकारचे कायदेकानू चालतात. तंबूच्या आत सर्कसचा मालक हाच सर्वेसर्वा असतो आणि सगळं त्याच्या कृपेवरच चालतं. या व्यवसायात काम करणाऱ्याच्या हितासाठी कोणत्याही प्रकारचा कायदा नाही, विमा नाही, पेन्शन नाही. मालकाची मर्जी हा एकमेव कायदा इथं चालतो.

'सरकार तमाशाला आश्रय देतं, नाटकसिनेमाला तर हा आश्रय केव्हाच मिळालाय. त्यातल्या कलावंताना 'पद्मश्री'सारखा बहुमान मिळतो. कुणी मुंबईसारख्या शहराचा शेरीफही होतो ! मग जिवावर उदार होऊन इतकी धोकादायक कामं करून लोकरंजन करणाऱ्या सर्कस-कलावंतांकडेच सरकारचं दुर्लक्ष का ? एखाद्या सामान्य कामगाराला सहज मिळणाऱ्या विमा, महागाईभत्ता यांसारख्या सवलती आम्हाला मिळत नाहीत आणि शासनही याबाबतीत उदासीन आहे. अर्थात ही परिस्थिती बदलण्यासाठी केंद्र शासनाने पुढाकार घ्यायला हवा आणि राज्यशासनाला काही ठोस पावलं टाकण्यास भाग पाडायला हवं.'

श्री. रवींद्रन याची ही प्रतिक्रिया अनेकाना सर्कसच्या जीवनाविषयी थोडा जास्त गंभीरपणाने विचार करायला लावणारी आहे. संध्याकाळचा तंबूतला झगमगता प्रकाश आणि त्या रिंगणातून बाहेर आल्यावर सर्वत्र पसरलेला भवितव्याविषयीचा अंधार हा contrast सर्कसजीवनाच्या विविध पातळ्यावर बोचणारा आहे.

सर्कसमधल्या मुलींचंही जीवन पाहण्या-

सारखं आहे. घरची गरिबी असल्यामुळं कुटुंबाला हातभार लावण्यासाठी महिना दोनशे ते पाचशे रुपयांच्या मोबदल्यात या मुली सर्कसमध्ये दाखल होतात. साधारणतः पाच वर्षांच्या करारानं त्या बांधलेल्या असतात. काम चांगलं जमायला लागलं की, त्यांना पगार मिळणार असतो; पण या अटीमुळं होतं असं की, ' अनेक जणींची कराराची मुदत संपून जाते तरी त्यांना काम चांगलं जमतच नाही; ' पण इथल्या कमाईवरच भावी आयुष्यातील अनेक आशा-आकांक्षा अवलंबून असल्यानं या मुली जीवन रेटत असतात. जमेल तितक्या लवकर आई-वडिलांकडे परत जाऊन लग्न करावं आणि सुखी व्हावं असं बहुतेक जणींचं स्वप्न आहे; पण सर्कसच्या धंद्यात असल्यानं लग्न जमवताना येणाऱ्या अडचणींचं सावटही त्यांना भेडसावत आहे. सध्या तरी अधिक चांगल्या दिवसाची आशा धरून सध्याचे दिवस जमतील तसे पुढं ढकलणं एवढंच या मुलींच्या हाती आहे. ¤

सर्कसचं जीवन हे असं आहे. अनेक जण इथं अनिच्छेनंच राहत असतात. इथल्या कलाकाराची जर ही अवस्था, तर मुक्या जनावरांची काय असेल याचा विचारच केलेला बरा. अर्थात या परिस्थितीवर उपाय शोधून काढण्याची जबाबदारी फक्त शासनाचीच नाही. सर्कस या प्रकाराविषयी आस्था असणाऱ्या प्रत्येकानं हा विचार केला पाहिजे आणि बाकी काहीही जमलं नाही तरी केवळ लोकाश्रयावर या भारतात अनेक कला जगल्या, वृद्धिंगत झाल्या हे लक्षात घेऊन तसा प्रयत्न करायला हवा. याबाबतीत किमान स्वतः प्रत्येक वेळी कर्तव्य म्हणून का होईना; पण तिकीट काढून सर्कस पाहिली तरीही याला हातभार लागू शकेल.

सर्कसची कला जगली पाहिजे असं वाटण्याची मुख्य कारणं दोन– त्यातलं पहिलं कारण म्हणजे इथला प्रत्येक कलावंत दर दिवशी तीन वेळा जिवावरचा धोका पत्करून तुमचं रंजन करत असतो. उदरनिर्वाहासाठी इतकी धडपड फार थोड्यांना करावी लागत असेल! त्याच्या या श्रमाचं मोल कलाकाराला देणं हे ' सामान्य सहजीवी ' (co-existant) म्हणूनही आपलं कर्तव्य आहे.

सर्कस जगली पाहिजे असं वाटण्याचं दुसरं कारण म्हणजे दिवसेदिवस जीवनाच्या सर्व क्षेत्रात नकलीपणा, बेगडीपणा याला अधिकाधिक स्थान येत चाललं आहे. आपले हिंदी सिनेमे तर बऱ्याच वेळा निम्म्याहून अधिक प्रमाणात त्यातल्या ' डमी 'नीच भरलेले असतात. अशा वेळी लख्ख कला दाखवून निखळ मनोरंजन करणाऱ्या कलावंतांची आणि पर्यायानं त्या कलेची जोपासना करणं आवश्यक आहे.

अर्थात या मुद्द्याचा गंभीरपणे विचार न करता किंवा विचार केला तरी पर्वा न करता आपण फक्त सिनेमाच्या थेटरावरच धडका मारत राहिलो तरी लगेच सर्कसचं जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त होणार आहे अशातला भाग नाही; पण मग कलाप्रेम किंवा कलासक्ती ही केवळ भरल्या पोटीची बिरुदं होऊन बसतील आणि त्यावर हक्क सांगण्याचा कोणताही अधिकार आपल्याला असणार नाही. □

रंगभूमी

# नाट्यसंमेलनासाठी हवे आहेत....!

' नाट्यसंमेलन ' नावाचा प्रकार दरवर्षी होतो. ' अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद ' असं भारदस्त नाव असलेली एक छोटीशी संस्था हा सोहळा भरवत असते. यंदाही तिनं हे कर्तव्य पार पाडलं. परिषदेच्या नाशिक शाखेनं दिलेलं निमंत्रण स्वीकारून एकसष्टावं नाट्यसंमेलन नाशिक क्षेत्री झालं–२४, २५ आणि २६ जानेवारीला.

साहित्यसंमेलन तीन दिवस! त्यात बरंच काही घडतं. नाट्यसंमेलनही तीन दिवस!

या तीन दिवसात नाशिकच्या संमेलनात काय घडलं? तर तिथंही बरंच काही घडलं. फक्त प्रत्यक्ष नाट्यसृष्टीबद्दलच कमी घडलं, एवढंच. तिथं सकाळी चहापासून दुपारी-रात्रीच्या जेवणापर्यंत उत्तम खाद्य-पेय-व्यवस्था होती. चांगल्या हॉटेलमध्ये राहायची व्यवस्था होती. आतिथ्यशील संयोजक होते. सौजन्यशील स्वयंसेवक होते. पुरेसं आर्थिक पाठबळ देणारे उद्योगपती होते. नाट्यपरिषदेच्या नाशिक शाखेचे अध्यक्ष नगराध्यक्ष डॉ. वसंतराव गुप्ते आघाडीवर असल्यामुळं नगरपालिकेचा फौजफाटा दिमतीला हजर होता.

सगळं होतं; पण नव्हते फक्त दोनच घटक. प्रत्यक्ष नाट्यक्षेत्रात वावरणारी मंडळी आणि ' नाटकावर जिवापाड प्रेम करणारा ' म्हणून ख्यातनाम असलेला रसिकवर्ग.

आणि हे नाशिकचंच चित्र आहे, असं नाही. जिथं कुठं हे नाट्यसंमेलन दरवर्षी भरतं तिथल्या संयोजनातला थोडा–फार तपशील बदलला तरी सगळीकडे अगदी असंच चित्र असतं म्हणे. किती सातत्यपूर्ण वर्तन आहे हे आपलं! पुढच्या वर्षी तरी ही परंपरा मोडून एकसष्टी ओलांडताना संमेलनाला बाळसं यावं म्हणून नाट्यपरिषदेनं आतापासूनच पुकारा करून ठेवावा, ' हवे आहेत–नाट्यसंमेलनासाठी नाट्यव्यावसायिक आणि नाट्यरसिक! '

खरोखरच अशा पुकाऱ्याची वेळ आली आहे, असं म्हणण्यासारखीच परिस्थिती आहे. नाशिकच्या संमेलनातली उपस्थिती पाहिली तरी याची सत्यता लक्षात येईल. नाशिकला किती नाट्यव्यावसायिक हजर होते? अगदी मोजके! भालचंद्र पेंढारकर, भालबा केळकर, दाजी भाटवडेकर, पुरुषोत्तम दारव्हेकर, वसंत कानेटकर, विद्याधर गोखले हे पूर्वाध्यक्ष. मावळते अध्यक्ष छोटा गंधर्व. पुरुषोत्तम दारव्हेकर वगळता एकही पूर्वाध्यक्ष तर सोडाच; पण मावळते अध्यक्ष छोटा गंधर्व हेही शेवटच्या दिवसापर्यंत हजर नव्हते! कार्यक्रमात तर यातल्या कुणाचाच सहभाग नव्हता. जणू काही हजर राहून शाल आणि श्रीफल-पुष्पगुच्छ घेणं एवढंच कर्तव्य जबाबदारीनं पार पाडण्यासाठीच सगळे आले होते. वसंत कानेटकर एवढे नाशिकचे. शेवटच्या दिवशी ते नाशकातच होते. (शिक्षणमंत्री डॉ बळीराम हिरे यांनी त्यांच्या समवेत

सकाळी चहापान केल्याचं सांगितलं त्यावरून हे कळलं.) पण त्यानाही समारोपाच्या दिवशी संमेलनाकडे यायला वेळ मिळाला नाही. नाशिकरांच्या मनात आदराचं आणि प्रेमाचं स्थान असलेले स्वागताध्यक्ष तात्यासाहेब शिरवाडकर मात्र प्रकृती बरी नसताना उगाचच सारखे हजर राहात होते. एकदा दिसलं की, दरबाराच्या लेखी (जाणे-येणे-मानधन वगैरे) नोंद झाल्याशी कारण, हा परिपाठ त्यांच्या अंगवळणी पडला नसावा.

ही पूर्वाध्यक्षांची स्थिती! नाट्यपरिषदेच्या कार्यकारिणीवर असलेल्या सुहासिनी मुळगावकर, रजनी जोशी वगैरेंनी याच धर्तीवर हजेरी लावली. दिग्दर्शकांपैकी दामू केंकरेंसारखं एखादं नाव सोडलं तर आनंदच होता. सुरेश खरे, डॉ. अ. वा. वर्टी आणि आत्माराम सावंत हे तीन नाटककार, भिकू पै आगले, विनय आपटे, मंगेश कुलकर्णी ही रंगभूमीवरची काही मंडळी, अनंत काणे आणि भाऊसाहेब सप्रे हे दोन निर्माते. बस्स. नाट्यव्यावसायिक एवढेच. बाहेरगावाहून सुमारे तीनशे 'रसिक' आले होते आणि त्यांच्यासह जवळजवळ दोन हजार रसिक संमेलनाला हजर होते. कार्यक्रमपत्रिकेत विजया मेहता, कमलाकर सारंग, लालन सारंग, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे वगैरे अनेक नामवंतांची नावं होती; पण ही मंडळी फिरकलीसुद्धा नाहीत! नाट्यसमीक्षक मात्र तुलनेनं मोठ्या संख्येनं आले होते. (वृत्तपत्रप्रतिनिधीवगळता.) कृ. रा. सावंत, वि. भा. देशपांडे, कमलाकर नाडकर्णी, कमलाकर सोनटक्के वगैरे. अनंत भावेसारखे रसिकही मोजकेच होते. शं. ना. ऊर्फ दादासाहेब अंधुरकर, डॅडी लोणकर, मनोहर कुलकर्णी ही नाट्यपरिषदवाली प्रमुख मंडळी.

तेव्हा अशा या मोजक्या मंडळींचा हा मेळावा झाला. 'संमेलन' वगैरे मोठा शब्द वापरण्यासारखं भरघोस त्यात काहीही नव्हतं. ज्यांच्या क्षेत्राशी संबंधित असं हे संमेलन त्या नाट्यव्यावसायिकांची बेफिकिरी आणि ज्यांच्या जिव्हाळ्याची ही आवड त्या नाट्यरसिकांचं दुर्लक्ष अशा अभावातनं पार पडलेला हा सोहळा. लाख-दीड लाख रुपये खर्चाचा एक उपचार!

नवे अध्यक्ष आणि प्रसिद्ध कलाकार आत्माराम भेंडे यांनाही ही बोच जाणवलेली दिसली. नाट्यपरिषदेचे एक प्रमुख कार्यकर्ते डॅडी लोणकर यांनीही 'दरवर्षीच असं होतं' ही खंत अनेकदा बोलून दाखवली, ती खरोखरच विचार करण्यासारखी आहे.

या संदर्भात साहित्यसंमेलनाचं दृश्य पाहण्यासारखं आहे. तिथे होणारं विचारमंथन एखाद्या वेळी कमी दर्जाचं असेल; कवींचा पूर लोटत असेल, दंगा होत असेल पण त्या साऱ्यांमध्ये एक आत्मीयता असते. साहित्यक्षेत्रात वावरणाऱ्याची त्याच्याशी एक निष्ठा असते. ठरविलेला वक्त्याचा संपूर्ण संचच आला नाही, हा नाट्यसंमेलनात येणारा अनुभव तिथे येत नाही. तसंच ऐन वेळीही वक्ते मिळवण्यासाठी फार प्रयास तिथे करावे लागत नाहीत, इतकी आघाडीची मंडळी तिथे हजर असतात. नाट्य हा साहित्याचाच एक देखणा भाग असतानाही ही मंडळी जणू काही नाट्यसंमेलनाला गर्दी करणारे प्रकाशक (एखादे पंडित अनंत कुलकर्णी वगळता) नाट्यसंमेलनाकडे डोकवतही नाहीत. न टकाना आवडीनं जाणारे हजारो प्रेक्षक गावोगावी आहेत. हा रसिकवर्ग आणि साहित्यावर प्रेम करणारा रसिकवर्ग बव्हंशी एकच आहे ना? साहित्यसंमेलनाला हजारोंच्या संख्येनं हे रसिक अगदी रत्नागिरीपासून हैद्राबाद–धारवाड भागापर्यंत कुठूनही येतात; पण नाट्यसंमेलनाला सावंतवाडी साहित्यसंमेलनाचं यजमानपद भूषवणाऱ्या पी. डी. नाइकांसारखा एखादा अपवाद वगळता बाहेरगावाहून फारसं कुणी येत नाही. मग ते संमेलन फुलणार कसं? बहरणार कसं?

या साऱ्याला मुख्य जबाबदार धरायला हवेत ते नाट्यव्यावसायिक! ज्या क्षेत्राच्या सहाय्यानं आपण जीवनात उभे आहोत, त्याच्याशी व्यवसायेतर स्वरूपाची काही बांधिलकी या मंडळींना वाटत नाही का? त्यांनीच या पूरक चळवळीकडे दुर्लक्ष केलं तर ही चळवळ वाढणार कशी? अखिल भारतीय असा मोठा पसारा नावात घेतलेली मराठी नाट्यपरिषद महाराष्ट्रातही पुरेशी पसरलेली नाही. आहेत त्या सर्वच शाखा कार्यक्षम आहेत, असं नाही, अशी व्यथा खुद्द आत्माराम भेंडेंनीच समारोपाच्या भाषणात बोलून दाखवली आहे. नाट्यक्षेत्रच या संघटनेकडे दुर्लक्ष करीत राहिलं तर ती फोफावणं शक्य नाही. नुसता निधी देऊन तिचं कार्य वाढणार नाही. या मंडळींनी सक्रिय सहभाग घ्यायला हवा, तरच संघटित शक्तीच्या जोरावर नाट्यक्षेत्राचे काही प्रश्न ती मांडू शकेल, सोडवू शकेल. साहित्यसंमेलन भरविणाऱ्या साहित्यमहामंडळाला काही फार मोठे अधिकार आहेत आणि त्या बळावर ते साहित्यसंस्था किंवा साहित्यिक यांच्यावर हुकमत गाजवू शकतं, असं नाही. ते मंडळही तसं नामधारीच आहे; पण साहित्यसंस्था, साहित्यिक आदि घटकांनी त्याला आपणहून एक मान्यता दिली आहे, त्याचं संघटन स्वीकारलं आहे. त्यामुळेच त्या मंडळालाही काही अर्थ प्राप्त झाला आहे. नाट्यव्यावसायिकांनी नाट्यपरिषदेबद्दल अशी भूमिका घेतली तरच ही परिषद (अंतर्गत हेवे–दावे गृहीत धरूनही) वाढू शकेल. नाही तर फक्त संमेलनाच्या वेळी अहवाल सादर करतानाच तिचं स्मरण होईल.

नाट्यव्यावसायिकांच्या उदासीनतेचाही बराच परिणाम रसिकांच्या गर्दीवर होतो, ही वस्तुस्थिती आहे. अरविंद देशपांडे, कमलाकर सारंग, विजया मेहता, विक्रम गोखले, यशवंत दत्त, बाळ धुरी, निळू फुले, बबन प्रभू, दत्ता भट–प्रभाकर पणशीकर, (सध्या ते आजारी आहेत, हा भाग वेगळा.), बाळ कोल्हटकर, जब्बार पटेल, विजय तेंडूलकर, श्रीराम लागू, अमोल पालेकर, शं. ना. नवरे, राजा गोसावी, शरद तळवळकर, लालन सारंग, भक्ती बर्वे, माधव मनोहर, वसंतराव देशपांडे, विश्वनाथ बागूल, श्रीकांत मोघे, व्यंकटेश माडगूळकर, सई परांजपे, स्मिता पाटील, रघुवीर तळाशिलकर, द. ग. गोडसे अशी अनेक नावं या संदर्भात सांगता येतील. नाट्यक्षेत्रात गाजलेली ही मंडळी एखादा दिवस का असेना, संमेलनात सक्रिय हजेरी लावणार असतील तर संमेलनाबद्दलचं रसिकांचं आकर्षण वाढल्याशिवाय राहणार नाही. पुण्या–मुंबईपेक्षा ग्रामीण भागात निश्चितपणानं त्याचा परिणाम होईल. नाट्यविषयक जागृती आणि प्रेम समाजात वाढविण्याच्या कार्यात या व्यावसायिकांवर हीसुद्धा एक नैतिक जबाबदारी येत नाही का? कारण समाजात असं नाट्यप्रेम वाढवणं त्यांच्या आणि अंतिमत: एकूण नाट्यकलेच्याच हिताचं आहे. इतर वर्षभर व्यवसाय चाललेलाच असतो; पण ज्या कले-

वर हा व्यवसाय चाललेला आहे त्या कलेसाठी वर्षातून दोन–तीन दिवस देणं अवघड वाटू नये. त्यातूनही ते गैरसोयीचं वाटत असेल तर संमेलन तीन दिवस झालंच पाहिजे, या समजुतीचाही फेरविचार करायला हरकत नाही. दोनच दिवस संमेलन ठेवावं; पण नामवंतांची आणि रसिकाची उत्फुल्ल गर्दी, भरगच्च दर्जेदार कार्यक्रम आणि उत्तम व्यवस्था यानी ते परिपूर्ण व्हावं. प्रतिसाद वाढत राहिला की मग दोनचे तीन दिवस करण्याचा विचार करता येईल; पण तीन दिवस रडतखडत समेलनाचा गाडा हाकत राहण्यापेक्षा दोन दिवसांत ते आटोपशीर होणं चागलं.

अध्यक्षीय भाषणात आत्माराम भेंडेनी काही स्वप्नं रंगवली आहेत. चांगल्या, आखीव–रेखीव स्वरूपाच्या, नाट्यव्यावसायिकाच्या सक्रिय सहभागाच्या आणि रसिकाच्या अलोट गर्दीच्या नाट्यसंमेलनाचं हे आमचं स्वप्न आहे. अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत आपल्या स्वप्नांबरोबरच त्यानी हे स्वप्नही पूर्ततेकडे न्यायचा प्रयत्न करावा आणि पुढच्या वर्षी पुढच्या अध्यक्षाकडे त्याचा उर्वरित भाग सुपूर्त करावा. तो प्रदान–सोहळा पहायला रसिकांनी गर्दी करावी, एवढीच अपेक्षा आहे.

—विजय कुवळेकर.

चित्रपट

# आँचल

## ताराशंकर बंदोपाध्यायांची कथा आहे हे खरेच वाटत नाही

नुकतंच उजाडलं आहे. मोठ्या अंगणाच्या ऐसपैस घरात गायीगुराच्या गोठ्यात, तुळशीवृंदावनाजवळ, भूपाळी गात घरची लक्ष्मी वावरतीय. तिचा पती अन् धाकटा दीर याचं प्रेमाचं घर नादतंय. उणीव काय ती फक्त रांगत्या बाळकृष्णाची! खेडेगावातल्या त्या धनवंताघरचा छोटा मालक थोडा लाडावलेला आईसमान भावजयीच्या प्रेमानं. लाडानं. सदैव सांभाळून पाखर घालणारी भावजय. अशा नांदत्या घरावर एक सावट. सर्व दोषांनी, व्यसनांनी रंगलेलं खलपात्र. त्याची दूरच्या नात्याची नटखट, फटाकडी, छेलछबीली बहीण. छोट्या मालकांच्या प्रेमातली.

आता एवढं सर्व सांगितल्यावर तुम्ही पुढचं सर्व ओळखणार आहात. भावजयीचा दिरासाठी असीम त्याग. त्यासाठी तिनं रात्रभर जेवणासाठी खोळंबून बसणं. तू मेरे सर पे हात रखकर कसम खा की शराब नही पियेगा' असे आळवणं. खलनायकी कारस्थानातून दीर–भावजयीच्या या प्रेमाला दृष्ट लागणं. त्यांच्या पवित्र नात्याचा वाईट अर्थ लावून बदनाम करण्याच्या उद्योगात खलनायकाचे खर्ची पडलेलं कौशल्य मग पुन्हा या गैरसमजाच्या वादळातून शेवटच्या ग्रुपफोटोला योग्य अशी परिस्थिती तयार होईपर्यंत बसणं, एवढंच हातात असतं.

आता हिंदी सिनेमाच्या शिरस्त्यानुसार आपण बऱ्याच गोष्टी कानाआड (की नजरेआड) करायच्या असतात हा खलनायक कर्जबाजारी आहे, तरीही प्रसंगी शे–पन्नास भाडोत्री गुंडांची फौज उभी करतो. त्याची आश्रित गरीब बहीण सदैव सोळा सिंगार करून गावातल्या पोरांचं इमान बिघडवीत गौळणीचं काम करते. गावातल्या दोन कुचाळक्या करणाऱ्या म्हाताऱ्याचे अती नाटकी आविर्भावातले वावरणे.

ही ताराशंकर बंदोपाध्यायांची कथा आहे. खरं वाटत नाही; पण आहेच. त्यांच्या कथेतून आपल्याला भिडणारं बंगालमधील ग्रामजीवन. तिथलं ऋतुचक्र, जमीनदारी आणि वर्गकलहानी ढवळणारं मानवी जीवन याचा मागमूसही इथं नाही आहे.

या खेड्यातली माणसं, वातावरण अगदी फिल्मी आहे. राखीचा पती अमोल पालेकर आणि त्याचा छोटा भाऊ राजेश खन्ना, गावातला खलनायक प्रेमचोप्रा व त्याची बहीण रेखा एवढी पात्रयोजना सांगितली. तरी कल्पना येईल. ही इतकी विसगत वाटतात, खटकतात की विचारू नका! वास्तविक ही सारी माणसं एवढी गुणी आहेत, मातब्बर आहेत, प्रत्येक भूमिकेत रंग भरण्याचं कौशल्य असणारी आहेत; पण असा भोग पदरी आल्यावर ती तरी काय करणार? बंगाली वातावरणात भाषा मात्र भोजपुरी आहे. अशिक्षितांच्या गावातला हा हिरो मात्र स्वच्छ जीनच्या कपड्यात ट्रॅक्टर चालवतो. ह्या सर्व लोकांचे चेहरे, हालचाली एकूण वावरणं एवढं नागर आहे की, त्यांच्या तोंडातली भाषा, त्यांचे पोषाख बेगडी वाटतात. रेखा व राजेश खन्ना यांच्या नदीमधील प्रणयलीला कृत्रिम आणि उघड्या वाटतात. ग्रामीण जीवनाला रासवट मोकळेपणा अनुभवताच येत नाही. शहरी छापाचे प्रत्यंतर येते.

रेखाची अल्लड गाव की गोरी, अत्यंत प्रक्षोभक हालचालीने नको वाटते. तुलना करण्याचा मोह टाळायलाच हवा; पण अशा वेळी 'गंगा–जमना'तली वैजयतीमालाची धन्नो आठवते तिचा रांगडा प्रियकर 'गंगा' आठवतो.

'अंकुर'मध्ये श्याम बेनेगलने दाखवलेले शेताचे हिरवे रंग आठवात.

ताराशंकर बंदोपाध्यायांच्या कथेवर हा सिनेमा आहे असे म्हणणे म्हणजे बापाच्या नावावर चैन करणाऱ्या, त्याच्या नावाला काजळी फासणाऱ्या मुलाच्या अधमपणासारखं आहे. या चित्रपटाचे निर्माते तपन गुहा–तपन चटर्जी व दिग्दर्शक अनिल गांगुली आहेत; पण कलाकृती वंगबंधूंची वाटत नाही दिलीपरंजन मुखर्जीचे छायाचित्रणही कमालीचं सुस्त, फिकं आहे गाणी अजिबात लक्षात न राहणारी. 'भोर भये पंछी' ही भूपाळी सोडली तर–

तळ्याकाठी न्हाऊन निघालेली स्त्री, गोकुळअष्टमीच्या उत्सवानिमित्त साऱ्या ग्रामकन्यांचे नृत्य, मारपीट, मद्रासी हिंदीचा करुण विनोद, प्रेमाचा, द्वेषाचा भडक रंगी उपयोग या साऱ्यानी आँचल अधिक उथळ, भडक वाटतो.

आँचल म्हमजे स्त्रीची अब्रू, तिची लाज, मर्यादा, संस्कृती. त्यात तिचा कृष्ण, तिचे सारे विश्व, साऱ्या भावना असतात असं काहीसं कोणी तरी म्हणतं. आपल्या या हिंदी 'आँचल'मध्ये ह्या वरील गोष्टीशिवाय अनेक नाटकी गोष्टीची भरमार आहे. नटखट ग्रामकन्येचा फाजील धीटपणा साऱ्या दुष्ट गोष्टी एकट्या माणसाला करायला लावण्याचे सामर्थ्य आहे आणि स्दत.च्या डोक्यानं न चालणारी दुबळी–खुळी पात्रं आहेत. मात्र हे सारं सहन करण्याची ताकद असेल तर.खुशाल पहावा आँचल!

—सुलभा तेरणीकर.

## निपाणीतील स्त्रीकामगारांचा बदलता ‘ मूड ’

पृष्ठ ४ वरून

२–४ एकराच्या जमिनी असलेले हे ‘ शेतकरी ’ कर्जे घेतल्याने वखार–मालकाशी ‘ बांधलेले ’ असतात. त्यांच्या शेतात कोणत्या प्रकारचा तंबाखू लावायचा, पीक आल्यावर त्याला काय भाव द्यायचा हे सर्व वखारमालकानीच ठरवायचे. दरवर्षी काही ना काही कारण काढून तंबाखूचा भाव पाडायचा, हे येथील व्यापाऱ्यांचे तंत्र आहे. १९६९–७० मध्ये २५ रु. किलो असलेल्या तंबाखूचा भाव आता ८० साली ४ ते ७ रु. पर्यंत आहे ! किती शेराचा एक मण याचे निश्चित गणित येथे नाही ! सर्व व्यापाऱ्यांच्या मर्जीचा कारभार ! याशिवाय निरनिराळ्या नावाखाली व्यापारी ‘ सूट ’ घेतात. बारदाना भरताना तंबाखू सांडते, तीत काड्या असतात, माती असते, नेताना काही तंबाखू गाडीत सांडते व वजन करताना काही हवेत जाते; अशा कारणास्तव दर क्विंटलमागे सुमारे १० ते १५ किलो ‘ सूट ’ घेतली जाते. एकूण व्यवहारावर १०% कमिशन शेतकऱ्याने व्यापाऱ्याला द्यायचे अन् राहिलेले पैसे (व्यापाऱ्याने ठरविलेल्या दरानुसार) ८–९ महिन्याच्या उधारीवर घ्यायचे असा एकूण व्यवहार असतो. ह्या सर्व प्रकरणात शेतकऱ्याचा उत्पादनखर्च सुद्धा भरून येत नाही, अन् तो भिकेच्या मार्गाला लागतो!

एकूणच, येथील व्यापाऱ्यानी शोषण करायचे आपले तंत्र अतिशय परिपूर्ण केलेले दिसते. पैशाच्या ताकदीमुळे यांचे हात सरकारदरबारी लांबवर पसरलेले आहेत. कारखान्यासाठी असलेले सर्व नियम धाब्यावर बसवून वर्षानुवर्षे कारखाने चालविणे अन्यथा शक्य नाही. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद ह्या मंडळीच्या पथ्यावर पडला आहे. महाजन अहवालानुसार निपाणी महाराष्ट्रात येणार आहे; परंतु सध्या हा भाग कर्नाटकच्या हद्दीत येतो. त्यामुळे ‘ दोन्ही घरचा पाहुणा ’ अशी इथली स्थिती आहे. कोणतेच सरकार इकडे पुरेशा आस्थेने बघायला तयार नाही. आपल्या सर्व पैशाचा, राजकीय बळाचा आणि कौशल्याचा वापर करून व्यापारी मंडळी हा प्रश्न सुटणार नाही याची काळजी घेत असतात. कारण हा प्रश्न न सुटल्यानेच येथील शोषणप्रक्रिया अबाधित राहू शकणार आहे.

इतक्या निराशाजनक परिस्थितीतच येथे ‘ निपाणी तंबाखू स्त्री कामगार ’ संघटनेचा उदय झाला. यापूर्वी इथे २–३ अयशस्वी प्रयत्न झाले होते. १९५२ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कॉ. वत्सलाबाई पाटील, १९५३–५४ मध्ये मोहन धारिया आणि १९५६ मध्ये लाल निशाण पक्षाने इथे संघटना बांधण्याचे प्रयत्न केले; परंतु हे सर्व प्रयत्न अल्पजीवी ठरले. पैशाची, सत्तेची ताकद वापरून, जातीयतेसारख्या काही प्रश्नाचा वापर करून मालकांनी हे प्रयत्न मोडून काढले.

मार्च १९८० मध्ये एका कारखान्यात ५ मिनिटे उशीर झाल्याचे निमित्त करून मालकाने ५० स्त्रियाना कामावर घेतले नाही. ह्या बायका तेथे धरणे देऊन बसून राहिल्या. ही बातमी झपाट्याने सर्व वखारीत पसरली. इतक्या वर्षांचे अन्याय–अत्याचार सहन करणाऱ्या ह्या बायकांच्या सहनशक्तीचा आता अंत होत आला होता. बघता बघता ६–७ हजार बायका तेथे गोळा झाल्या. सतत तीन दिवस सर्व व्यवहार बंद होते. गावागावातून ह्या बायकांच्या तीन दिवसांच्या भाकरीची सोय केली गेली. ह्या अभूतपूर्व लढ्याच्या उत्स्फूर्ततेतच त्याच्या यशाचे बीज होते! ह्या लढ्यातूनच ‘ निपाणी तंबाखू स्त्री कामगार युनिअन ’चा जन्म झाला ! त्या सर्व स्त्रियांना कामावर तर घेतले गेलेच, शिवाय ‘ ८ तास काम, ५ रु. दाम ’ ही युनिअनची मागणीसुद्धा मान्य केली गेली. (इंग्लंडमध्ये १८४८ मध्ये हा कायदा लागू झाला होता.) युनिअनचा दुसरा विजय म्हणजे मागच्या दिवाळीत स्त्रीकामगाराना प्रथमच दिला गेलेला बोनस !

निपाणीतील देवचंद कॉलेजमधील एक प्राध्यापक सुभाष जोशी यांच्याकडे ह्या स्त्रीकामगाराचे नेतृत्व आहे. १९७४ पासून विडी कामगारामध्ये काम करत असलेल्या सुभाष जोशीचे सध्याचे आयुष्य ह्या स्त्रीकामगाराच्या प्रश्नाबरोबर पूर्णपणे एकरूप झालेले आहे. युनिअनचे काम करत असल्यामुळे त्यांच्या कॉलेजातील नोकरीवर अनेक गंडातरे आली; परंतु ह्या माणसाच्या विद्यार्थ्यांमधील आणि कामगारामधील लोकप्रियतेचा रेटाच इतका जबरदस्त आहे की, एकदा नोकरीवरून कमी केल्यानंतरही विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे कॉलेजच्या व्यवस्थापनाला आपला निर्णय मागे घ्यावा लागला होता. आजही ह्या माणसाला दहा-बारा खटल्यांमध्ये गुतवण्यात आले आहे.

इथल्या परिस्थितीच्या भयावहतेची तीव्रताच इतकी जबरदस्त होती की स्थापन झाल्यानंतर युनिअनला मूळ धरण्यास फार काळ लागलाच नाही ! केवळ १० महिन्याच्या अल्पावधीत जवळजवळ दहा हजार स्त्रिया युनिअनच्या सभासद झाल्या आहेत. घरचा विरोध पत्करूनसुद्धा युनिअनला निष्ठा दाखविण्यात ह्या स्त्रिया मागे सरत नाहीत. शहरी स्त्री-मुक्तिवाल्यांना येथे बरेच काही शिकण्यासारखे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ६ पूर्णवेळ कार्यकर्ते, ४ वकील मित्र, एक डॉक्टर आणि स्वत. सुभाष जोशीसह दहा हजार स्त्रियाची ही युनिअन दिवसेदिवस बलाढ्य होत आहे. गतकाळातील अपरिमित दु खे, अन्याय, अत्याचार ह्यानी शिगोशीग भरलेल्या ह्या असंख्य ‘ दुर्गा ’चा त्वेष त्या बोलू लागताच कोणालाही प्रभावित करून शकतो, हीच ह्या युनिअनची खरी ताकद आहे.

ही युनिअन कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधलेली नसल्याने ती तेथील कामगारप्रश्न पूर्ण सचोटीने हाताळताना दिसते. अल्पकाळातच युनिअनने बरेच काही कमावले आहे. मालकाचे गैरप्रकार पूर्ण थांबले नसले तरी पुष्कळच कमी झाले आहेत. बाल्यावस्थेतील या युनिअनने चांगले बाळसे धरले असले तरी अनेकदा मालकवर्गाच्या पाशवी झुडशक्तीपुढे तिची ताकद कमी पडते. अनेक दशकाची अनिर्बंध सत्ता उपभोगल्यानंतर, युनिअनच्या वाढत्या यशामुळे व्यापारी मंडळी संतप्त झालेली आहेत. मालकांची मदमस्त, मुजोर वृत्ती आणि स्त्रियामधील त्वेषपूर्ण ‘ कुर्बानी ’चा मूड ह्या दोहोंमधील संघर्ष यापुढील काळात अटळ आहे. ही संघटित ताकद खच्ची करण्याचा मालकलोक सर्वतोपरी प्रयत्न करतील. मालकाच्या डावपेचांना युनिअनचे नेतृत्व कशा प्रकारे शह देते यावर त्या हजारो स्त्रीकामगाराचे भवितव्य पूर्णत: अवलंबून आहे.

स्त्री-मुक्ती, विषमता निर्मूलन इत्यादी विविध अंगे असलेला हा निपाणीतील लढा भविष्यात कोणते रूप धारण करेल ते काळच ठरवेल; आज तरी तो मूलतः किमान लोकशाही हक्कासाठी चालू असलेला लढा आहे.

□

MANOOS ( Marathi Weekly ) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

" मी अशाच भारतासाठी झटेन ज्या भारतात गरिबाहून गरीब देखील हा देश माझा आहे, अशी भावना बाळगील, ज्या देशाच्या जडणघडणीत त्यांच्या शब्दाला महत्व असेल, असा भारत, जेथे वरचा वर्ग आणि खालचा वर्ग हा भेदभाव नसेल, असा भारत, जेथे सर्व जाती-जमातीचे लोक गुण्या-गोविंदाने नांदत असतील. अशा भारतात अस्पृश्यता तसेच मादक पेये आणि अंमली पदार्थ यांच्या शापाला थारा नसेल. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना पण समान अधिकारांचा आनंद घेता येईल. किमान अशा परिस्थितीतच माझे समाधान शक्य आहे.

—महात्मा गांधी

( 'यंग इंडिया'—१९३१ )

DAVP—80/405